# वाडा

## विलास भि.कोळी



# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# वाडा कसा पहावा

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो, मजा येते.

पण

तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# वाडा कसा पहावा

लेखक : विलास भि. कोळी

# वाडा कसा पहावा

लेखक : विलास भि. कोळी

**पत्ता : आंबेगाव बु. पुणे ४११०४६.**

**फोन : ९७६३०८४४९९**

**Email : kolivilas2@gmail.com**

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

www.esahity.in

esahity@gmail.com

प्रकाशन : १५ मार्च २०२१

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.






**पुस्तकाचे नाव : वाडा कसा पहावा**

**लेखक : श्री. विलास भि. कोळी.**

**जन्म : १५ मार्च १९७२.**

**जन्मगाव : वडजी, ता. वाशी, जि. उस्मानाबाद.**

**पत्ता : आंबेगाव बु. पुणे ४११०४६.**

**फोन : ९७६३०८४४९९**

**Email : kolivilas2@gmail.com**

# ओळख

मी श्री. विलास भिमराव कोळी. माझा जन्म १९७२ साली धाराशिव (उस्मानाबाद) जिल्ह्यातील वडजी येथे झाला. महाराजा शिवछत्रपती प्रतिष्ठान (ट्रस्ट) पुणे. यांचेकडून आंबेगाव बु. पुणे. येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर **‘शिवसृष्टी’** प्रकल्प साकारत आहे. तेथे मी कार्यरत आहे. ऐतिहासिक प्रकल्प व इतिहासाची आवड असल्यामुळे गड, किल्ले, गढ्या, वाडे, ऐतिहासिक वास्तू सतत बघणे होत असते. व त्यासंबंधी असणाऱ्या उपक्रमामध्ये मी नेहमी सहभागी होत असतो.

प्रतिलिपी, आम्ही साहित्यिक, आपलं मानसशास्त्र, दिवाळी अंक, त्रैमासिक, फेसबुक पेजवरही माझ्या कथा व लेख असतात. पुढारी, लोकमत, लोकसत्ता वृत्तपत्रामध्ये वाचक संवाद मध्येही मी सहभाग घेत असतो. लॉकडाऊनच्या काळात ई साहित्य प्रतिष्ठानच्या माध्यमातून **‘कोरोना व्हायरस चिंतन’** हे माझे ई पुस्तक वेबसाईटवर देखील प्रसिद्ध झालेले आहे.

लहानपणापासून वाचनाची आवड असल्यामुळे कथा, कादंबऱ्या वाचायची गोडी शाळेतच लागलेली होती. भरपूर पुस्तकं

वाचायला मिळाली, ती स्वभावात असलेल्या ओढीने. इतरांची पुस्तके वाचता-वाचता मला देखील लिहिण्याची आस निर्माण झाली.

मुळातच अभ्यासूवृत्ती व चिंतनशीलता ही अंगात भिनली असल्याने, माहिती संकलन करण्यासाठी घालवलेला वेळ, केलेला अभ्यास, आणि कष्ट या पुस्तकात आहेत. एका दिवसात कुणीच घडत नाही, गेल्या पंधरावीस वर्षाची तपश्चर्या, इतिहासाशी निगडीत असल्याने मनात निर्माण होणाऱ्या प्रश्नांची उत्तरे मी स्वतः **'वाडा कसा पहावा'** या पुस्तकात लिहिलेली आहेत.

# **ऋणनिर्देश**

‘वाडा कसा पहावा’ हे पुस्तक लिहिताना अनेक लोकांची मोलाची मदत झालेली आहे. त्यांना ऋणनिर्देश करणे आवश्यक आहे. पुस्तक कोणाला अर्पण करायचे असा ज्यावेळी माझ्यापुढे प्रश्न निर्माण झाला तेंव्हा अनेकांची नावे स्मृतीपटलावर आली.

**शिवशाहीर मा.श्री. बाबासाहेब पुरंदरे**

**महाराजा शिवछत्रपती प्रतिष्ठानचे सर्व विश्वस्त.**

या व्यतिरिक्त

प्रशासकीय अधिकारी श्री. अनिल पवार यांनी ही पुस्तिका काढून त्याचा लाभ जिज्ञासूनां व्हावा अशी कल्पना मांडली व त्याचा पाठपुरावाही केला. त्यांनी हस्तलिखित वाचून ते सुधारण्यासाठी, व्याकरण तपासण्यासाठी बहुमोल सूचनाही केल्या व दुरूस्त करण्यासाठी कष्टही घेतले. श्री. पवार यांनी लेखनाच्या कामी मला जे प्रोत्साहन दिले त्याबद्दल त्यांचे उतराई होणे शक्य नसले तरी त्यांचे मन:पूर्वक आभार मानणें हे मी माझे कर्तव्य समजतो. याशिवाय पुस्तक लिहण्यासाठीचा किडा माझे जेष्ठ सहकारी श्री. प्रमोद साळुंखे यांनी डोक्यात घातला नसता तर मी

कदाचित या वाटेला वळलोच नसतो. बिजरोपणाचे काम हे असेच असते.

डॉ. अजित आपटे, आर्किटेक्ट श्री. राहुल चेंबूरकर, आर्किटेक्ट श्री. संजीव ठकार यांचेबरोबर झालेल्या चर्चेतून खूप शिकायला मिळत असे आणि गेली १५ वर्षे त्यांचा सहवासही लाभलेला आहे. मुखपृष्ठ सजावट करणारी आर्किटेक्ट संगीता घुले, सुरेख छायाचित्राने पुस्तक सजावट करणारी माझी मुलगी साक्षी. वेळोवेळी माहितीची देवाणघेवाण व मार्गदर्शन करणारे श्रीकांत देशपांडे, आंबादास सामलेटी. वाडे, गढ्या, किल्ले बघत असताना ज्यांनीज्यांनी मन लावून माहिती सांगितली ते सगळे. हे पुस्तकं लिहिण्यासाठी आणि माझे विचार शब्दात मांडण्यासाठी मला ज्यांनी ज्यांनी प्रवृत्त केले, वेळोवेळी प्रतिक्रिया देऊन माझ्या लेखनाचा हुरूप वाढवला. माझं पहिलं पुस्तक वाचून लिखाणावर अभिप्राय दिलेले. या पुस्तकाच्या जडणघडणीत मला अनेकांनी मदत केली अशा माझ्या सर्व हितचिंतकांना अर्पण. त्याबद्दल सगळ्यांचे मनापासून आभार.

**श्री. विलास भि. कोळी**

# अनुक्रमणिका

१ ओळख
२ ऋणनिर्देश
३ मनोगत
४ पुस्तकांच्या निमित्ताने
५ वाडा का पहावा
६ कोण आहेत इतिहासाचे साक्षीदार
७ वाड्याचे स्वरूप
८ वाडा बांधकाम कारागीर
९ अधिकारी वर्ग: कर्तव्य व जबाबदारी
१० वाडा बांधकामात मुक्या प्राण्यांचाही मोलाचा वाटा.
११ भूपरीक्षा
१२ वाडा बांधकाम साहित्य
१३ लोहार - कोळसा आणि त्याचे महत्वं
१४ लाकूडकाम
१५ लाकूडकामाला तेल पाजणे
१६ बिब्याचे तेल, बेल तेल, जवसाचे तेल
१७ मचाण बांधणी
१८ लिंपण काम
१९ वाडा व मंदिर बांधकामातील फरक
२० अंगण

२१ तुळशी वृंदावन व तुळस महत्वं
२२ रांगोळी
२३ पुष्करणी
२४ विहीर- आड- बारव
२५ वाड्याचे जोते
२६ दरवाज्याचे तोरण
२७ मुख्य प्रवेशद्वार
२८ उंबरठा
२९ नगारखाना
३० देवडी
३१ खुंटी
३२ कोनाडा /देवळी
३३ मेघडंबरी
३४ ध्वज
३५ चौक
३६ सोपा
३७ तळखडे
३८ खांब - स्तंभ
३९ स्तंभशिर्ष
४० हस्त
४१ सर
४२ छत
४३ पाणीपट्टी

४४ भित्तीचित्रे
४५ खिडकी- झरोके
४६ दिवा
४७ कमानी
४८ खण
४९ माळवद
५० दालन
५१ पलंग
५२ हंड्या- झुंबर
५३ दप्तरखाना
५४ खलबतखाना
५५ छताची कौलं
५६ कारागीरांविषयी
५७ कीर्तीमुख
५८ पंगत ( पाटावर जेवणाची पद्धत)
५९ पाटा वरवंटा
६० दगडी जात
६१ ठेवणीतील ऐवज
६२ जुनी बांधकाम पद्धती वापरा, पर्यावरण वाचवा.
६३ संदर्भसूची






## मनोगत

नमस्कार मी श्री. विलास भिमराव कोळी.

जे ठरवू ते करून दाखवू हे ब्रीद वाक्य मनासी ठरवून '**वाडा कसा पहावा**' हे पुस्तक लिहायला घेतले. विद्यार्थी केवळ शिक्षणाद्वारे घडत नसतो तर तो जिथे शिकतो ते वातावरण ती वास्तूही त्या विद्यार्थ्याला घडवत असते असा माझा अनुभव. माझ्या पहिल्या '**कोरोना व्हायरस चिंतन**' या पुस्तकाला भरभरून प्रतिसाद दिल्यामुळे मला हे दुसरे पुस्तकं लिहायला बळ मिळाले आहे. बऱ्याच वाचक मित्रांनी आपापला प्रतिसाद कळवला. त्यानंतर काहीतरी नविन लिहण्याच्या मी शोधात होतो. इतिहासाची आवड असल्याने त्याविषयी सतत बोलणे होत असते. ज्यावेळी आम्ही गड, किल्ले, गढ्या, जुने वाडे पहात असताना मित्रांबरोबर चर्चा करत असताना, मुद्दामहून त्या ईलीमेंटसना काय म्हणतात. त्याचं महत्वं त्याकाळी काय होतं. हे सगळं उलगडून सांगायला लागलो

की वाडे, गढ्या पहायला आलेले इतर दुसरे लोकसुद्धा मन लावून ऐकायचे व म्हणायचे की अशा गोष्टींचा आम्ही कधी विचारच केला नव्हता. त्या दृष्टीने आम्ही वास्तू कधी बघितल्याच नाहीत. आणि मग आमच्या बरोबरच ती मंडळी वास्तू बघायची. चर्चा करायची आपण बोलताना टिपण करायची याला खुंटी म्हणतात, त्याला अडसर म्हणतात, त्याला भित्तीचित्रे म्हणतात वैगरे वैगरे. प्रश्न विचारायचे, त्यांनी विचारलेले प्रश्न पाहून वाड्याविषयी मराठीतून पुस्तक लिहले पाहिजे असे मनोमन वाटू लागले. इतरांना लिहायला सूचवण्यापेक्षा आपणच लिहायचा विचार केला. मित्रही सतत म्हणायचे की तुमच्याकडे एवढां खजिना आहे तर तुम्ही ऐतिहासिक वास्तूंवर का नाहीत लिहीत. वाडा, गढ्या, किल्ले याविषयी पंधरावीस वर्षाचा अनुभव गाठीशी होताच. त्याच शिदोरीवर 'वाडा कसा पहावा' हे पुस्तक लिहायला घेतले.

लिहण्यासाठी विषय निवडला "**वाडा**". वाड्यातील ईलीमेंटसलाच लिहून बोलते करुया. आणि **वाडा** या वास्तूवर लक्ष केंद्रित केले. त्यांच्या शोधकार्याच्या उपक्रमातून वाड्याच्या निर्मिती संदर्भातील अनेक पैलूंवर प्रकाश टाकणे जरूर होते. अशा विचाराने प्रेरित होऊन वाडे बघायचो.

हा विषय निवडीचा उद्देश म्हणजे ज्या भूमीत आपला जन्म झाला. त्या भूमीतील वाडे जवळून पाहण्याचा, राहण्याचा योग

आलेला आहे. भारतीय पारंपारिक खेळ, खाद्यपदार्थ, पेहराव, तसेच विविध कला आणि संस्कृती जोपासण्याचे काम करणारा वाडा. अनेक कुटुंबाच्या अनेक पिढ्या एकत्रितपणे नांदणारी वास्तू म्हणजे वाडा.

एखाद्या गावी गेलो की त्या गावी एखादा वाडा आहे का याची चौकशी मी करतो आणि योगायोगाने त्या गावात एखादा वाडा असल्यास तो वाडा आतून बाहेरून अगदी मन लावून पहातो. त्या वाड्यातील जुन्या वस्तू पहाणं त्यांची माहिती मिळवणं हा छंदचं झाला आहे. जुन्या वाड्याची वास्तूरचना तर इतकी अप्रतिम आणि अभ्यासपूर्ण आहे की पहाणाऱ्याने पहाताक्षणी प्रेमात पडायलाच हवे अशी. वाड्याच्या वास्तूरचनेबद्दल बोलायला मी कांही तज्ञ नाही. पण गडदुर्ग पहातापहाता वाडेही पहाण्याचा छंदच जडला.

गढ्या, वाडे यांचे बारकाईने निरीक्षण करत असताना अगदी चुलीच्या जागेपासून ते भिंतीतील खुंटीच्या आकारापर्यंत प्रत्येकाच्या असण्याला कसा अर्थ आहे. त्याच ठिकाणी ते का घेतले असावेत. त्याचे तिथे महत्वं काय असेल. त्याचा शोध घ्यावा असे सतत वाटत असे.

**"वाडा कसा पाहावा"** या प्रश्नाचे उत्तर तिन टप्यात देता येईल. तो पहायला जाण्यापूर्वी काढलेली माहिती, वाडा पाहताना पडलेले प्रश्न, केलेल्या नोंदी आणि वाडा पाहून आल्यावर त्यांची उत्तरे शोधण्याचा केलेला प्रयत्न.

इतिहासावरील पुस्तके वाचत असताना. अभ्यास, मनन, चिंतन करत असताना, त्याची कलाकुसर बघत असताना, स्थापत्य शास्त्राचे कांही दाखलावजा बांधकामे बघणे, त्याचा इतिहास जाणणे, त्याच्या नोट्स काढणे अशा माध्यमातून आलेले, बघितलेले, अनुभवलेले अनुभव आहेत. ते जतन करून ठेवण्यापेक्षा पुस्तक रुपाने प्रकाशित करावे. असे हे सगळे अनुभव आहेत.

कित्येक नामवंत लेखकांची हजार, दीड हजार, दोन हजार पानांची पुस्तके आत्ताची पिढी वाचू शकेल काय ? तर उत्तर असेल नाही. आपल्या पिढीला मिळालेला हा इतिहासाचा अमूल्य ठेवा सोप्या शब्दात पूढच्या पिढीपुढे छोटेछोटे भाग करून ते पुस्तकं रुपात अथवा ऑडीओ/ व्हिडीओच्या माध्यमातून सोप्या पद्धतीने सांगण्याची नितांत गरज आहे. नाहीतर त्या ऐतिहासिक वास्तूंची

ओळखच राहणार नाही. अशी ऐतिहासिक माहिती त्यांच्यापर्यंत पोहचवणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे असं मला वाटतं.

आपआपल्या परीने प्रत्येकाने कोणत्या ना कोणत्या तरी स्वरूपात हे पुढे पोहोचविले पाहिजे. **“हे नवीन पिढीपर्यंत पोचविण्यासाठी, नवीन पिढीतील नव्या दमाचे, नवीनच लेखक पाहिजेत. म्हणून हा लेखन प्रपंच”** खूप अलंकारिक न लिहिता आपल्या जीवनात बोलल्या जाणाऱ्या दैनंदिन भाषेत लिहलेलं आहे. त्यामुळे वाचताना जड जाण्याचा प्रश्नच येणार नाही. जशा शॉर्ट फिल्म तयार होतात, तशीच शॉर्ट पुस्तकं ही लिहली पाहिजेत.

येणारा काळ हा कान गोष्टींचाच असल्यामुळे असाच एक प्रयत्न म्हणून मी ऑडिओ बुक्स (कानगोष्टी) प्रतिलीपी वर माझ्याच स्वरात **‘वाडा कसा पहावा’** हे ऑडिओ पुस्तकं काही प्रमाणात शेअर केले. त्याला तिन महिन्यात जवळपास पंधराशेहून अधिक श्रोत्यांनी प्रतिसाद दिला. बऱ्याच जणांचे फोन, इमेल, हॉटसअप आले की तुमच्या पुस्तकाचा आम्हांला खूप उपयोग झाला आहे. अशा गोष्टी मनाला खूप सुखावणाऱ्या असतात.

कुठलीही गोष्ट करत असताना त्या गोष्टीचा इतरांना उपयोग होतोय ही भावना मन सुखावणारी व स्वतःला प्रेरीत करणाऱ्या असतात.

महाराष्ट्रातील दुर्गप्रेमी, शिवप्रेमी, इतिहासप्रेमी, स्थपती, वास्तुविशारद, पर्यवेक्षक, विद्यार्थी आणि तुम्हां चोखंदळ वाचकांच्या हाती लेखक या नात्याने वाडा कसा पहावा हे ई पुस्तक देत असताना मला अतिशय आनंद होत आहे. आपण धुमधडाक्यात त्याच स्वागत करतालं अशी आशा व्यक्त करतो. आपला अभिप्रायही माझ्यासाठी खूप महत्वाचा आहे. पुस्तकाच्या सुरवातीला मी माझा इमेल आयडी व भ्रमणध्वनी दिलेला आहे. त्यावर आपला अभिप्राय मला कळवावा. त्यामुळे पुढील लेखन करताना मला ते उपयोगी पडेल.

**श्री. विलास भि. कोळी**

## पुस्तकाच्या निमित्ताने

**त्यांनी जें जें वदविलें! तें तें मी कथित केले! लेखणीनें अक्षर लिहले! परी ते न तिचे सामर्थ्य! ती लेखणी ज्यांच्या करी! तोच अक्षरे काढी सारी! निमित्त कारणे होते खरी! लेखणी ती लिहावया! तैसेंच येथे झाले! मी लेखणीचे काम केले! लिहिते लिहविते स्वामी भले! श्री गजानन महाराज! त्यांच्या कृपेकरून! मी हे केले लेखन! येथे माझे मोठेपण! काहींच नाही विबुध हो!!**

वाडा ही संकल्पना अतिशय रंजक असल्याने मानवी समुदयास कायम साद घालत आली आहे. आजवर खऱ्या अर्थी वाड्यांवर संशोधन वा सर्वेक्षण झालेलेच नाही. वाड्याचे भव्य बांधकाम करण्याचं वेळापत्रक कसं जुळतं हे आजपर्यंत कुठल्याही लेखकाने अथवा इतिहासकारांनी उलगडून दाखवलेलं नाही. बांधकाम स्थापत्यामध्ये असलेले बारकावे अभ्यासू लागलो की त्यामागची कलाकारांची दृष्टी, तत्त्वज्ञान आपल्याला आश्चर्यचकित करून टाकतात. त्याकाळातील सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचवण्याची तळमळ समजून येते. जुने वाडे, गढ्या यासारखे बांधकाम आजच्या पिढीमध्ये कोणी हौशी माणसाने केलेले

कोणाच्या ऐकविण्यात नाही. कारण आज आपण वाड्याचे किंवा गढीचे जे फोटो पाहतो ते एवढे भव्यदिव्य आणि वैभवसंपन्न वाटतात. ज्यावेळी वाडे बांधले गेले असतील तेव्हां त्यांचा जो काही थाट असेल तो वेगळाच असणार. दगड, विटा, भेंडे, चुना, सागवान, शिसम वापरून बांधलेला वाडा जो आजही उत्तम प्रकारे दिमाखात उभे आहेत. असे **वाडे पहायला स्थपती, वास्तुविशारद, इतिहासकार, अभ्यासक, पर्यटक, मूर्तिकार, फोटोशूट, शुटींगसाठी लोक भेटी देत असतात. आजही चित्रपट, मालिका जुन्या वाड्याशिवाय परिपूर्ण होऊच शकत नाहीत, हे विशेष आणि अभ्यास करण्यासारखे आहे.**

महाराष्ट्रात, देशात, जगात गड, किल्ले, वाडे, गढ्या पाहण्यासाठी पदभ्रमण करणाऱ्या मंडळीची संख्या फार मोठी आहे. पर्यटन म्हणजे गडकिल्ले, निसर्ग सौंदर्य, आणि भ्रमंती एवढ्यापुरतेच मर्यादित न राहता, पर्यटनाची संकल्पना आता बदलत चालली आहे. पर्यटनात पुरातन वास्तू, ऐतिहासिक मंदिरे, याचबरोबर प्राचीन वाड्यांचाही समावेश होऊ लागलेला आहे. **अनेकजण वाडे, गढ्या पहायला जातात. तिथे गेल्यावर वाड्यातील त्या एलिमेंट्सला काय म्हणतात. किंवा त्याचं त्या ठिकाणी काय महत्वं आहे. त्याची रचना कशी आहे. ती**

**तशी असण्यामागे आपल्या पूर्वजांनी काही संकेत ठेवले आहेत काय.** हे माहित नसतं. वाडा म्हणजे नुसती वास्तू नसून तिच्यात इतिहास, वास्तूशास्त्र, शिल्पकला, छोट्याछोट्या गोष्टींचा केलेला उपयोग. **वाड्याचे जे एलिमेंट्स आहेत ती तर भाषेविना अबोलच असतात. पण ती अबोल राहून देखील बरचं कांही सांगून जातात.** अशा एलिमेंट्सवर आजपर्यंत फारसे लिखाण झालेले दिसत नाही. काळाच्या ओघात डागडुजी अभावी हे सगळे वैभव नाहीसे होणार असे दिसते.

**अत्यंत रेखीव आणि कलात्मंक असूनसुद्धा प्राचीन वारसाबद्दलची उदासीनता जाणवते. दुरुस्ती, डागडुजी इतक्या अवशेषांना दुरुस्त करणे, ही खर्चाच्या आणि परिश्रमाच्या दृष्टीने कोणत्याही सरकारच्या आवाक्याबाहेरची गोष्ट आहे. पण त्यांची साधी नोंद सुद्धा नसावी, ही फार खेदाची गोष्ट आहे. सर्वत्र विखुरलेल्या अवशेषांची पाहणी करून, शोध घेऊन, व्यवस्थित नोंद करून ठेवली तर भावी पिढ्यांना ती प्रेरक ठरेल. एरवी पुढच्या पिढ्यांना स्वताचा इतिहास समजणार कसा. या निमित्ताने का होईना अशा गोष्टींचा उलगडा व्हावा म्हणून त्याची सुरुवात मी केलेली आहे.**

**गड, किल्ले, गढ्या, वाडे पाहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने हे पुस्तकं वाचावे आणि मग वाडा, गढ्या, किल्ले पहायला जावे. वाडा पाहतांना वाड्याच्या मालकाला कोणता संदेश द्यायचा आहे. याचे आकलन व्हावे हा त्यामागचा हेतू आहे. त्या संदर्भातील फोटोही टाकलेले आहेत. त्यामुळे ते वाचण्यास व आकलन होण्यास मदतच होईल. हजार शब्दांत जे सांगता येत नाही ते एक फोटो सांगून जाईल.**

दगडात लाकडात जीव ओतून काम करणं, त्यातून सुंदर कलाकृती घडवणं हे काम पाथरवटांच सुतारंच. निसर्गान निर्माण केलेल्या प्रत्येक वस्तूंच स्वताचं असं एक सौंदर्य असतेच. म्हणूनच कलाकारांना पाषाणात सुद्धा परमेश्वर दिसतो. आकारहीन दगडांना वेगवेगळे रूपं देण मुळीच सोप नसतं. पाथरवट, वडार, बेलदार आपल्या कलाकुसरीतून वर्षानुवर्षे ही कला घडवत आहेत. वास्तू वैभव उभे आहे ते कलाकारांच्या हातून घडत असलेल्या कलेमुळे. त्या कशा घडवल्या जातात. दगडावर कलाकुसर करणारी ही कला लुप्त होते की काय अशी आता भिती वाटत आहे.

**ही कादंबरी प्रत्यक्ष काम करणाऱ्यांनपर्यंत पोचावी असं मला मनोमन वाटतं ते कलाकार म्हणजे** वडार, बेलदार,

पाथरवट, सुतार, गवंडी, बारा बलुतेदार, रंगारी, चितारी इतिहास घडवणारे अशी हरहुन्नरी माणसे यांनीच जर हे वाचले नाही तर याचा खेद आहे. कादंबरी वाचून ते लोक अचंबित होतील. कादंबरी त्यांना विचार करायला लावेल. हेच ते माझे हाशील असणार आहे. आपण करत असलेली कलाकुसर त्याविषयीची माहिती नसेल तर इतरांना त्यामागची पार्श्वभूमी, त्यामागचं नाट्य समजणं कसं शक्य होईल. **वाड्याविषयी वर्णन करताना अगदी मार्मिक व थोडक्यात केलेलं आहे. त्याचं कारण पुस्तकं मोठं व्हायला नको. वाचकांने एकदा पुस्तकं वाचायला हातात घेतलं की ते संपवूनच थांबणार. हा त्यामागचा उद्देश.**

## वाडा का पहावा

पुढच्या पिढीला आपल्या मागच्या पिढ्यांनी काय संचित ठेवले हे दाखवायचे असेल तर पुरातन गढी, वाडे, भुईकोट, गड, किल्ले पाहिले पाहिजेत तरच महाराष्ट्राची थोरवी कळेल. ते आपले ऐतिहासिक वारसा आहेत तो जपला पाहीजे, समजून घेतला पाहिजे, भक्कम वाड्याप्रमाणे त्यातील माणसेही तसीच होती. त्यांनीच इतिहास घडवला आहे. हया वास्तू म्हणजे त्यांची स्मारके आहेत असं म्हटलं तरी वावगं ठरणार नाही.

**वाड्याचे बांधकाम करताना जमिनीच्या पूर्ण जागेवर वाड्याचे बांधकाम करत. तुलना करायचीच म्हटली तर अलीकडील बंगले आणि जुने वाडे यांचे आराखडे बघितले तर परस्पर-संबंध अगदी उलट दिसतो. म्हणजे बंगल्याच्या आराखड्यात प्लॉटच्या साधारण मध्यभागी बांधकाम, समोर व्हरांडा आणि चारी बाजूने मोकळी जागा असते. त्याच्या बरोबर उलट, वाड्यात मध्यभागी मोकळी जागा म्हणजेच चौक आणि चौकाभोवती खोल्यांचे बांधकाम केलेले दिसते.**

गेली पंधरावीस वर्षे बांधकाम व्यवसायात अखंडपणे काम करत असताना पुनःपुन्हा या समृद्ध अशा शिल्पवैभवी महाराष्ट्रीयन वारशाकडे लक्ष गेलं की मन विचलित होत होते. त्यातूनच अभ्यास सुरु झाला. वाचन, निरीक्षण सुरु झाले. विविध व्याख्याने, शोज, वारसास्थळांना भेटी आणि सभासंमेलनातून हजेरी लावायला लागलो. अशा विषयात दिग्गज लोकांनी लिहिलेली ग्रंथसंपदा अभ्यासू लागलो. गडकिल्ले, गढ्या, वाडे, जुनी मंदिरे, जुन्या वास्तू पाहण्यासाठी कायकाय धडपडी केल्या याची जंत्री केली तर खूप मोठी होईल.

इतिहासाचा एक वाचक या नात्याने जे जे ठावे आपणाशी! ते ते सांगावे दुसऱ्यासी! शहाणे करून सोडावे सकळजण! या म्हणी प्रमाणे. महाराष्ट्राच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वैभवात मोलाची भर घालणाऱ्या कित्येक शतके वसा आणि वारसा जोपासणाऱ्या महाराष्ट्राच्या जडणघडणीत वाड्याचे फार मोठे योगदान आहे.

**इंजिनिअरिंगमध्ये जसं प्रत्येक रेषेला महत्वं असतं. तसं पूर्वीच्याकाळी इतिहासामध्ये बांधकामातील प्रत्येक घटक/ इलीमेंटसला महत्वं होतं. प्रत्येक घटक त्याचं**

**काहीनाकाही महत्वं आणि उपयुक्तता त्याकाळी दर्शवत होता.**

वाडे संस्कृती हळूहळू लोप पावत चालली असल्यामुळे आज महाराष्ट्रामध्ये हाताच्या बोटावर मोजता येतील इतकेच वाडे शिल्लक राहिले आहेत. मोठमोठे सरदार, जाहगिरदार, सावकार, व्यापारी यांनी तालेवार पध्दतीने वाडे बांधले. अशा वाड्यांच्या दगडविटा घडून गेलेल्या इतिहासाच्या साक्षीदार आहेत. कुठे तलवारीचा खणखणाट झाला असेल, कुठे खलबतं शिजली असतील. आपापल्या घराण्याच्या वैभवाची साक्ष देणारा, कलाकुसर व वास्तुकलेचा उत्तम नमुना असलेले वाडे महाराष्ट्राचे आकर्षण आहेत. **वाडा,गढ्या हे राजवैभवाचे प्रतिक तर आहेच परंतु ते यशस्वी व्यवस्थापनाचा आणि कारभाराचा नमुना देखील आहेत.**

आपण वाडे, गढ्या, किल्ले बघायला जात असतो. तिथे गेल्यावर काय पाहायचे आणि कशासाठी पाहायचं हेच नेमकं माहिती नसते. अशा वास्तू बांधण्यामागे एक उद्देश असतो. एखादे तत्त्वज्ञान असते, हेतू असतो. ते समजून घेतले की, वाडा पुन्हा एकदा नव्या रूपात, नव्या उत्साहाने पाहता येतो. विविध ईलीमेंट्स त्या विशिष्ट काळावर प्रकाश टाकत असतात. वाड्यात असलेल्या

विविध गोष्टी कांही विचार करून निर्मिलेल्या असतात. विविध ईलीमेंट्स आपल्याला सतत मार्गदर्शन करीत असतात.

**अनेक बारीकसारीक गोष्टी आपल्याला वाडा कसा पाहावा हे शिकवतात. आपल्या बुद्धीला चालना देतात. कलाकारांच्या कलांना वाव देतात. मग ते कलाकार गवंडी असोत, स्थपती असोत, वास्तुविशारद असोत, मूर्तिकार असोत, रंगारी असोत, लाकूडकाम करणारे सुतार असोत किंवा दगडकाम करणारे बेलदार. असे कुणीही असले तरी त्यांनी निर्मिलेली कला मनसोक्त पहावीत, अभ्यासावीत असे मनोमन वाटते.**

प्रत्येक ठिकाणचे वाडा, गढ्या बांधण्यामागील उद्देश वेगवेगळे असतात. **एखाद्या गावातील वाडा, गढ्या बांधण्यामागे गावाला एकत्रित ठेवणे हा ही उद्देश असू शकतो.** वाडा म्हणजे गावखेड्याची शान, वाड्याची भव्यताच त्या मालकाची श्रीमंती दाखवतं असते. रुंद, उंच व जाडजूड भिंती, दर्शनी भागातून डोकावणारी नक्षीदार लाकडी पडवी ही वाड्याची पाहिली झलक. वाड्याच्या आतल्या भव्य मोकळ्या जागेतलं तुळशी वृदांवन, लाकडी कामानं प्रसन्नता वाढवणारं आतलं लाकूड काम. लाकडी देवघर, दिवाणखान्यातील लोड गाद्याचां

बैठकीचा साज, छताला लटकवलेली लाकडी-काचेची झुंबरं, नक्षीदार लाकूडकाम, अघळपघळ स्वयंपाक घर, शयनकक्ष सारी कशी शाही व्यवस्था. वाडा म्हणजे नुसती चहलपहल उस्तव आनंदाला उधाण. गाईच्या शेणाने सारवलेल्या सडासारवणाच्या गंधात रांगोळीच देखणेपण. वाडा म्हणजे अन्नपूर्णेचा सदैव वास आणि दुष्काळात गावाला घासं देणारं ठिकाण. अख्या गावाचं राजकारण, अर्थकारण चालवणारा गावाची आन-बान-शान असलेला. तहसीलदार, पोलीस, ग्रामसेवक, तलाठी, पटवारी, असे कितीतरी अधिकारी याचं आदरतिथ्य सांभाळणारा म्हणजे वाडा.

**वाडा आणि वाड्याच्या भवतालची बारकाईने पाहणी केली की आपल्या लक्षात येईल की वाड्याच्या आजूबाजूने आंब्याची, नारळाची, जांभळाची, केळीची अशा अनेक फळांची बाग. तसेच जास्वंदी, चाफा, जाईजुई, रातराणी, पारिजातक, गुलाब वगैरे फुलांनी नटलेली फुलबाग देखील वाड्याइतकीच रमणीय आणि वाड्याला शोभा देणारे व त्या त्या ऋतूत फळे, फुले देणारे. म्हणजे इथे पर्यावरणाचा देखील विचार केलेला दिसतो.**

वाडा हा स्थापत्यकला म्हणून बघायला हवं. ते बघतांना त्यातील प्रत्येक घटक न घटक बघायला हवे. ते घटक व त्यांचे कार्य समजून घ्यायला हवे. ते उगाचच केलेले नाहीत. त्यामागे काहीतरी कार्यभाव आहेत. मग तो दरवाजा असुद्या, त्यावरील सूर्यचंद्र असुद्या. लाकडावरील कोरीवकाम असुद्या. दगडावरील कोरीवकाम असुद्या. वाड्यातील स्तंभ, त्या स्तंभावर कोरलेले काम हे सगळं बघणे. मी फक्त वाडा किंवा गढी पाहून आलो एवढे नसून ते समजावून घ्यायचा ते त्या ठिकाणी असणेचं कारण समजून घ्यायचं. त्यात आपल्या पूर्वजांचं राहणं, त्यातले बारकावे, सुरक्षितता आणि निसर्गाचे संवर्धन भरपूर गोष्टी वाडा पहायला गेल्यावर आपल्याला समजतात. आपण गड किल्ले किंवा ऐतिहासिक वास्तू बघायला जातो त्यावेळी तेथील लिहीलेल्या पाट्या, मार्गदर्शक किंवा जे आपल्या ऐकविण्यात आहे त्यावरच आपण त्याचा अंदाज बांधत असतो.

मी वाडा-गढ्या पाहिल्या असं म्हणतो परंतु आपण त्यात कायकाय पाहिले हे सांगता येत नाही. नुसतचं वास्तू बघणं किवां आपण तिथं जावून आलो. फोटो/व्हिडीओद्वारे सिद्ध करणे नसून त्यापलीकडे कांही असते. म्हणजे तो कसा बांधला, बांधण्यासाठी काय तंत्र वापरले, मटेरियल कुठले वापरले, किती काळापासून ते

टिकून आहे. ते टिकवण्यासाठी आपल्या पूर्वजांनी काय तंत्रज्ञान वापरले, तिथली संस्कृती, तिथले खाद्यपदार्थ, चालीरीती, तिथला इतिहास. तो घडलेल्या अनुभवासकट बघणं यात फरक आहे.

जोपर्यंत लोकांना हे सर्व ऊलगडून सांगत नाहीत. तोपर्यंत त्या व्यक्तीला याविषयी आवड निर्माण होत नाही. अशी माहिती प्रथम जाणून घेतली आणि आपल्या आसपास असलेल्या स्थळांना या निमित्ताने भेट देऊन त्यावरील कलाकुसर पाहिली. ते निर्माण करण्यामागची कारणे समजून घेतली तर ते बघण्याची मज्जा आणि पर्यटन अधिक समृद्ध, संपन्न होईल यात तिळमात्र ही शंका नाही.

## कोण आहेत इतिहासाचे साक्षीदार.

गड, किल्ले, वाडे, गढ्या, घाट, मंदिरे, शिलालेख, मुर्तीशिल्पे, वस्त्रे, दागदागिने, शस्त्रास्त्रे ही सगळी इतिहासाशी नाते सांगणाऱ्या गोष्टी आहेत. त्यापैकी आपण वाडा या विषयी पाहुयात.

वाडा म्हटलं की डोळ्यासमोर एक भली मोठी वास्तू उभी राहते. वाड्यात प्रवेश करताना पहिल्या पायरीपासून ते इमारतीवरील टोकाच्या झेंड्याला काय म्हणतात. याची माहिती आपण या पुस्तकात बघणार आहोत. वाडा पाहताना थोडीफार जुजबी माहिती असेल तर ती पाहण्याची मजा काही वेगळीच असणार आहे. चला तर मग आपण वाड्याची माहिती जाणून घेऊयात.

वाड्याच्या बांधकामाची मजबुती, त्याचा टिकाऊपणा, त्याची तटबंदी, जोते, प्रवेशव्दार, दारे, खिडक्या, दरवाजे, महादरवाजे, दिंडी दरवाजे, सोपान दरवाजे, उंबरा, कडी कोयंडे, हिंजेश, बिजाग्र्या, जुनी कुलपे, कमानी असलेल्या खिडक्या, देवड्या, कोनाडे, चौक, ओसरी, ओवऱ्या, अडसर इंद्रकील, कारंजे, तळखडे, लाकडी सुरूचे नक्षीदार खांब, स्तंभशिर्ष, त्यावर

पेललेलं छत. लाकडी कमानी, दगडी कमानी, देवळी, महिरपी, गणेशपट्टी, तीर, तुळई, खण, कडीपाटाची रचना, बेलबुट्टीची रचना, सर, हस्त, काचेच्या हंड्या-झुंबर, पाणीपट्टी, नळयाची कौलं, खापरेली कौलं, भित्तीचित्र, शरब, गंडभेरुड, गरुडशिल्प, मयूरशिल्प, यक्षिणी, नर्तिका, वादक, कीर्तीमुख, पुराणकथा, युद्धाचे प्रसंग, दशावतार.

शिलालेख, ध्वजस्तंभ, लामणदिवे, गोमुख/प्रणाल, पुष्करणी, कारंजे, लाकूडकाम, दगडकाम, दगडकामाचे प्रकार जसे माटीव, सडकीव, बुची, खांडकी, बाजरी, बोरट, गलथा, पाठथर, मच्छी कोपरा असे कितीतरी प्रकार आहेत. हे सगळं भूमितीच्या चौकटीत बसविलेले असतात.

घरात असणाऱ्या वस्तू, चूल असलेलं स्वयंपाक घर, माजघर, जुनी भांडी, पितळी हांडे, उखळ, ठोंबा, मुसळ, धान्य दळण्याची जाती, ताकाचे भांडे, ताक घुसळणेची रवी, पाटा-वरवंटा, जातं, सूप, मांडणी, मोठमोठे घागरी-हंडे, पारंपारिक कपडे, न्हाणीघर, पाणी तापवण्याचे बंब, आंघोळीचे घंगाळ, चौरंगपाट, खुंटी, अंग घासायची वज्री, लाकडी पलंग, कमानी असलेला दिवाणखाना, अडकित्ता, नाणी, नकाशे, शस्त्रे, पोशाख, दागदागिने.

कारागिरांची हत्यारे, जुनी कागदपत्रे, पोथ्या, ताम्रपट, मूर्ती, युद्धातील शस्त्रास्त्रे, जसे ढाल, तलवार, बिचवा, खंजीर, कुकरी, कट्यार, वाघनखे, ठासणीची बंदूक, चिलखत, शिरस्त्रान, बाजूबंद, बाण, हाके, राजगिरी, दारुगोळा, तोफा.

अंगण, सडासारवण, रांगोळी, खुंटी, तोरणं. दगडी जमीन त्यातील विविध प्रकार जसे खंडकी, सडकीव, माटीव, बोरट, बाजरी, विविध प्रकारचे कोपरे, पाणी वाहून जाण्याची मोरी, हे सगळ सूक्ष्म नजरेन पहायचं तरचं त्याचं महत्वं व त्याकाळातील त्यांचा उपयोग आपल्या ध्यानी येणार आहे.

## वाड्याचे स्वरूप

निंबोणीचं झाड करवंदी, मामाचा वाडा चिरेबंदी हे बालगीत म्हणताना मामाचा तो चिरेबंदी वाडा कायमच सगळ्यांच्या डोळ्यांसमोर उभा राहतो. पण हल्लीच्या नवीन पिढीला या बालगीतातून वाडा म्हणजे काय समजावून सांगता येईल का ?

वाडा म्हणजे आपल्या पूर्वजांच्या गत वैभवाची साक्ष देणारा, कलाकुसर व वास्तुकलेचा उत्तम नमुना असलेला वाडा हे महाराष्ट्राचे आकर्षण तर आहेच. पण राजवैभवाचे प्रतिक, तसेच यशस्वी व्यवस्थापनाचा आणि कारभाराचा उत्तम नमुना ही आहे. जनमानसात आदराचे स्थान वाड्याला आजही आहे. वाड्यांची मुळ रचना सर्वत्र सारखीच आढळते फक्त त्यात्या व्यक्तीच्या ऐपतीनुसार आकारमान व सजावटीत बदल झालेला दिसतो.

वाड्याविषयी सांगायचे झाल्यास वाडा हा इमारतीचाच एक प्रकार. दगडी चिरेबंदी आयताकार वाडा. आक्रमण किंवा चोरी/दरोडा यापासून बचाव करण्यासाठी व सुरक्षेसाठी चारी बाजूने उंच भिंत. त्या भिंतीला मध्येमध्ये बुरुज जागोजागी सोडलेल्या जंग्या. वाडा म्हटलं की प्रथम दिसतो तो भला मोठा दरवाजा. या दरवाज्यातून घोडेस्वार घोड्यावर बसून आत जाईल असा अस्सल

सागवानी लाकडाचा पंधरावीस फुट उंचीचा नक्षीदार दरवाजा. त्यातूनच उघडणारा एक छोटा दिंडी दरवाजा. दरवाजा तोडू नये म्हणून आडव्या लोखंडी पट्ट्या, त्यावर लोखंडी टोकदार खिळे. लाकडी बिन्या त्यावर ठिकठिकाणी पितळी वाट्या. दरवाज्याच्या आतल्या बाजूने दार बंद करण्यासाठी अडसर त्याला इंद्रकील असे म्हटले जाते. काही ठिकाणी साखळकोंड्याची व्यवस्था असते. फुट-दीडफुट उंचीचा दगडी किंवा लाकडी उंबरा असतो.

दरवाज्यावरील कोनाड्यामध्ये गणेशमूर्ती, सूर्यचंद्र. आजूबाजूला दगडात कोरलेल्या देवड्या, वरच्या बाजूला मेघडंबरी. मेघडंबरीचा भार तोलण्यासाठी मगरीच्या आकाराचे तीर. वाड्याला बाहेरील बाजूने दगड व आतील बाजूने शेण, माती, शाडू, वाळू आणि पिंजर घालून सारवलेल्या भिंतीचा गिलावा. असा गिलावा अजूनही निघता निघत नाही. त्या भिंतीवर काढलेली वेगवेगळी रंगीबेरंगी भित्तीचित्रे, वाड्याची वास्तू बघणारास अदबीने उभा राहण्यास भाग पाडणारी. दरवाजा ओलांडून पुढे आल्यास दोन्ही बाजूला भिंतीतच असणाऱ्या कमानी. आत आलं की बाहेरच्यांनी बसावं म्हणून व पहारेकऱ्याची व्यवस्था असलेली ओसरी किंवा नगारखाना.

वाड्याच्या मुख्य इमारतीत प्रवेश केल्यावर लागतो भव्यदिव्य चौक. तोही आकाशा पर्यंत खुला असलेला. चौकात

पाण्याने तुडुंब भरलेली विहीर/आड अथवा पुष्करणी. बाजूने सोपा. सोप्याला बरेच खांब असतात. सोप्याच्या भिंतीला कोरीव शाडूत नक्षीकाम केलेलं गणपतीचं मंदिर किंवा गणपतीची देवळी. सोप्यावर पाहुण्यांच्या बसण्याची व्यवस्था, कारकुनांचे फड, मालकांची गादी असायची. महिरपी, लाकडी खांब, प्रत्येक खांबावर कोरलेली नक्षी, लाकडी तुळया, सज्जे, खिडक्या, चौकटीवर असणारी लाकडात कोरलेली वेल डोळे दिपवून टाकतात.

पुढे चालून गेल्यावर एका क्रमाने असणारा दिवाणखाना, माजघर, भांडारगृह, स्वयंपाकघर, देवघर, लाकडी जिना. काही ठिकाणी दगड मातीचे भरीव जिने आहेत. जिन्याखाली असणारे एका कोपऱ्यात बाळंतीणीची खोली, स्वयंपाकघर त्याच्या भिंतीत कपाटे, ताकाचा खांब, चुलीजवळ खिडकी, घागरींचा कट्टा, गाडग्यांच्या उतरंडीचा कट्टा, पिंपाचा कट्टा, स्वयंपाकघराच्या मागे तुळशीकट्ट्याच अंगण, चुळा भरायला, पायावर पाणी घ्यायला कोपऱ्यात दगडी मोरी, अन एका बाजूला न्हाणीघर. न्हाणीघर देखील घडीव दगडांचे, धूर कोंडू नये म्हणून छतातून उजेड येण्यासाठी आणि चुलीचा धूर जाण्यासाठी ‘सानं’ असतं.

अशा वास्तूच्या बांधकामात लाकडाचा, चुन्याचा, दगडांचा, मातीचा मुक्त वापर केलेला दिसतो. जिथे महिलांची ये जा असायची. पहिल्या चौकातून दुसऱ्या चौकात जाण्यासाठी ज्या खोलीचा वापर करायचे त्यास माजघर म्हणत असत. माजघराच्या खोलीचा दरवाजा जाळीदार असायचा जेणेकरून पहिल्या चौकात कामानिमित्ताने आलेल्या पुरुषांना आतील महिला दिसू नयेत हा त्यामागील उद्देश असायचा.

**भिंतीत कोनाडे, खुंट्या, फडताळे असतात. भिंती खूप जाड असल्याने वाड्यात शिरल्याबरोबर नैसर्गिकरित्या हिवाळ्यात उष्णता मिळते व उन्हाळ्यात थंडावा मिळतो.** दुसऱ्या मजल्यावर मोठ दालन आणि बऱ्याच खोल्या असायच्या. अशा वाड्याच्या रचनेत शत्रूला हुलकावणी देण्यासाठी काही वैशिष्ट्यपूर्ण योजना ही होत्या. वरच्या मजल्यावर एखाद्या खोलीचा दरवाजा उघडल्यावर पुढे पायऱ्याच नसायच्या, शत्रूने पुढे पाय टाकल्यास खाली पडून कपाळमोक्ष ठरलेला. संकटकाळी सुरक्षित ठिकाणी जाण्यासाठी केलेली सोय म्हणून काही वाड्यात भूयारही असायची. वाड्याच्या अंगणातील बागबगीचा, आजूबाजूला वेगवेगळी निसर्गपूरक झाडे. गतवैभवाची साक्ष देणारी कित्येक पिढ्यांचा वारसा जपणारी वास्तू म्हणजे वाडा.

मालकाच्या ऐपतीप्रमाणे वाड्याच्या बांधकामात बदल ही असत. अशाच वाड्यात लहानाचे मोठे होऊन कर्तृत्व गाजवून काळाच्या पडद्याआड लुप्त झालेल्या पूर्वजांच्या पराक्रमाच्या खुणा मिरवणारा म्हणजे वाडा. वाड्याच्या भल्यामोठ्या रिकाम्या पटांगणात गोट्या, लंगडी, लपंडाव, तासनतास खेळले जायचे. भातुकली, लगोऱ्या, गजगे, सागरगोट्या असे काही खेळ मुलीही खेळत असायच्या. पुरुष मंडळी राजकारणाच्या चर्चा किंवा पिकपाण्याच्या गप्पात दंग असायचे. हे सगळं वातावरण अगदी सरळमार्गी आणि जिव्हाळयाचे असायचे. एकमेकांच्या सुखदु:खात सारा वाडा सहभागी असायचा. त्यामुळे घरातील कोणी आजारी पडले की, सारे मदतीला धावून जात असत. कोणाच्या घरात लग्न निघाले की दळण दळण्यापासून ते लग्नानंतरच्या सत्यनारायणापर्यंतची सारी जबाबदारी वाडय़ातील मंडळी हौसेने पार पाडत असायची. आपल्या पुढील पिढीला वाडा संस्कृती काय होती हे समजण्याएवढेही वाडे आता शिल्लक राहिलेले नाहीत. हातावर मोजण्याइतपत वाडे आता दिसत आहेत. असे वाडे बांधण्यासाठी कुठले मटेरिअल व अधिकारी होते ते पाहूया.

## वाडा बांधकाम कारागीर

**पूर्वी केलेल्या बांधकामाच्या शिल्प वैभावावरून कलावंताच्या कौशल्याची महती पहावयास मिळते. अशा कामासाठी आपल्या पूर्वजांनी दगडासारखे चिरस्थायी माध्यम वापरल्यामुळे कलावैभवाचा वारसा आजही हजारो वर्षे टिकून आहे. उगाच म्हटलेलं नाही. राकट देशा, कणखर देशा, दगडाच्या देशा. मनुष्य वास्तुकला घडवतो व वास्तुकला माणसाला घडवते.**

अनेक मालिका आणि चित्रपटांमधून आपल्याला वाडा बघायला मिळालेला असतो. वाड्याच्या मध्यभागी असलेला चौक, कारंजे, तुळशीवृंदावनाने सुशोभित केलेला घराचा मुख्य भाग नक्कीच आठवत असेल. एकदा वाडा बांधकामाची जागा निश्चित झाली की, भूमी परीक्षा होत असे. त्यानंतर बांधकाम ज्यांच्याकडून करून घ्यावयाचे आहे त्या तज्ञांचे अंगी कोणते गुण आहेत, कोणती पात्रता हवी याचे तपशीलवार विवेचन शिल्पशास्त्रे करतात. वाडा बांधण्यासाठी जो कामगार आणि अधिकारी वर्ग असतो तो खालील प्रमाणे.

**१) कारागीर:-** यामध्ये बेलदार, लोहार, सुतार, वडार, गवंडी, रंगारी जे बांधकाम करण्यास कुशल आहेत असे.

**२) बांधकाम साहित्य :-** मातीचे भेंडे, भाजलेल्या सपाट किंवा चपट्या विटा, दगड, लाकूड, चुना, पाणी, लोखंड, काच, मनुष्यबळ, शिसे, कोळसा, जनावरे आणि रंग कामासाठी लागणारे वेगवेगळे रंग.

**३) अधिकारी:-** यामध्ये निरनिराळ्या संहितात त्यांची नावे वेगवेगळी सांगितलेली आहेत.

**क) स्थपती :-** शिल्पसंहितेतील सगळी शास्त्रे माहिती असणारा, त्याला बांधकाम शास्त्राचे ज्ञान आवश्यक आहे. तसेच त्याला कोणत्याही गोष्टी सहज जमणाऱ्या असाव्यात. हे लोक म्हणजे स्थपती, वास्तुविशारद.

**ख) सूत्रधार:-** हा एकातरी शास्त्रात पारंगत, लौकिक असावा. मापन पद्धतीचे तंत्र माहित असावे. खर्चावर लक्ष ठेवणारा.

**ग) तक्षक :-** बांधकामातील साहित्य तयार करणे. गवंडी, सुतार वगैरे लोकांचा यात समावेश होतो. चिखल, चुना तयार करणे, सांधे जोड कसे भरावे हे सर्व जाणणारा.

**घ) वर्धकी :-** तक्षकाकडून बांधकाम पूर्ण झाले की त्याची रंगरंगोटी करणे. चित्रकार/
आलेखक, रंगारी.

**च) कर्मी** :- हा वर्ग म्हणजे मजूरांचा. यांना शिक्षणाची गरज नसते. यांचे शरीर धडधाकट
असले की झाले. सांगेल ते काम करणारा.

**४) धन (पैसा)** वाडा बांधणीच्या कामी आवश्यक असलेला एक महत्वाचा घटक म्हणजे धन. पैशाची जमवाजमव झाली की वरील अधिकाऱ्यांमार्फत कामे सुरु होत असत. व वेळेचे महत्वं ही दिलेले असे. जर बांधकामाला वेळ लागला तर खर्च जास्त होणार म्हणून अशी बांधकामे वेळेत केलेली आढळतात. पैशामुळे कुठलीही कामे रखडलेली नाहीत. हे ही इथे लक्षात घेण्यासारखे आहे.

## अधिकारी वर्ग:- कर्तव्य व जबाबदारी

**वाड्याचे बांधकाम करत करताना पावसासह प्रतिकूल हवामानाचा त्यावर परिणाम होणार नाही. भूकंप झाला, महापूर आला, कितीही मोठ वादळ आलं तरी त्याची एक विट ही हलता कामा नये असे नियोजन आणि आरेखन तयार करत असणार.** तसेच या संपूर्ण आरेखन रचनेत महान संकेत आणि अद्भूत शास्त्र लपलेली आहेत, त्याचा बारकाईने अभ्यास केला की लक्षात येते. बांधकामशास्त्र, जोतिषशास्त्र, अंकगणितशास्त्र, अशा वेगवेगळ्या विषयातील तज्ञांनी मिळून आराखडा तयार केलाला दिसतो हे लक्षात येते. **वाडा बांधताना महाराष्ट्रीयन तंत्रज्ञान व जवळच उपलब्ध असणारे साहित्य वापरून ग्रामीण स्थानिक मजूर अत्यंत स्वल्प दरात आणि विपुल प्रमाणात मिळत असतं. अशा मजुरांनकडून उत्तम गुणवत्तेचे वाडे बांधलेले दिसतात.**

वास्तू बनवण्याच्या आगोदर ती वास्तू कमीत कमी दोनतीनशे वर्षे टिकावी या दृष्टीने विचार केलेला दिसतो. त्यासाठी त्यांनी काय प्रायोजन केले असेल हे अभ्यासले असता असे लक्षात येते की, वाड्याचे नियोजनबद्ध कामकाज हेच त्याचे मुख्य कारण

आहे. स्थापत्य शास्त्रातील निष्णात तंत्रज्ञानाविना कोणतेही बांधकाम पूर्णत्वाप्रत जाऊच शकणार नाही. वाडा बांधकामाच्या शास्त्राचा विचार केला तर या शास्त्रातील मंडळी तज्ञ असणार. आणि त्यांनी नेमलेली शास्त्रांच्या संबंधित मंडळी ही त्या शास्त्रातील अतिकुशल अशीच असणार. ते सर्व कामांचे व्यवस्थित नियोजन करून घेऊन काम पूर्ण करत असणार. पाच दहा वर्षे तरी वाड्याचे बांधकाम चालणार, ही प्रचंड कामे समर्थपणे तांत्रीक दृष्ट्या परीपुर्णतेने पेलु शकणाऱ्या व्यक्ती हाताशी असणार. आराखडा तयार केल्यानंतर कलावंत, स्थपती, वास्तुविशारद, बेलदार, पाथरवट, सुतार, गवंडी, रंगारी यांच्यामध्ये अखंडपणे संवाद चालू असणार.

अभियंत्यांच्या शब्दकोशात "**नाही**" हा शब्दचं नसणार. या अभियंत्यांनी अनेक अडचणीवरही तोड काढलेली असणार. पूर्वीची बांधकामे ही मेन्टेंनन्स फ्री बांधकामे किंवा वन टाइम कन्स्ट्रक्शन कामे म्हणून ओळखली जातात. बांधकामे करताना अशा प्रकारची पद्धती वापरली गेली की बांधकामासाठी वापरलेला दगड एक वेळी झिजून जाईल परंतु बांधकामासाठी वापरलेले साहित्य जसेच्या तसे राहील असे बनविले गेले. यावर काम करणारे खास लोक R & D रिसर्च आणि डेव्हलपमेंट विभाग असावा हे निश्चित.

**रोजगार निर्मिती म्हणजे काय याचे उत्तम उदाहरण म्हणजे गावोगावी बांधलेले वाडे. तत्कालीन गरजेनुसार स्थानिक पातळीवर उपलब्ध मनुष्यबळ व साहित्याचा वापर करून बांधले गेले होते. बारा बलुतेदारापैकी सुतार, लोहार, चांभार, कुंभार आणि स्थानिक मजुर गवंडी, पाथरवट, बेलदार, रंगारी अशा कित्येकांचा थेट सहभाग बांधकामामध्ये असे. साध्या ग्रामीण मजुरांनी माती, दगड, लाकूड यांचा वापर करून तयार केलेली सर्वउत्कृष्ट निर्मिती म्हणजे वाडा. अत्यंत जुन्या वाड्याला लोखंडी खिळ्याचा सुद्धा वापर केलेला नाही. लोखंडाचा वापर नंतरच्या काळात दिसून येतो. अशा प्रकारे एकावर अवलंबुन असणारे दुसरे काम म्हणजे एक प्रकारचे टिमवर्कच होते.**

संगणक नाही, अत्याधुनिक साधने नाहीत, सिमेंटकॉंक्रीट नाही, लोखंड नाही, खिळे नाहीत. फक्त दगड, माती, लाकूड या पासून वास्तू निर्माण करण्याचे धनुष्य तत्कालीन अभियंत्यांनी लिलया पेललेले दिसते. मालकाच्या मनातील भव्य वाड्याला निव्वळ प्रत्यक्षात आणले नाही तर मजबूतही बनवले. मजबूत किती. चारपाचशे वर्षांनंतरही अशा वास्तू त्या अभियंत्यांच्या

विद्वत्तेची, कौशल्याची कहाणी सांगत आजही ताठ मानेन ऊभी आहेत. आजकालच्या लेझर किरणांच्या तोडीस तोड तंत्रज्ञान, बांधकामातले कौशल्य अचंबीत करते. अतिशय अवघड असे हे तंत्रज्ञान, या तंत्रज्ञानाविषयी फारशी माहिती ऊपलब्ध नाही, पण हे लोक फारचं प्रगत तंत्रज्ञान वापरत होते यात शंकाच नाही.

वाडा पुढच्या दोन-तिनशे वर्षांत ओसाड पडेल, असे तेव्हा कोणाला स्वप्नातही वाटले नसेल. आजही भल्याभल्या अभियंत्यांना तोंडात बोटे घालायला लावणाऱ्या वाड्याची रचना, बांधणी त्याकाळी कशी केली असेल या विचाराने थक्क व्हायला होते. जेव्हा आपण इतर संस्कृतीच्या त्यांनी निर्माण केलेली कलाकारी आपल्याला छान वाटते. पण आपल्या संस्कृतीने जगाला काय दिलेलं आहे ह्याचं थोडेही ज्ञान आपल्याला नसते. वाडा म्हणजे आपल्या संस्कृतीचा, कलेचा, प्रगतीचा, तंत्रज्ञानाचा सर्वोच्च अविष्कार आहे असं म्हटल्यास वावगं ठरणार नाही. आपण आपल्याच संस्कृतीत डोकावून बघत नाही, त्यामुळे आपल्या कलेचा सर्वोच्च अविष्कार आज आपल्या पिढीपासून दुर्लक्षित आहे. आपल्या पूर्वजांनी निर्माण केलेल्या वाड्यात असं काय आहे की जे बघण्यासाठी प्रत्येक परदेशी पर्यटक आतुर असतो.

पूर्वी हे करताना अभियांत्रिकीच्या सगळ्याच शाखेच्या विद्वान लोकांनी एकत्र येऊन कला, संस्कृती, वाड्याचा आत्मा ह्याला धक्का न पोचवता त्याच निर्माण करायचं. बर नुसतं बांधून नाही तर काळाच्या कसोटीवर म्हणजे उन, वारा, पाउस हया सोबत वादळ, भूकंप, स्तुनामी अश्या नैसर्गिक आपत्तीचा विचार करून जागा शोधायची. त्या जागेमध्ये बांधकामाच्या साहित्यचां साठा निर्माण करायचा. काळाच्या कसोटीवर कसं उभं राहील हे बघायचं. हे सर्व पेलताना त्याची भव्यता राहिली पाहिजे. किती प्लानिंग आणि रींसोर्सेस यासाठी लागले असतील. बर त्या काळी संगणक नसताना सगळी गोळा बेरीज डोक्यात करून मग समोरच्याला ते सांगणे किती अवघड असेल.

सहज विचार केला की आपल्या डोक्यात असलेली एक साधी घराची कल्पना सांगण्यासाठी आज किती पर्याय आहेत. कॉम्पुटर, ग्राफिक डिझायनिंग, फोटो, थ्रीडी मोडेल, थ्रीडी व्हू, cng मशनरी आहेत. चित्रकाराला आपल्याला हवं तसं चित्रित करायला सांगतो.नाही पसंत पडल की परत करायला सांगतो. त्यानंतर आपण आर्किटेक्टकडून प्लान तयार करतो. प्लान तयार झाल्यानतंर अभियंत्याकडून बनवायला सुरुवात करतो. तो कारागिरांना प्लान दाखवून जे चित्रकाराने दाखवलं आहे ते जिवंत

करायला सांगतो. ही झाली आत्ताची पद्धत. म्हणजे बघा हया सगळयाचा उपयोग करू तेव्हां आपण कुठे जाऊन आपल्याला काय हवे आहे हे इंटिरियर डिझायनरला कळते. तर तेव्हांच्या लोकांनी हे कसं केलं असेल.

वाड्याच्या मालकाच्या मनात असलेली प्रतिकृती तशीच्यातशी उतरवणे आणि हे दिव्य पेलणे म्हणजे प्रचंड अशी कलासाधना तर आहेच. त्याशिवाय आपल्याला अवगत असलेल्या विज्ञानाचा, तंत्रज्ञानाचा तो सर्वोच्च आविष्कार आहे त्या शिवाय हे शक्यच नाही. याचा अर्थ, **त्या काळात नकाशाशास्त्र इतकं प्रगत होतं की अक्षांश- रेखांशांचं परिपूर्ण ज्ञान, नकाशा शास्त्राबरोबरच कंटूर नकाशाच ज्ञान त्यांना होतंच. इतर कुठली एखादी पध्दत त्या काळात वापरली गेली, जी आज काळाच्या पडद्याआड गेलेली आहे. हे मात्र काही कळायला मार्ग नाही.**

त्याकाळातील प्रशिक्षित मनुष्यबळ ही तेवढ्याच तोलामोलाचे असणार. कामे नाना प्रकारची असतं. म्हणजे अगदी ज्या जागी बांधकाम करायचे तिथली झाडी तोडण्यापासून ते इमारतीमधील शेवटचा खिळा ठोकला जाईपर्यंत नाना परींची कामे असतं. नेमून दिलेल्या अधिकाऱ्यांकडून हे काम करून घेतले जात असे. यांच्या खेरीज वडार, बेलदार, गवंडी, पाथरवट, सुतार, रंगारी,

रात्रीची कामे होत असतील तर दिवाबत्तीची सोय करणारे. वाड्यातून पावसाच्या पाण्याचा व दैनंदिन पाण्याचा निचऱ्याची माहिती असणारे (प्लंबर). आग व चोरी पासून संरक्षण करण्यासाठी नेमलेली माणसं, मटेरियल पुरवणारे, असे हुन्नरी लोक वाडा उभारणीच्या कामी अतिशय महत्त्वाचे असतं.

वडार, बेलदार, दगडांच्या खाणी पाडण्यात व खाणीतले दगड बांधकामापर्यंत वाहून नेण्याच्या कामी येत. पाथरवटाच्या छन्न्या-हातोडे दगडांचे घडीव चिरे बनवित. गवंडी बांधकाम रचत. सुतार लाकडी कप्प्या, दारे, खिडक्या त्यांच्या चौकटी, तुळया, वासे, सुरूदार खांब. अशा वस्तुची घड़ाई करत. या वस्तुंचा पुरवठा ही जबाबदारी ठराविक लोकांवर सोपवलेली असे.

याशिवाय नकाशे, संकल्पित आराखडे काढणारे, चितारी, रंग भरणारे रंगारी वगैरे आवश्यक तंत्रज्ञान जाणणारी हुन्नरवंत माणसे ही असत. होत असलेले बांधकाम योग्य तऱ्हेने होत आहे अथवा नाही आखलेल्या आराखड्यानुसार होत आहे अथवा नाही हे पाहण्याचे काम स्थपती, वास्तुविशारद, मुकादम करत असणार.

प्रत्यक्ष काम करताना काही सुधारणा आवश्यक भासल्यास ती करण्याची जबाबदारी सुद्धा यांच्यावरच असणार. त्याचा निर्णयही जागेवरच करत असणार. भला मोठा विस्तार व

विविध प्रकारची बांधकामे बघीतली तर प्रश्न पडतो की, हे सगळे कसे निर्माण केले असेल. असंख्य कसबी हात या बांधकामाला लागलेले असायचे बांधकाम पुर्ण होईपर्यंत ते स्थळ म्हणजे एक गजबजलेले गावच असायचे अधुनिक नव्या इमारतीचे काम जसे चालते तसेच वाड्याचेही बांधकाम होत असणार.

वरील सगळया गोष्टीचा विचार करता माझं मन सुन्न झालं. ही भव्यता आज पाचशे पेक्षा जास्त वर्षे टिकून आहे. आज सगळी टेक्नोलॉजी उभी केली तरी हया भव्यतेची कलाकृती उभारणं आजतरी शक्य नाही. आपल्या पूर्वजांनी कलेचा, तंत्रज्ञानाचा, विज्ञानाचा सर्वोच्च अविष्कार हजारो वर्षापूर्वीच दिला आहे. आम्हीं तंत्रज्ञानात सर्वात पुढे आहोत तेव्हां हया अशा वास्तू, शिल्पे पाहिली की आधुनिक मानवाचे गर्वहरण झाल्याशिवाय रहात नाही.

ज्यावर बाहेरील देशातील लोक आपल्या कलेचा अभ्यास करून पुस्तकं लिहितात. पण आपण भारतीय कुठेच नाहीत. **एक साधी डॉक्युमेंट्री पण ह्यावर नाही हेच बरचं काही सांगून जाते.** महाराष्ट्राच्या अस्मितेचा ठेवा म्हणून कलेचे, संस्कृतीचे, विज्ञानाचे, विद्यापीठ असणारे वाडे भारताची प्रतिमा जास्ती

उजळवते ह्यात शंका नाही. हा वारसा आपण हरवून बसलो आहोत तो मिळवण्यासाठी पुन्हा एकदा अभ्यासाची गरज आहे. महाराष्ट्रातील वाड्याबद्दल जेंव्हा ऐकल, वाचल तेंव्हा नतमस्तकचं व्हालं.

वाडा निर्माणाचे स्थपती कोण, वास्तुविशारद कोण, ठेकेदार कोण आणि असंख्य इतर कलाकार कोण, यांचा कुठे ऊल्लेखही नाही. त्यांचा ना कुठे ऊल्लेख ना त्यांची कोणाला आठवण. हे महान शिल्प घडविण्यात असे लाखो, करोडो झटले, कधी मेले, कुठे मेले कोणालाचं माहिती नाही.

## वाडा बांधकामात मुक्या प्राण्यांचाही मोलाचा वाटा.

वाडा बांधकामाच्या उभारणीत असंख्य हातांची सेवा तर आहेचं. त्याही पलीकडे जावून एकजुटीचे भक्कम प्रतीक आहे. वाडा बांधकामाच्या उभारणीत मनुष्याबरोबरच मुके पाळीव प्राणी म्हणजे बैल, हत्ती, घोडे, गाढव, खेचर यांचे योगदान खूप मोलाचे ठरलेले आहे. सुरू असलेल्या कामासाठी दगड, विटा, वाळू, माती, लाकूड, चुना असे आवश्यक ते सर्व अवजड साहित्य आपल्या पाठीवरून वाहून नेण्यात गाढवांचा ताफा आघाडीवर असे. गाढवांकडून खाली मान घालून केल्या जाणाऱ्या या सेवेचे खूप वेगळेपण आहे. आणि ऐतिहासिक बांधकामात एक एक चिरा त्यांच्याही कष्टातून रचलेला आहे. हे सूक्ष्म अभ्यासांती लक्षात येते.

सर्वात कठीण काम होते ते खदानी मधून काढलेली माती, वाळू, चुना असे साहित्य वाडा बांधकामाच्या जवळ ओझी वाहून नेण्याचे. किंवा वाडा बांधकामातील पायाच्या खोदाईमधील माती, मुरूम वाहून बाहेर टाकण्याचे. आताचे सारखे जेसीबी,पोकलेन, डंपर, मालट्रक, टॅक्टर नव्हते. असे अवजड साहित्य वाहून नेण्यासाठी गाढवांच्या वापराचा पर्याय होता. त्यांच्या अंगी असलेला काटकपणा, चिकाटी आणि सहनशीलता या गुणांमुळे गाढवं उपयुक्त ठरलेली आहेत. कठीण मार्गावरून दुर अंतरावर जड

ओझी वाहून नेण्याच्या कामी त्यांचा फार उपयोग होत असे. भर उन्हात आणि प्रतिकूल परस्थितीत देखील ती कणखरपणे काम करतात. पूर्वीच्या काळापासूनच गाढवांच्याकडून ओझे वाहून नेण्याचे काम करून घेतले जात असे.

अशा कामासाठी पंचवीस गाढवापासून दोनशेदोनशे गाढवांचा ताफा असे. बांधकाम साहित्य गाढवाच्या पाठीवर लादले की ठरलेल्या ठिकाणी ते ओझे घेऊन गाढव जाते. तिथे उभ्या असलेल्या माणसाकडून त्याच्या पाठीवरील ओझे उतरवून घेतले की परत गाढव न थांबता ठरलेल्या ठिकाणी येत असे. त्यांना हाकण्यासाठी माणसांची गरज नसे. अशा पद्धतीने त्याच्या फेऱ्या होत असत. गाढवावर त्याच्या ताकदी नुसार ओझे लादले जाते. एकदा त्याने पाठीवर ओझे घेतली की. मध्ये वाटेत कुठेही बसत नाही. पण तरीही गाढव राबते म्हणून त्याला कितीही राबवून घ्यायचे नाही म्हणून गाढवाकडून सकाळी दोनतिन तास व दुपारी उंन कमी झाल्यावर दोनतिन तास काम करून घेतले जाते. जुन्या बांधकामात गाढवांचे योगदान खूप मोठे आहे. पण सरळ काम न करणाऱ्याला गाढव म्हणून उपमा देतो. पण चित्र वेगळे आहे. गाढव खूप सरळपणे कष्टाचे काम करते. पल्या धन्याला उदरनिर्वाहासाठी मदत करते. जुन्या बांधकामात गाढवांच्या कष्टाची खरेच वेगळी नोंद ठेवावी लागेल असे प्रकर्षाने वाटते.

## भूपरीक्षा

वाडा, गढी बांधण्याअगोदर सर्वात मोठी कसोटी असते ती जागा ठरवणेची. कोणत्या जमिनीवर, कुठे बांधायचे. जमीन कशी असावी, कोठे असावी, कोठे नसावी, तिचे रंगरुप, गंध, स्पर्श कसे असावे, हे आपण आता पाहणार आहोत.

पूर्वीच्या काळातील वास्तुशास्त्र हे अत्यंत प्रगत आणि प्रभावी होते. शिल्पशास्त्रावरील अनेक ग्रंथ लिहिलेले आहेत. सर्व ग्रंथात "भूपरीक्षा" नांवाचा स्वतंत्र आध्याय आहेत. पूर्वी गाव वसविण्यासाठी अनुकूल गोष्टींची समृद्धता आहे की नाही ते पाहणी करण्याची पद्धत होती. जेथे गोड व शुद्ध पाणी भरपूर उपलब्ध आहे. मोठ्या नद्या वाहतात. जमीन मजबूत व शेतीकामास उत्तम असते. पिकं खुप मोठ्या प्रमाणात घेऊ शकतात. जमीन झाडेझुडपे, हिरव्या गवताने झाकलेली आहे. असा प्रदेश गांव वसविण्यासाठी प्रशस्त असतो.

बांधकामासाठी जागा निवड करतांना मुख्यत: तिचा आकार व त्या जमिनीचा कोणत्या दिशेला उतार आहे हे पाहतात. जमिनीचा आकार वर्तुळाकार, अर्धचंद्रकार, त्रिकोणी, पाच, सहा

कोन असलेली, लांबलचक, मध्यभागी रुंद व दोन्ही टोकास अरुंद, दोन बाजू खूप लांब व एक बाजू एकदम लहान, मासा, हत्ती, कासवाच्या पाठीसारखा आकार अशा गोष्टी बांधकामाची जागा निवडताना बघितल्या जातात.

जमिनीची उपयुक्तता ती कोणत्या दिशेला उतरत गेली आहे यावरुनही ठरवतात. पूर्व व उत्तर दिशेला उतार असलेली जमीन शुभ समजतात. पश्चिम व दक्षिणेकडे उतार असलेली जमीन त्याज्य समजतात. जागा निवड करतांना तिचा आकार कसा असावा आकारमानाने जेव्हा एखादी जमीन आपण बांधकामासाठी निश्चित करतो, त्यानंतर जमिनीचे सुक्ष्म परीक्षा करुन ती जमीन पायासाठी योग्य आहे की नाही हे ठरवितात.

**सुक्ष्म परीक्षणाचे दोन प्रकार असतात.**

**पहिला प्रकार दृष्टी निरीक्षण:-** दृष्टी निरीक्षण म्हणजे पंचेन्द्रीयांनी इतर कुठलेही साधन न वापरता मातीची परीक्षा करणे.

**जमीनीचा रंग:** माती सर्वत्र एकाच रंगाची असावी, वेगवेगळ्या रंगछटा असलेली नसावी. पांढऱ्या रंगाची माती

पायासाठी सर्वोत्तम, त्यानंतर पिवळ्या व तांबड्या रंगाच्या मातीचा क्रम लागतो. काळ्या व निळ्या रंगाची माती निकृष्ट असते. अशा ठिकाणी शक्यतो कोणतीही वास्तू बांधत नसत.

**गंध:** माती सुगंधित असावी. तिला कुंकू, कापूर, चंदन यांच्या मिश्रणासारखा सुवास असावा. कमळ, कण्हेर, मालती, चाफा या फुलांसारखी माती सुवासिक असावी. ज्या मातीला शुद्ध तुपासारखा सुगंध आहे ती सर्वोत्तम, ज्या मातीला गोमूत्र, दुध, दही, किंवा नुकत्याच दळलेल्या पिठाप्रमाणे वास येतो अशी माती वास्तूच्या पायासाठी उत्तम असते. गटारातून येतो तसा घाण वास, स्मशानातील मातीला असतो तसा वास, जळकट वास, प्रेत, तेल, पक्षी किंवा माशांप्रमाणे ज्या मातीला दुर्गंधी येते ती त्याज्य समजावी..

**रस:** चवीप्रमाणे मातीचे तीन भेद केले आहेत. ज्या मातीचा स्वाद सुरुचीपूर्ण आहे ती उत्तम, जिची चव तिखट किंवा आंबट आहे ती मध्यम स्वरुपाची व जिची चव खारट किंवा कडू आहे अशा मातीवर वास्तू बांधू नये.

**ध्वनी:** मातीला ठोकले असता जसा ध्वनी येईल त्यावरुन पायाचा अंदाज घेतला जातो. ज्या मातीचा आवाज मृदंग, बासरी, नगारा, तुतारी सारखा आवाज येतो, घोड्याच्या खिंकळण्यासारखा खणखणीत किंवा सागरगर्जने प्रमाणे गंभीर आवाज येतो ती माती उत्तम समजावी.

उंटाच्या गडगडण्याप्रमाणे, गाढवाच्या ओरडण्याप्रमाणे किंवा ओढ्यात उथळपणे वाहणाऱ्या पाण्याप्रमाणे अथवा फुटक्या मडक्याप्रमाणे टिचका आवाज असणारी माती जमीन पायासाठी योग्य नाही.

**स्पर्शमान:** जी जमीन स्पर्शास मऊ व सुखद असून हिवाळ्यात उष्ण व उन्हाळ्यात शीतल असते ती चांगली समजतात. जी जमीन स्पर्शास रुक्ष आहे व जिचे तापमान रुतूप्रमाणे न बदलता ऊष्ण किंवा थंडच राहते ती त्याज्य समजावी.

**इतर काही लक्षणे:** ज्या जागेजवळ पूर्वी स्मशान होते, ज्या जागेत खोल खड्डे असून झाडांच्या मूळांनी फटा पडल्या आहेत. ज्या जमीनीत वारुळे, मृत प्राणी, केस, हाडे, धान्याचे तुष हे जास्त प्रमाणात आहेत ती त्याज्य समजावी. ज्या जमीनीत

कुजक्या लाकडाचे तुकडे, अर्धवट जळालेले कोळसे, अगर राख, मृत प्राण्यांची हाडे अशी जमीन असेल तर ती पायासाठी योग्य नसते. अशा ठिकाणी वास्तू बांधली असता ती सतत दबत जाते, म्हणून वास्तू लवकर मोडकळीस येते, आधुनिक भूविज्ञानशास्त्रज्ञ सुद्धा अशी जमीन पायासाठी अयोग्य समजतात.

**दुसरा प्रकार मातीवरील चाचण्या:-** मातीवर वेगवेगळे प्रयोग करुन जमीन पायासाठी योग्य आहे की नाही ते ठरविणे. वरील दृष्टी निरीक्षणातून जी जमीन योग्य समजली जाईल तिच्यावर प्रयोग करुन तिची अधिक परिक्षा घेतली जाते. यातून मातीची घनता, सच्छिद्रता याची माहिती मिळते.

**पहिला प्रयोग:** मातीची मजबूती घनता जाणण्यासाठी एक हात लांब रुंद व तितकाच खोल खड्डा खणून, जी माती खड्डा खणतांना बाहेर काढली तीच माती पुन्हा त्या खड्ड्यात दाबून भरायची, माती उरली तर जमीन उत्तम, पूर्वी इतकाच खड्ड्यात माती बसली तर जमीन मध्यम व सर्व माती खड्यात बसून पूर्वरत जमीन होण्यासाठी अजून मातीची गरज लागणार असेल तर जमीन निकृष्ट. अशा ठिकाणी वास्तू बांधू नये.

**दुसरा प्रयोग**: खड्डा खणून तो काठोकाठ पाण्याने भरावा. नंतर खड्यापासून सावकाश शंभर पावले दूर जाऊन त्याच गतीने खड्ड्यापाशी यावे. जर पाण्याची पातळी तितकीच राहीली तर जमीन उत्तम. पाण्याची पाकळी कमी झाली तर मध्यम जमीन व पातळी खाली गेली तर कनिष्ठ प्रतीची समजावी. काही वास्तूशास्त्राच्या पुस्तकात हे प्रमाण वेगळे दिलेले आहे. अशा पद्धतीने भूमी परीक्षा होत असे.

## वाडा बांधकाम साहित्य

### १) मातीचे भेंडे :-

वाडा बांधण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या मातीच्या विटांना भेंडे म्हणतात. वाडा बांधण्यासाठी पूर्वी कांही ठिकाणी मातीचे भेंडे तर कांही ठिकाणी भाजलेल्या चपट्या सपाट विटा वापरत असतं. पूर्वी आपल्या पूर्वजांनी मातीचे परीक्षण करून विशिष्ट अंदाज बांधण्यासाठी स्वतःची अशी शैली विकसित केलेली होती. अनेक ठिकाणच्या मातीचे नमुने गोळा करून त्याच्या चाचण्या घेत.

पाणथळ जमिनीत उभे व आडवे चर करून खोदून घेतात, पावसाळ्यात पावसाचे पाण्याबरोबर माती वाहून त्या चरात बसते अशी माती काढून घेऊन त्या मातीमध्ये योग्य ते पदार्थ मिसळून ती माती बांधकामात वापरत असत. ज्या ठिकाणची माती उत्तम प्रकारची आहे असे लक्षात आल्यावर ती माती भेंडे किंवा विटा तयार करण्यासाठी वापरत असत. प्रथम ती माती चाळून घेत. चाळलेली माती २१ दिवस भिजत ठेवली जाई. त्यामध्ये गुळ, बेल, भेंडी, गाईचे शेण, डिंक, घोड्याची लीद, साबुदाणा, कात, ताग, उडदाचे पीठ, जवसाचे पाणी, गुगुळ, हिरडा, बेहरडा, आवळा, बाबळीच्या बिया असे चिकटपणा निर्माण करणारे पदार्थ त्यात मिसळले जात. माती एकजीव व मऊ होण्यासाठी ती रोज रेडा,

हत्ती, बैल किंवा माणसं यांच्याकडून तुडवली जाई. माती एकजीव झाल्यावर त्याच्या विशिष्ट आकाराच्या विटा तयार करीत. अशा विटांना भेंडे असे म्हणतं.

भेंड्याचे आकार वेगवेगळे असून खालच्या बाजूला मोठाले तर वरच्या बाजूला छोटे भेंडे असत. तयार झालेले भेंडे प्रखर उन्हामध्ये वाळविले जात. पावसाचा त्यावर प्रत्यक्ष परिणाम पाहण्यासाठी त्या पावसात भिजत ठेवत. किंवा पाण्याच्या धारेखाली धरून त्याची परीक्षा घेतली जाई. वाळलेल्या भेंड्यावर टिकावाचे अथवा पहारीचे घाव घातले असता, मार लागला तेवढा छोटासा टवका उखडला जातो. एक भेंडा एका व्यक्तीला उचलणार नाही याची खात्री केली जाई. अशा पद्धतीने भेंडे तयार करत व चाचण्याही करत असत.

**पूर्वी बांधकामात सिमेंट वापरलं जात नव्हतं. त्याला पर्याय होता पांढरी माती. ही माती चिवट असायची. उन, वारा,पाऊस, धरणीकंप यांचा तडाखा सोसून गेली तीनचारशे वर्षे झाली तरी पांढऱ्या मातीच्या भिंती, बुरुज, वाडे, गढ्या आजही सुस्थितीत आहेत. आत्ताच्या सिमेंटलाही मागे टाकेल अशी ही पांढरी चिवट माती यावर संशोधन व्हायला पाहिजे.**

वाड्याचे बांधकाम करताना परिसरातील सहज उपलब्ध होणारे दगड, माती, विटा, चुना, लाकूड मनुष्यबळ, कारागीर यांचा


वापर करण्यावर भर असे. अशा सोयी बरोबर संरक्षण हा घटक देखील महत्वाचा मानला गेला आहे.

माती कोणतीही असो त्यामध्ये बिया रुजतात, गवत उगवते, झाडे उगवतात परंतु वाड्याच्या बांधकामासाठी वा बुरुजासाठी मातीचे जे मिश्रण तयार केले जाते त्यामध्ये साधे गवत सुद्धा उगवत नाही. गड, किल्ले, वाडे, गढ्या बांधणीसाठी दगडाचा मोठ्या प्रमाणात वापर केल्याचे आपण बघतो. याच दगडामध्ये वाढलेल्या झाडांमुळे तटबंदी, भिंती, बुरुज ढासळलेले आपण बघतो.

परंतु **इतक्या मोठ्या प्रमाणात माती वापरून देखील त्यामध्ये गवत, अथवा इतर झाडे वाढली नाहीत हे आश्चर्यजनक आहे. जर का झाडे वाढली असती तर असे अजस्त्र भिंती, बुरुज केव्हांच ढासळले असते. आता असा प्रश्न पडतो की, तीनचारशे वर्षापूर्वी अस कोणतं तंत्रज्ञान या मातीच्या निर्माणासाठी वापरलं होत की, ज्यामुळे ही माती दगडापेक्षाही दणकट बनवली गेली. आज इतक्या वर्षानंतरही या मातीत गवत देखील उगवत नाही. अशा अप्रतिम निर्माणकर्त्यांना मानाचा मुजरा.**



मातीच्या भेंड्याचे बुरुज आजही सुस्थितीत आहेत,दगड झिजले पण मातीच्या भेंड्यानां काहीही झालेलं नाही.



## २) चपट्या सपाट विटा.


यजुर्वेदात विटा कशा कराव्यात हे सांगितले आहे. विटांना उपयोगी असलेल्या मातीत दगडाची पूड, लोखंडाचा कीस, जुन्या खापऱ्या, बकरीचे आणि हरणाचे केस घालीत. गारा करण्यासाठी पळसाचा डिंक घातलेले उकळते पाणी वापरीत. पूर्ण वाळल्यांनंतर खड्ड्यांत रचून लाकडांनी भाजीत. भाजल्यानंतर थंड होताना बकरीचे दूध त्यांवर शिंपडीत. असा उल्लेख यजुर्वेद या ग्रंथात आढळतो.

जमिनीतून उकरून काढलेली माती उघड्या जागेत रापवितात आणि रापलेली माती भिजवून तिंबतात किंवा मळतात. या प्रमुख प्रक्रियांद्वारे विटांसाठी चिखल तयार करून घेतात. उकरून बाहेर काढल्यावर माती चाळून ढीग करून ते जरूरीप्रमाणे दोन आठवड्यांपासून चार महिन्यांपर्यंतही रापवितात. माती रापली म्हणजे तिचा बारीक चूर करतात व त्यामध्ये जरूरीप्रमाणे दुसरी एखादी माती, चुरा, राख इ. इतर पदार्थ चांगले मिसळतात व मुख्य मिश्रण तयार करतात. या मिश्रणामध्ये थोडे पाणी घालून ते मिश्रण चांगले तुडवतात. तिंबून चांगले एकजीव करतात म्हणजे चिकट मातीचा ओलसर लगदा तयार होतो.

हजारो वर्षांपासून उन्हात वाळविलेल्या कच्च्या विटा बांधकामात वापरत असत.

कच्च्या विटांपेक्षा भाजलेल्या विटा अधिक भार पेलू शकतात व जलाभेद्य बनतात. मातीला चिवटपणा असल्यामुळे तिला आकार देता येतो. भाजल्यामुळे वीट आकसत व आकुंचन पावत नाही, तिला भेगा पडत नाहीत, ती वेडीवाकडी होत नाही आणि तिचे सर्व काठ कडा चांगले धारदार राहतात. भाजली जात असल्यामुळे विटेला आकर्षक गुलाबी विटकरी रंग येतो व वीट पिवळसर होते. घराच्या भिंती, वाडे, किल्ले, घुमट, कमानी, इत्यादींकरिता विटांचा वापर केला गेला. विटांवर ग्रंथ लिहिले जात.**त्यांना इष्टिका ग्रंथ म्हणतात**. बायबलमध्ये विटानिर्मितीचा लिखित उल्लेख आढळतो. मराठवाड्यात सु. १,२०० वर्षापूर्वी पाण्यावर तरंगणाऱ्या हलक्या विटा तयार करीत. तेर, जि. उस्मानाबाद येथे अशा विटांचे बांधकाम सुस्थितीत राहिले आहे.

मातीच्या भाजलेल्या चपट्या सपाट विटा.



## ३) चुना

चुना हे पारंपारिक बांधकाम साहित्य असून सध्या वापरत नाहीत. चुना पर्यावरणपूरक, टिकाऊ मजबूत असल्याने त्याचा पूर्वी वापर होत असे. वाडा बांधकामातील अतिशय महत्वाचा घटक म्हणजे दगडाचे बांधकामासाठी व सांधे भरण्यासाठी लागणारा चुना.बांधकामामध्ये चुन्याचा वापर अतिशय महत्वाचा असे.

चुनखडी व शंखशिंपल्यापासून केलेला चुना असा दोन प्रकारचा चुना वापरला जाई. शंखशिंपले किंवा चुनखडीची बुकटी करण्यासाठी चुन्याचा घाना वापरला जाई. यामध्ये एक वर्तुळाकार चर करून त्यात ही चुनखडी वा शंखशिंपले घातले जात. व या चरात दगडी चाक ठेऊन ते खड्ड्याच्या मध्यभागी लावलेल्या खुंट्यास एका दांड्याने जोडत. बाहेरच्या टोकास बैल जोडला जाई. हा बैल गोल गोल फिरू लागला की खड्ड्यातील दगडी चाकामुळे चूनखडी, शंखशिंपले कुटले जाऊन चुन्याची बुकटी तयार होई. मग ही बुकटी आठ दिवस पाण्यात भिजवून चुन्याच्या दुप्पट धुतलेली स्वच्छ वाळू मिसळून त्यामध्ये डिंक, हिरडा, मेन, गुळ, भोकराच्या बिया, बिब्याचे द्रावण, कापूस, उडदाचे पीठ, भेंडी, जवसाचे पाणी, कदंब वृक्षांचा डिंक, त्रिफळाचे पाणी, हरबरा डाळीचे किंवा गव्हाचे

शिजवलेले पीठ, गुळाचे पाणी, खूप पिकलेल्या केळीचे चूर्ण इत्यादी घटक मजबुतीसाठी मिसळून ते मिश्रण बांधकामासाठी व सांधे भरण्यासाठी वापरेले जाई.

चुना चांगल्या प्रतीचा व्हावा म्हणून घोटला जात असे. चुना चांगल्या प्रतीचा झाला की नाही हे पाहण्यासाठी एक विशिष्ट पद्धत वापरली जात असे. मोठ्या लोखंडी कढईमध्ये पाणी भरून त्यात उंचावरून चुन्याचा गोळा लाडू करून टाकला जात असे तो फुटला नाही तर पक्का चुना तयार झाला असे समजतं असतं.

बांधकामाच्या पूर्वतयारीमध्ये चुन्याची उपलब्धता हे सुद्धा एक महत्वाचे अंग असे. या पद्धतीने तयार केलेला चुना हा ताकदीला उत्तम असतोच, परंतु भिंतीमधून होणाऱ्या पाण्याची गळती रोखण्यासाठीही तो उत्तम असतो. अशा प्रकारे तयार केलेल्या चुन्याचे मिश्रण भिंतींना गिलावा देण्यासाठीही वापरतात. चुना कसा कालवावा, कोणत्या प्रकारचा चुना घ्यावा, तो लिंपावा कसा, दगड कसे ठेवावेत ई माहिती पुढे आहेच.

समुद्रातील उधाण भरतीला तोंड देणारे चिरे समुद्राच्या लाटांचा मार खाऊन खाऊन झिजले आहेत, मात्र दोन चिरे सांधणारा चुना अजून जसाच्या तसा आहे. दगड झिजून आत गेला आहे तर चुना वितवीतभर बाहेर डोकावत आहे. अशा पद्धतीने

रचलेले बांधकामं आज अनेक शतकं ताठ मानेनं उभी आहेत. मात्र त्याची डागडुजी करण्यासाठी आज वापरलेल सिमेंट कॉंक्रीट एकाच पावसाळ्यात निखळून पडत आहे. कित्येक वाड्याचे भाग नाहीसे झाले परंतु जोते अजून शाबूत आहेत हे आपणाला पहायला मिळते. हे वास्तव बोलकं आहे.

**चुना तयार करण्यासाठी, कुटण्यासाठी बांधकामात वापरताना मजुरांच्या हाता पायांना भेगा पडतात त्या पडू नये म्हणून हातापायांना लावण्यासाठी त्याकाळी तेल ही पुरवले जात असे.**

**टीप: मालकाच्या ऐपतीनुसार व गरजेनुसार, विभागानुसार चुन्याचे बांधकाम करत असत.**



चुना तयार करण्याचा घाना. हा घाना अलीकडील काळातील आहे.



## ४) दगड

निसर्गाने शेकडो, हजारो वर्षे व्यतीत करून ज्वालामुखीच्या उद्रेकामुळे झालेल्या लावारसांपासून दगड निर्माण केलेला आहे. ज्याचा योग्य तो वापर मध्ययुगीन स्थापत्य कलेमध्ये आपल्याला दिसतो. वाडा, गढी, किल्ले, मंदिर, मूर्ती, शिल्प याकडे आपले पूर्वज खुप वैज्ञानिक, शास्त्रीय, अभ्यासपूर्ण पद्धतीने पाहत होते. त्याबाबत त्यांनी इतके विपूल लिखाण करुन ठेवले आहे की ते वाचल्यावर अक्षरशः आपण स्तंभित होऊन जातो. दगडाचे सुद्धा लिंगप्रकार असतात हे वाचल्यावरच मलाही कळाले.

दगड जमिनीतून किंवा डोंगराच्या खाणीतून काढतात. बांधकाम निर्मितीसाठी डोंगराच्या खाणीतून काढलेले दगड चांगले समजतात. त्यामागे कारण असे. जमिनीतून काढलेल्या दगडांवर ऊन, वारा, पाऊस या नैसर्गिक शक्तिंचा परिणाम जास्त होतो त्यामानाने खाणीतून काढलेल्या दगडांवर कमी होतो. दगडाचे लिंगनुसार वर्गीकरण खालील प्रमाणे.

**पुल्लिंगी दगडः** हे दगड आकाराने मोठे त्यावर ठोकले असता घंटी प्रमाणे खणखणीत आवाज येतो. आयताकृती, सौंदर्यपूर्ण, मूळापासून वरच्या टोकापर्यंत एका रंगाची, वजनदार,

घणाचा घाव घातला असता जिच्यातून अग्निस्फुल्लिंग बाहेर पडतात असे दगड पुल्लिंगी समजतात.

**स्त्रीलिंग दगड:** हे दगड मध्यम आकाराचे, तालवाद्याप्रमाणे जिच्यातून आवाज येतो. मूळाच्या बाजूला जाड व टोकाच्या बाजूला मूळापेक्षा कमी जाड, मध्यम आकाराची, स्पर्शाला शीतल लागणारी शिळा स्त्रीलिंगी समजतात.

**नपुंसकलिंगी दगड:** हे दगड आकाराने लहान, गोलगरगरीत, रुक्ष, बद्द आवाज येणारा, मूळाला लहान व टोकाला जाड, त्रिकोणाकार किंवा ज्याच्या एक बाजूची लांबी समोरील बाजूच्या लांबीपेक्षा फारच लहान असते असा दगड नपुंसकलिंगी असतो. पुल्लिंग दगड भिंत व शिखर बांधकामात, स्त्रीलिंगी दगड अधिष्ठान व उपपीठ बांधतांना, नपुंसकलिंगी दगड पायासाठी वापरतात.

नैसर्गिकरित्या मिळणारे व वाडा बांधकामातील प्रमुख घटक म्हणजे दगड होय. दगड बांधकामाविषयी सांगावयाचे झाल्यास त्याची अत्यंत सोपी व्याख्या दिली जाईल. बलदंड शत्रूचे आक्रमण रोखण्यासाठी उभारलेला अडथळा. ऊन, वारा, पाऊस व इतर कारणांनी कण सुटे होऊन दगडाची झीज होण्याचे प्रमाण

फारच कमी असते. त्यामुळे बांधकामासाठी फार पूर्वीपासून दगडाची निवड आपल्या पूर्वजांनी केलेली आहे. आत्ताच्या सारखं वापरा आणि फेकून द्या असं नाही.

जुने बांधलेले वाडे पाहिल्यावर पहिला प्रश्न पडतो की हे बांधण्यासाठी एवढे दगड आणले कुठून ? कसे आणले असतील, त्यावेळचे रस्ते कसे असतील. किल्ला बांधण्यासाठी दगड किल्ल्यातूनच काढले जातात. नंतर त्या दगडाच्या खाणीचे रूपांतर पाण्याच्या टाक्यात, तलावात केले जायचे. अशा प्रकारे किल्ल्यासाठी लागणाऱ्या दगडाची गरज भागून किल्ल्यावर पाण्याचे साठे तयार होत. वाड्याच्या बांधकामाचे काय.

बांधकाम सुरू करावयाचे म्हटले की प्रथम दगडाच्या खाणी कुठे काढायच्या त्यासाठी पाहणी होत असे. दगडाची खाण नक्की झाली की, त्या खाणीतून आपल्याला लागेल तेवढा दगड निघेल ना हे पाहिले जाई. त्या खाणीतील दगडाच्या चाचण्याही होत असे. दगडांचा रंग, टिकाऊपणा, कणखरपणा, अग्नि प्रतिबंधकता, आम्लाचा परिणाम. अशा त्या चाचण्या असत.

**५) खाणीमधुन दगड काढण्याचे प्रकार.**

फार वर्षापूर्वी खाणीतून दगड काढण्याचे वेगवेगळे तंत्र लोकांनी वापरलेले आहे. त्यापैकी काही प्रकारे दगड कसे काढत असत ते पाहुयात.

क) **दगडाचा पृष्ठभाग तापवून:** पुर्वीचे लोक झाडांचा पालापाचोळा, वाळलेले गवत, जंगली वाळलेल्या झाडांच्या फांदया यांचा ढिग करून खडकाच्या पृष्ठभागावर ठेऊन तो ढीग पेटवुन देत. त्यामुळे दगडाच्या पृष्ठभागावर मोठ्या प्रमाणात उष्णता निर्माण होऊन खडकाचा पृष्ठभाग तडकतो. त्याचवेळी तापलेल्या पृष्ठभागावर लगेच पाणी ओततात. त्यामुळे दगडाचा पृष्ठभाग थंड होऊन तो आकसतो. त्यास तडे पडतात. मग पहारीच्या साहाय्याने असे दगड सुटे करुन काढत असत.



दगड तापवत असताना

ख) **दगडाच्या पृष्ठभागावरील** माती काढून दगड मोकळा करत व खोदावयाच्या ठिकाणी रेषा काढीत. त्या रेषेवर खडकात अंतरा अंतराने चौकोनी भोके पाडीत, नंतर या भोकामध्ये वाळलेल्या सुक्या लाकडाचे चौकोनी ठोकळे घट्ट ठोकीत. त्या लाकडी ठोकळ्यावर पाणी ओतून ते फुगवतात. लाकडाचे ठोकळे फुगले की खडकाला भेग पडून फट पडे. खडकात शिल्पाकृती खोदताना प्रथम ढोबळ मानाने आखणी करीत खुंटया ठोकून तो दगड फोडून घेत असत.

ग) **पहारीचा उपयोग करून:** ज्या दगडाचे थर स्पष्ट दिसतात. अशा दगडामधील लहानलहान भेगामध्ये ठिकठिकाणी छिन्नी ठोकून दगड सुटे केले जातात. नंतर पहारीच्या साहाय्याने ते दगड उचकटून काढले जातात. या प्रकारामध्ये मोठमोठाले दगडाचे ठोकळे काढले जातात.

घ) **सुरूग लाऊन :** ज्या ठिकाणचे खडक अतिशय कणखर असेल तेथील दगड सुरूग लाऊन काढले जात. दगडामध्ये ठिकठिकाणी भोके पाडून त्यामध्ये सुरूगाची दारु सुतळीवाती सह घालून ती भोके वाळूने व्यवस्थीत बंद करतात. सुतळीवात पेटवून स्फोट घडवून आणतात. सुरूगाचा स्फोट होताच

त्याचा धुर व जाळ दगडाच्या पृष्ठभागामध्ये कमीतकमी अंतर असलेल्या भेगामधून बाहेर पडण्याचा प्रयत्न करतो. धुराचा व जाळाचा हा सर्वात जवळचा बाहेर येण्याचा मार्ग त्याला न्युतनम विरोध रेषा म्हणून ओळखला जातो. याचाच अर्थ असा होतो की, सुरुंगाच्या धुराला व जाळाला कमीतकमी तेवढा दगड फोडून बाहेर पडलेच पाहिजे.

**६) दगड वापरण्याची पद्धत:**

पूर्वी खाणीमधुन काढलेले दगड लगेच बांधकामासाठी वापरत नसत. कारण या दगडामध्ये थोडयाफार प्रमाणात दमटपणा, ओलसरपणा असतो. सुरुंग लावून फोडल्यामुळे तो ठिसूळ बनलेला असतो. हा गुणधर्म नाहीसा करण्यासाठी त्याला खुल्या हवेत एक-दोन महिने ठेवले असता उष्णतेमुळे ओलसरपणा नाहीसा होतो. आणि दगड कठीण बनतो. यालाच दगड रापवणे असे सुद्धा म्हणतात. जास्त दिवस दगड तसाच ठेवला तर तो कडक होतो. त्यामुळे घडीवकाम करण्यास फार त्रास होतो.

खाणीमधून काढलेले दगड आकारहीन आसतात. त्यांना व्यवस्थीत घडवून घ्यावे लागते. कानेकोपरे व्यवस्थीत करावे लागतात. पायामधील दगड नाही घडले तरी चालतात. ते दिसणारे नसतात. परंतु जमिनीच्या वरील दगड घडवूनच घ्यावे लागतात.

त्यामुळे त्यांना सुबकपणा येतो. ते एकमेकांवर सरळ रेषेत ठेवता येतात. बांधकाम मजबुत व आकर्षक होते. अशा दगडाची घडाई करण्यासाठी कुशल कामगारांची आवश्यकता असते.

**७) दगड घडाईचे प्रकार :-** सडकीव, माटीव, बोरट, खांडकी, बाजरी, सजगुरी, बुची, दात्री, टीचीव, मच्छी कोपरा, चौकोनी कोपरा असे घडलेल्या दगडाच्या भिंतीचे वैभव असे. आता हे प्रकार व वैभव लोप पावत चालले आहे.

दगड कितीही मोठा आणि चांगला असला तर जोवर त्याला घडवत नाही, तोपर्यंत त्याला काहीही मोल नाही. हे खूप मोठे जीवन विषयक तत्व आहे. खाणीतून दगड काढतानाच ते विशिष्ट आकाराचे काढले जातात. नंतर ते घडविण्यासाठी कोणत्या दगडापासून कोणती वस्तू घडवता येईल याचा अंदाज घेवून दगड निवडले जातात. दगडाची कठीणता पाहून कोणता दगड योग्य आणि कोणता दगड अयोग्य ठरवले जाते. जो दगड मऊ म्हणजे घडवायला सोपा तो कमजोर तर कडक म्हणजे घडवायला कठीण असणाऱ्या दगडापासून केलेल्या वस्तू अधिक काळ टिकतात हे अनुभवाचे बोल आहेत.

दगड घडवणे खूप कष्टाचे आणि वेळखाऊ काम असते. दगड घडवताना त्याचे चार टप्पे असतात त्यांना घडी असे

म्हणतात. प्रत्येक घडीची वेगळी छिन्नी असते. एका विशिष्ट हातोडीने दगड हवा तसा फोडला जातो. त्यानंतर पहिली घडी म्हणजे वस्तूच्या आकारानुसार त्या दगडाचे पहिले ओबडधोबड कोरीवकाम. त्यानंतर दुसरी घडी, ज्यात वस्तू आकार घेते. तिसरी घडी म्हणजे वस्तू ओबडधोबड स्वरुपात तयार होते आणि चौथी घडी म्हणजे वस्तूला सुबक, आकर्षक केले जाते. जेंव्हा चौथी घडी चालू असते, तेंव्हा वस्तूच्या कोरीवकामाचे चार प्रकार असून त्यांना माठ म्हणतात. पहिला हरभरा किंवा बोरठ माठ, त्यानंतर ज्वारी माठ, त्यानंतर बाजरी किंवा सजगुरी माठ आणि चौथा मातीव माठ.

प्रत्येक माठाची छन्नी वेगळी असते. हरभरा माठ म्हणजे छन्नीने एका घावात दगडाला पडलेली खोंक ही हरभऱ्याच्या आकाराची असते. ज्वारीच्या माठात ती ज्वारी एवढी आणि सजगुरी माठात ती बाजरी एवढी असते. म्हणजे वस्तू अधिक सुबक केली जाते.

मातीव म्हणजे वस्तू अगदी गुळगुळीत अशी केली जाते. देवदेवतांच्या मूर्ती अशा मातीव माठात बनवल्या जातात. एखादी वस्तू कोणत्या माठात हवी आहे त्यावर तिची किंमत ठरते. कारण सजगुरी आणि मातीव माठास खूप श्रम लागतात, **दगड कामाचे इतके प्रकार बघितल्यावर असे लक्षात येते की गुणवत्ता,**

खर्च, वेळ यासाठी आपल्या पूर्वजांनी इथेही नियोजन केल्याचे दिसते.

दरवाजा व दर्शनी भागांसाठी माटीव घडाई व बाजूने भिंतीला सडकीव अथवा बुच घडाईचे दगड वापरल्याचे दिसते. सर्वच ठिकाणी माटीव दगड वापरला असता तर दगड घडण्यासाठी वेळ लागला असता, त्यासाठी दगड ही वेगळा घ्यावा लागला असता व खर्चही जास्त झाला असता. जमिनीवर चालताना पायांना त्रास व्हायला नको म्हणून त्याठिकाणी माटीव अथवा बाजरी घडाईचे दगड वापरल्याचे दिसते. इथे एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी की



**वाड्याचे बांधकाम झाल्यानंतर दगडी जमीन सर्वात शेवटी तयार करत असतं. याकामांसाठी शिल्लक राहिलेला दगडचं वापरलेला दिसतो. अभ्यासू वृत्तीने पहिले की आपल्या लक्षात येते. जमिनीचे दगड एक सारखे नाहीत. म्हणजे दगडी जमीन बनवण्यासाठी नविन दगड विकत घेतलेला दिसत नाही.** दगड बांधकाम करताना दोन प्रकारे करतात.

**पहिला प्रकार** म्हणजे पेपर लेस ज्वाइंट बांधकाम. दोन दगडाच्या मध्ये सांधा ठेवत नाहीत. फक्त दगडावर दगड रचून बांधकाम केले जाते. अशी बांधकामे मंदिराला दिसतात.

**दुसरा प्रकार** म्हणजे दोन दगडामध्ये दहा एमएम पर्यंत सांधा ठेवतात त्यामध्ये माती, सिमेंट, चुना असा मसाला भरून बांधकाम करतात. चुन्याच्या मसाल्यामध्ये त्याच्या दर्जा भरतात. दरजा भरण्याचा प्रमुख उद्देश जरी सांध्याची मजबुती वाढविणे व पावसाचे पाणी सांध्यातून बांधकामात शिरू नये हा असला तरी बांधकामाचा दर्शनी भाग नीटनेटका दिसावा हा ही एक उद्देश असतो. दगड घडण्यासाठी वेगवेगळया छन्न्या-हातोडे लागतात. त्याशिवाय हे काम होणे शक्य नसते. म्हणून हत्यारे व त्यांचे महत्व पाहुयात.

**८) हत्यारे.**

**अ) हातोडा:** दगडाचे लहान, मध्यम आकार करण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारची हातोडी वापरतात. हातोडा हा लोखंड पोलादापासुन बनवतात. याच्या साध्या आघाताने ही दगड फुटतात. काही कमी वजनाचे तर काही जास्त वजनाचे हातोडे असतात. अर्धा किलोपासुन ते दोन किलो किंवा दहा पंधरा किलो वजनापर्यंत असतात. जास्त वजन आसलेल्या हत्याराला घन म्हणतात. घनाचा वापर मोठमोठाले दगड फोडून दोन भाग करण्यासाठी करत असत.

**ब) छन्नी**: छन्नी हे हत्यार पोलाद किंवा लोखंडापासुन बनवतात. याचा उपयोग दगडाचे दोन तुकडे करण्यासाठी व दगडावरील उंचवटा काढण्यासाठी छन्नीचा वापर करतात. छन्नीचा उपयोग करताना हातोडाही वापरावा लागतो. छन्नीच्या डोक्यावर हातोड्याने प्रहार करून पाहीजे तसे दगड तयार करता येतात. छन्नी १५ ते २० सेंमी लांबीच्या व मुठीत मावतील इतक्या म्हणजे २.५ ते ३ सेंमी जाडीच्या असतात. चिरणी, पिचर, टाकी, पंच असे छन्नीचे प्रकार आहेत.




दगड घडाईतील वेगवेगळी हत्यारे.



बुरुजावर मोठमोठी झाडे उगवली पण एकही दगड हलला नाही.

## लोहार - कोळसा आणि त्याचे महत्व.

लोहाराच्या भात्यामध्ये लोखंडाच्या किंवा पोलादाच्या वस्तू लाल होईपर्यंत तापवून व ठोकून बनवण्याच्या कामास लोहार काम म्हणतात. लोहाराच्या भट्टीकरीता लोणारी कोळसा तर कारखान्यात दगडी कोळसा वापरतात. वाड्याच्या बांधकामात लाकूड, दगड, लोखंड, मनुष्यबळ, प्राणी यांची जशी आवश्यकता होती तशीच आवश्यकता लोहार आणि कोळश्याचीही होती. वाड्याचे बांधकाम सुरू असताना अनेक प्रकारची दुय्यम कामे सुद्धा सुरु असत.

**बांधकाम सुरु झाले की साईडबाय साईड लोहाराचेही काम सुरु होई. म्हणजे दरवाजे खिडक्या यांचे हिंजेस, बिजाग्र्या, कडी, कोयंडे, रिंगा, साखळ्या, कुलपे बनवणे अशी कामे सुरु असत. पाथरवटांचे दगड फोडून, दगड घडवून छन्नीची धार बोथट होई, सुतक्या बोथट होत. बेलदरांच्या पहारीची टोके बोथट होत. मग या साऱ्यांच्या हत्यारांला धार लावण्याचे काम लोहाराचे असायचे. धार नाही लावली तर कामे लवकर होणार नाहीत. त्यामुळे वेळ व श्रम दोन्ही वाया जाणार.**

भाता, लोखंडी ऐरण, दोन तिन प्रकारचे होतोडे, घन, चिमटा, कोळसा असे साहित्य लोहाराचे असे. कामाच्या जवळच लोहाराचा ठिय्या असे. कोळसा पेटवून पहारीचे- छन्नीचे टोक गरम करून छोट्या हातोडीच्या सहाय्याने बोथट झालेल्या पहारीच्या, छन्नीच्या टोकावर घाव घालून धार करून घ्यायचे. पाणीही पाजायचे.

**पाणी पाजणे म्हणजे धार करून झालेनंतर त्याला हलकेच पाण्यात बुडवणे व लोखंडाला नरम करणे. पाणी व्यवस्थित नाही बसले तर पहारीच्या शेंड्याचा काम करत असताना लगेच तुकडा पडतो. त्यामुळे त्याला अनुभवाने पाणी किती पाजायचे तिही कलाच होती.**

अशा कामास मुबलक कोळसा लागे. कोळसा नसला तर लोहार थांबणार, लोहार थांबले की पाथरवट बेलदार थांबणार. ते थांबले की गवंडी थांबणार. अन गवंडी थांबले की बांधकाम थांबणार. म्हणून लोहार आणि कोळशाचे महत्वही तितकेच होते.

कोळशाविषयी एक म्हण आहे. कोळसा कितीही उगाळा तो काळाच राहणार. हे जरी खरे असले तरी माझ्या मते कोळशाला जर अग्नीसंस्कार केले तर तो उजाळा देतो. त्याचे निखारे तयार होतात. त्याच्या उर्जेपासून अख्खी रेल्वे ढकलली जाते. असा तो कोळसा. याचे काम जरी छोटे असले तरी कार्य फार मोठे आहे.

# लाकूड काम

ज्यावेळी वाडा, गढ्या पहायला जायचो तेंव्हा एक प्रश्न नेहमी पडायचा तो म्हणजे लाकूडकाम बघताना. दरवाजा, खिडक्या, खांब, तुळया यांचेकडे पहिले की वाटायचे या लाकडाचे वय काय असेल. ते लाकूड कोणत्या झाडाचे असेल. ते झाड कधी तोडले असेल त्याचे वयोमान कसे काढले असेल. ते लाकूड कसे वाळवले असेल. त्या झाडाचे वैशिष्टे काय असतील. झाड तोडतांना परवानगी लागत असेल का. ती परवानगी कोण देत असेल. परवानगीची प्रक्रिया कशी असेल. लोकं अशा प्रक्रिया पूर्ण करत असतील का. झाड तोडल्यानंतर दरवाजे, खिडक्या, तुळया, खांब बनवायला किती वेळ गेला असेल. त्या झाडांची लाकडे खरोखरच इतकी वर्षे पर्यावरणाच्या बदलांना झेलून टिकू शकतात हे तंत्र त्यावेळी कसे आत्मसात केले असेल. असे एक ना अनेक प्रश्नांनी डोक्यात काहूर माजवले होते. अशा सगळ्या गोष्टीचा मागोवा घेत असतना.

शिल्प शास्त्रांत झाड केंव्हा तोडावे, कसे तोडावे, व लाकूड सुकवून तयार कसे करावे, व त्याच्या जिनसा कशा तयार कराव्या हे सांगितले आहे. जगातील कोणत्याही धर्माच्या पोथ्या-

पुराणांमध्ये आपल्याला देवी देवता आणि कर्मकांडाशी संबधित असलेल्या वृक्षवल्ली आणि त्यांच्या पावित्र्याचा उल्लेख हमखास आढळतो. तुळस, बेल, शमी, वड अशा झाडांचे पूजनही होत असते, फार प्राचीन काळापासून वृक्षवल्लीच्या सौंदर्याचे, उपयुक्ततेचे व प्रभावीपणाचे मानवी मनांवर विलक्षण गारुड आहे. केवळ औषधी वनस्पतीच नव्हे तर पूजनीय, पवित्र, शुभ मानल्या गेलेल्या झाडांचे लाकूड बांधकामात वापरले जात असे.

सुतारकामास वापरावयाची लाकडे बहिर्वर्धिष्णु म्हणजे बाहेरच्या बाजूला दर वर्षी नवीन थर बनून वाढणारी असतात. अंतर्वर्धिष्णु म्हणजे आंतून वाढणारी झाडे. म्हणजे नारळ, बांबू वगैरेंसारख्या झाडाचे लांकूड बांधकामात वापरीत नाहीत. करवतीने कापून झाड किती वर्षांचे आहे, त्यातील वेढे किती आहेत हे मोजून पाहिले असता कळते. झाडास प्रत्येक वर्षी एक वेढा बसत असतो. मध्ये गाभा त्याच्या भोंवताली तांबूस किंवा गहिऱ्या रंगाचे वेढे व त्याच्या सभोवती पिंवळसर पांढरे वेढे असतात. पांढरे लाकूड मऊ असल्या कारणाने लवकर भुंगा व वाळवीही फार जलद लागते. लांकूड लाल, तांबूस, कठिण असले म्हणजे कीटकांचा कांही उपाय चालत नाही. साग, साल, शिसम अशा लांकडांना बहुतकरून वाळवी लागूं शकत नाही. चिरस्थायी

बांधकामासाठी सागाचाच उपयोग करतात. त्याला वाळवीही बहुतकरून लागत नाही. या कारणास्तव त्याचा उपयोग सुतारकामांत करतात.

कोणत्याही झाडांतील रस वसंत ऋतूमध्यें वर चढत जातो व ह्यामुळे पालवी, फुले, फळे वगैरे येतात. अशा वेळी कोणतेही झाड तोडले असतां त्याचे लांकूड कठिण निपजत नाही. कारण त्याच्या शिरांतून ह्यावेळी रस असतो. त्याचप्रमाणे थंडीच्या दिवसांत रस खाली उतरतो. त्यामुळे झाडांची पाने गळून पडतात. ज्यावेळी झाडांतील रसासिरण बंद असेल अशा वेळी ती तोडली असता त्यांचे लाकूड मजबूत निपजते. झाडाची वाढ पूर्ण झाली म्हणजे त्यांतील आंतला भाग मजबूत व कठिण होतो. अशा वेळी ते तोडले असता त्याचे लांकूड चांगले मजबूत आहे असे आढळून येते. ही त्याची अवस्था उलटून गेली म्हणजे झाडांनां एक प्रकारचा वृद्धापकाळ येतो. व नंतर जसजसा काळ जाईल तसतसें त्यांचे लांकूड काम मजबूत होते.

झाड कापल्याबरोबर त्याच्या साली काढून टाकल्या म्हणजे ते लवकर वाळते. व सर्व बाजूंनी त्याला हवा लागल्याकारणाने ते चांगले मुरते. तसेच ते सावलीत वर्ष दोनवर्ष

पडूं दिले म्हणजे ते चांगले मुरुन पुढे वांकडे होण्याची भिती रहात नाही. लांकूड दोन वर्षे मुरून दिले म्हणजे सुतारी कामाला ते योग्य होते.

लांकूड लवकर मुरविण्यासाठी किंवा रापविण्या साठी १०।१५ दिवस ते पाण्यांत बुडवून ठेवतात. त्याच्या योगाने आंतील रस धुवून जातो. हा रस आतच राहिला तर तो नासल्यामुळे लांकडास कीड लवकर लागते. पाण्यांतून बाहेर काढल्यावर लांकूड हवेत वाळूं देतात. म्हणजे ते नंतर वाकडे होत नाही किंवा फाटत नाही.

झाडे ही नैसर्गिक संपत्ती आहे व अनादी काळापासून ही संपत्ती उपलब्ध आहे. झाडांपासून अनेक फायदे आहेत, अनेक जीवनावश्यक वस्तू प्राप्त होतात. त्यापैकी सुतारकामात वापरण्यात येणारे लाकूड हे झाडाचे खोड होय. झाडांना आधार देण्यासाठी खोड असते, खोड मजबूत करण्यासाठी निसर्गात सोल्युलोज चे तंतू असतात ते जमिनीमधून झाडांना मिळतात. अशा रचनेचा मानवाने खुबीने वापर करून घेतला आहे.

सुतारांना लाकडी कला अवगत होत्या. ह्यां कारागीरांना लाकडाच्या प्रतीची जाण व टिकवण्याची पध्दत ह्यांचे ज्ञान असे, जे हजारो वर्षांपर्यंत जगू शकते. प्रथम ते एक वर्षभर पाण्यात भिजवून लाकडाला नीट वाळवितात, जोपर्यंत सर्व पाणी लाकडातून जात नाही आणि नंतर इतर तांत्रिक प्रक्रिया केल्या जातात. प्रत्येक तंत्र आणि शुद्ध मनाची उपासना करावी तसे करतात.

**औषधी वृक्ष:** बिब्बा, हिरडा, बेहरडा, अडसुळा, रुई, धावडा, कुडा, रातांजन, गंगावती इ.

**फळ वृक्ष :-** आंबा, चिंच, जांभूळ, फणस, रामफळ, सीताफळ, अंजीर, काजू, पेरू. इत्यादी.

**धर्मवृक्ष:-** बेल, पारिजात, सोनचाफा, उंबर, बकुळ, मंदार, सीता, अशोक, आपटा, शंकासूर, कदंब, कवठ इत्यादी.

**पुष्प वाटिका**:- तुळस, गुलाब, मोगरा, कर्दळ, झेंडू, शेवंती, जास्वंदी, जाईजुई, चमेली, मालती, अबोली ई.

**छाया वृक्ष:-** वड, आंबा, पिंपळ, चिंच इत्यादी.

**इमारती वृक्ष:-** साग, सिसम, सिसू ,कडूनिंब, चिंच, बाभूळ, आंबा, फणस आक्रोड, अर्जुन, असे वृक्ष इमारतीच्या बांधकामासाठी वापरत असत.

अशा झाडांचे लाकूड टणक व किड न लागणारे आणि विशेष म्हणजे पाण्याने सहजासहजी न कुजणारे असते. अशी झाडे मुळता तेल वर्णीय असल्याने, यांच्या गाभ्यामध्ये तेलाचा अंश असल्याने चिवट असतात. ती जास्त दिवस टिकतात. पाण्यात सुद्धा लवकर खराब होत नाहीत.

उदाहरणार्थः झाडाची एखादी फांदी आपण गरम जाळावर धरली तर त्यातून तेलकट अंश बाहेर येतो म्हणून इमारती लाकडाला पूर्वी बेल तेल, बिब्याच तेल लावत असत. म्हणजे वर्माला वर्म मिळालं म्हणता येईल.

लाकडी कलाकामाचे दोन प्रकार असतात. जोडणीचा आणि दुसरा घडणीचा. **जोडणी**त नक्षीकाम, जाळी, पट्ट्या लाकडी सांधे खिळे यांच्या सहाय्याने एकत्र आणण्यात येतात. विशेषता भूमितीजन्य जाळया अथवा छतासारख्या ठिकाणाची नक्षीकामे आधीच करावी लागतात. लाकडाच्या अंगावर इतर रंगांच्या


लाकडांच्या हस्तीदंताच्या किंवा शिंपल्या सारख्या पदार्थांच्या आकृत्या बसविण्यात येतात.

**घडणी**च्या वस्तूंत पूर्णाकृती अर्धउठावाच्या आणि चित्रदृश्य असे भाग पडतात. उदाहरणार्थ मूर्ती.

पावसाच्या पाण्याने लाकडाचा पृष्ठभाग खराब झाल्यास लाकूड घासकागदाने घासून काढतात. वाळवी, कीटक, जंतू यांपासून संरक्षण करण्यासाठी अत्यंत सुपरिचित उपाय म्हणजे डांबरापासून मिळविलेले तेल लाकडामध्ये जिरवणे. या प्रक्रियेमुळे लाकूड बरीच वर्षे टिकते. म्हणून इमारतीतील महत्त्वाच्या लाकडी घटकांवर ही क्रिया करणे निश्चितच अत्यावश्यक ठरते. जमिनीमध्ये गाडले जाणारे खुटं किंवा पाण्यात जाणारे लाकडी घटक यांना डांबर लावणे अत्यावश्यक असते.

तेल लावण्याची पद्धत म्हणजे लाकडावर घासकागदाने घासून छिद्रे बुजवली जातात. लाकडाचा कुजलेला अगर कठीण गाठीचा भाग काढून त्या भागांत लाकडाचे गट्टू, लाकडाच्या निघालेल्या भुस्यामध्ये डिंक, चिकट पदार्थ मिसळून एक संघ करून त्यामध्ये लांबी वा मेण भरून पृष्ठभाग सारखा करतात व त्यावर

आपापल्या पसंतीनुसार तेल किंवा रंग लावतात. त्यामुळे जंतुसंसर्गापासूनही लाकाडाचे संरक्षण होते. त्यामुळे ते कुजत नाहीत व जास्त काळ टिकतात. अशा पद्धतीने तेलपाणी देऊन लाकूडकाम लखलखीत ठेवीत.



## मचाण बांधणी

आत्ताचे बांधकाम करताना पहाड लोखंडी स्कॅफोल्डींगचा बांधतो तसे पूर्वीही बांधकाम करण्यासाठी पहाड - मचाण बांधत असत, त्याकामासाठी बांबू, साग किंवा तरवटाच्या झाडाच्या सरळ फांद्या यांचा उपयोग वासे म्हणून करत असत.

वासे एकमेकास बांधण्यासाठी अंबाडीचे दोर वापरत. अंबाडी परिपक्व झाली तिचा सुकण्याचा हंगाम आला की मुळासकट उपटून घेत. त्याच्या पेंड्या जुड्या बांधून त्या वाळवल्या जात. वाळल्यानंतर त्या झोडपून त्याच्या बिया काढल्या जात. अशा पेंढ्याचे भारे बांधून ते भारे पाण्याच्या डोहांत टाकून आठ दिवस कुजत ठेवत. त्यानंतर ते भारे पाण्यातून बाहेर काढून त्यातील जुड्या धुवून साफ करत असत. थोडे सुकल्यानंतर प्रत्येक झाडांची साल सोलून काढत. नंतर ती साल-धागे पाण्यात स्वच्छ धुऊन उन्हांत सुकत टाकत असत.

सुकल्यानंतर वाक तयार झाला असे म्हणतं. वाक स्वच्छ धुण्यासाठी विशेष काळजी घ्यावी लागते. म्हणजे वाख पांढरा व तजेलदार होतो तसेच मजबूत ही होतो. अशा वाकाचे पड वळून ठेवत असतं. अशा पडाचा उपयोग पहाड बांधण्यासाठी होत असे.

यापासून दावे, दोरखंड देखील बनवत असतं. आत्ताच्या बांधकामात कात्या क्वायर चा उपयोग करतात. पूर्वी अशा पडाचा उपयोग मचाण बांधण्यासाठी करत असतं.

कमानीचे दगड, वरच्या फुलांचे दगड, ज्याचे वजन १ टनापेक्षा जास्त असेल असे दगड बांधकामाच्या ठिकाणी कसे आणले असतील ते जागेवर कसे बसवले असतील. आता आपल्याकडे एवढ्या सुविधा आहेत तरी देखील दगड फुटतो, त्याला तडा जातात, तर त्या काळी ही कामे कशी केली असतील. दगड कसे वाहून कशावर आणले असतील, दगड वाहून आणताना रस्ते कसे असतील, खदाणीत दगड कसे काढत असतील, खादानीतून बाहेर दगड कसा आणत असतील. असा प्रश्न पडतो आणि त्याची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न केला तेव्हां असे लक्षात आले की, अशा पद्धतीची बांधकामे करत असत त्यावेळी असे दगड, किंवा तत्सम सामान नेआण करण्यासाठी रॅम्प तयार करत असत. जसजसे बांधकाम वर चढत जाई तसतसे ते बांधकाम या रॅम्पमध्ये बुजवले जात असे. जेणे करून बांधकामातील दगड हलायला नको. हत्ती, बैल, घोडे, उंट यांच्या मदतीने असे दगड पाहिजे त्या ठिकाणी खेचले जात असत व ते व्यवस्थितरित्या बसवले जात असत.

## लाकूडकामाला तेल पाजणे

रंगकाम म्हणजे पेंटिंग. लाकूडकाम पूर्ण झाल्यावर त्यावर काही संरक्षण द्रव्ये लावणे जरुरीचे असते. रंग काम दोन प्रकारे करतात. तेलरंग किंवा लाखरंग. लाकूडकाम आकर्षक दिसण्याकरिता रंगकामाचा उपयोग होतो. लांकूडकाम पावसाने खराब होऊ नये व सर्द हवेने सुद्धा एक प्रकारची किड लागते ती लागू नये म्हणून तेलांत कालवून रंग लावतात. याच्या योगाने लाकडाच्या पृष्ठभागावरील सर्व छिद्रे बंद होऊन जातात. दमट हवेचा परिणाम होऊन लाकूड कुजावयाचे किंवा सडावयाचें बंद होते. लाकडांत भोके पाडून पोखरणाऱ्या कीटकांचाही उपद्रव कमी होतो. अशा कामाला अळशीचे तेल, टरपेन तेल, शिसे, जस्त किंवा तांबे वगैरे धातूंची भस्मे वेगवेगळे रंग येण्यासाठी कांही द्रव्ये घालून लाकूडकामास कुंचाने लावतात. लाकडाच्या पृष्ठभागाला चकाकी यावी. धुळीचे कण किंवा वस्तू वापरताना होणारा हाताचा संपर्क इत्यादींच्या अनिष्ट परिणामांपासून लाकडाच्या पृष्ठभागाचे रक्षण व्हावे किंवा गेलेली चकाकी पुन्हा यावी या हेतूने वापरली जाणारी मिश्रणे म्हणजे पॉलीश होय.

पॉलीश वड्या, ठोकळे, किंवा चूर्ण अशा घणरुपात, लोण्यासारख्या अर्धघनरूपात, खळीसारख्या, पाण्यासारख्या द्रवरुपात असतात. मधमाशीच्या मेणापासून बनवलेले मेण लाकडी

पृष्ठभागाला लाऊन तो फडक्याने घासला म्हणजे त्याला लकाकी येते व दीर्घकाळ टिकते. त्यानंतर त्यावर जवसाचे, बेलाचे, बिब्याचे तेलाचा हात देतात. ते वाळल्यानंतर पृष्ठभागावर असलेल्या सूक्ष्म चिरा भरल्या जात. त्यासाठी शुद्ध पांढरा खडू व स्पिरीट यांचे मिश्रण लावतात. लाकडाला पॉलीश लावल्यावर स्पिरीट उडून जाते व लाखेचा चकचकीत थर पृष्ठभागावर बसतो व लाकूडकाम उठावदार दिसते.

## बिब्ब्याचं तेल

पूर्वीच्या प्रत्येक घरा-घरात आढळणारा औषधी गुणधर्म असलेला बिब्बा गाडग्या-मडक्यात हमखास पहायला मिळत असे. आज्जीबाईच्या बटव्यात तर याला मानाचे स्थान होते. जंगल संपत्ती असल्याने बिब्ब्याच्या झाडाची फळे गाडग्या मडक्यात किंवा भिंतीच्या देवळीत सुरक्षित ठेवले जात असतं.

ब्लॅक रेझिन म्हणून ओळखलं जाणारं बिब्ब्याच तेल आपल्या वॉर्निशमध्ये कीडनाशक म्हणून वापरलं जातं. हे तेल अर्धवट वाळवून लाकूड पोखरणाऱ्या किडींसाठी नियंत्रक म्हणून लाकडावर वापरलं जातं.

लाकडासाठी बेलाचे तेल, बिब्ब्याच तेल किंवा जवसाच तेल लाकूडकामाला पाजलं जात असे. **‘लावलं जात नाही तर पाजलं जातं’** पहिल्यांदा लाकूड कामाची साफसफाई करून

घेतात. भोके. चिरा किंवा बारीक खवले पडलेले असल्यास खडूची पूड बेल किंवा बिब्ब्याच्या तेलांत कालवून त्याची लांबी तयार करून त्याने ते भरून काढतात. पाहिला हात द्यायचा मग दुसरा हात द्यायचा. ते तेल त्याच्या आत मुरवलं जाते.

पेंटिंगमध्ये पेंट लावला असं आपण म्हणतो. तर लाकडाला तेल पाजणे असं म्हटलं जातं. बिब्ब्याच्या तेलाचा जर विचार केला तर बिब्ब्याच झाड. त्याच्या बाजूने जरी गेलं तरी ते झाड अंगावर उततं. म्हणजे अंगावर खाज निर्माण होते. म्हणून बिब्ब्याच्या झाडाच्या जवळ सहसा मनुष्य जात नाही. इतक ते झाड विषारी असतं. ते तोडायचा तर विषयच येत नाही. सीझनच्या काळात त्याला बिबवे येतात. ते ठराविक लोकांना माहिती असतं. कोणत्या काळात ते बिबवे काढायचे आणि त्याच तेल काढायचं. हे तेल एवढे विषारी असते की त्या तेलाच्या वासाने वाळवी किंवा किड मरून जाते. म्हणून बिब्ब्याच तेल किंवा जवसाच तेल लाकडाला पाजलं जात.

बिब्ब्यापासून काळा रंग मिळतो तो पक्का बसतो त्यामुळे धोबी कपड्यावर नावे टाकण्यासाठी याचा वापर करतात. इंग्रजीत यास मार्किंग नट म्हणूनच ओळखलं जातं. म्हणून हे तेल लाकडाला पाजण्याची पूर्वीपासूनची पध्द्त आहे. आपल्या इकडे तेलाच्या ऐवजी पाण्यात कालवूनच रंग देण्याची चाल फार आहे.



त्यामुळे दोन तिन वर्षानंतर लगेच पेंट पॉलीस करावे लागते. पूर्वी बिब्ब्याचं तेल किंवा जवसाच तेल लाकूडकामाला पाजलं की पाच दहा वर्षे बघायची गरज नसायची. अशा रीतीने रंग दिला असता रंग दिलेला पृष्ठभाग पुष्कळ वर्षापर्यंत नवा रंग दिला नाही तरी टिकतो. म्हणून दोनतीनशे वर्षे झाली तरी आजूनही लाकूड टिकून आहे.

## बेल तेल

मातीच्या चित्रांना रंग देण्याकरितां जे रंग तयार करतात, ते चकाकण्याकरिता त्यांत डिंकाचे पाणी घालावे लागते. रंगाला चकाकी आणण्याचे हे काम बेलफळापासूनही होते. चांगली पक्व झालेली बेलफळे घेऊन ती कापून त्याची दोन दोन शकले करून ती रुंद ताटांत अगर परातीत उपड़ी घालून ठेवावी. म्हणजे थोड्याच

वेळात त्यांतील चिकट रस भांड्यांत जमतो. तो काढून डिंकाचे पाण्याचे ऐवजी रंगात घालून तो रंग चित्रांना दिल्यास रंग चांगला चकाकतो. बेलफळाचे पोटात जो डिंक असतो, त्यात चुनां घालुन एकप्रकारचे लुकण तयार करतात, ते चिनीमातीची फुटकी भांडी जोडण्याच्या कामी येते.

## जवसाचे तेल

शेतात पेरणी करताना शेताच्या बांध्याच्या कडेने एक- दोन तासं जवसाचे घातले जातात. कारण शेतात जनावरं पिक खायला आली तर ते प्रथम बांधाच्या कडेचे पिक खाईन. जवसाची रोपे ही विषारी असतात. जवस हे कोथिंबीरीसारखे असते. अगदी दहा वीस जवसाची रोपे जरी एखाद्या जनावराने खाल्ली तर २००-४०० किलो वजनाचे जनावर सुद्धा मरू शकते. इतकं ते जवस विषारी असतं. जवसाच तेल देखील तेवढंच विषारी असतं. जवसाच तेलं लाकडाला लावलं की किडा, मुंगी,वाळवी त्या लाकडाला लागत नाही. अश्या पद्धतीचे तेलाच महत्व त्या काळी होत.

## फ्रेंच पॉलिश

लाकूडकाम चकाकदार दिसावे त्यावर धुलीकण किंवा हाताचा संपर्क इत्यादीच्या अनिष्ट परिणामांपासून लाकूडकामांचे रक्षण व्हावे किंवा गेलेली चकाकी पुन्हां यावी या हेतूने वापरली जाणारी मिश्रणे म्हणजे फ्रेंच पॉलिश होय. वाड्याच्या आतल्या

लाकूडकामाला फ्रेंच पॉलिश करत असतं. यामध्ये मेथीलेटेड स्पिरीट घेऊन त्यांत काळी लाख, ऑलीमेनम, रेवचिनीचा शिरा, चंद्रूसा व लोबान या जिनसा खलबत्यांत कुटून हे मिश्रण कालवून त्याचा एक हात लाकूडकामाला देतात. लांकडाला सोनेरी रंग देणे असेल तर चपडा लाख, चंद्रूसा, हळद, रेवचिनीचा शिरा, तीळ व अल्कोहल घेऊन त्यांचे मिश्रण करतात. लांकूडकाम निवाऱ्यातील असले म्हणजे त्याला नुसते तेल दिले तरी चालते. लांकूडकामास तेल देणे झाल्यास बेलतेल, टरपेनटाईन, मधमाशीचे मेण घेऊन तेल मंदाग्नीवर ठेवून व त्यात मेण घालून सर्व मेण वितळेपर्यंत तापवावे, मिश्रण थंड झाल्यावर त्यांत टरपेनटाईन घालावे व चांगले कालवून अशा मिश्रणाचे दोन हात लांकूडकामास देतात. साधे तेल देणे असेल तर गोडेतेल आणि टरपेनतेल ही समभाग घेऊन अशा मिश्रणाचे दोन हात लांकूडकामास दिले असतां ते काळसर रंगावर जाते.

# लिंपणकाम

**लिंपणकाम** म्हणजे प्लास्टर. रखरखत्या उन्हात गारवा राखण्याचे काम भिंतीवरील रंग करत असतात. भिंती रंगवण्यासाठी गेरू-काव किंवा चुन्याचा रंग दिला जातो. चुना हा पांढऱ्या रंगाचा असल्यामुळे प्रखर सूर्यप्रकाशाला परावृत्त करण्याच काम चुना करतो. म्हणून घरातील किंवा वाड्यातील आतील भाग हा थंड राहतो. भिंतीला रंग लावावयाच्या आरंभी त्या भिंतीवरील खडबडीत भाग साफ करून पृष्ठभाग मऊ गुळगुळीत करून ती भिंत ओलसर करून घेतली जाते.

लिंपणकाम यात माती, शेण, चुना, साळीचे तणस, पांढऱ्या मातीचा गिलावा या सगळ्या घटकांचे एकजीव मिश्रण करून भिंतीला लावलं जात असे. अशा गिलाव्यामुळे भिंती मजबूत व टिकाऊ होतात. मातीत गवताचा भुसा, डांबर, मेण, डिंक यांचे मिश्रण करून बाहेरील बाजूच्या भिंतीस गिलावा केल्यास त्यावर पावसाच्या पाण्याच्या माऱ्याचा फारसा परिणाम होत नाही. त्याच वेळेला भिंतीवर कांही चित्र, पेंटिंग करायचे असतील तर ती या लिंपणकामातच केली जायची. त्यात पानाची-फुलांची, हत्ती, उंट किंवा दैनंदिन जीवनातीत चित्र काढली जायची. यालाच चित्रकाम

असे देखील म्हंटल जायचं. बाहेरच्या बाजूला गेरू किंवा पांढरा रंग म्हणजेच चुन्याचा रंग दिला जायचा. त्या वेळी भिंतीत वेगवेगळया रंगाच्या काचा देखील लावल्या जायच्या. त्या काचा लावण्याच कारण म्हणजे घरात दिवा लावला की त्या काचामुळे तो प्रकाश परावर्तीत होत असे. त्यामुळे घरात भरपूर उजेड होत असे. हे त्या काळातील तंत्र आहे.

आपल्या पूर्वजांनी उगाच गाईला गोमाता म्हटलेलं नाही. गाईपासून दुध मिळते तसेच तिच्या शेणापासून गोवऱ्या मिळतात, घराच्या दारात सडा सारवण केले तर घरांमध्ये विविध जीवाणूपासुनही रक्षण मिळते. आता गाईच्या शेणापासून ‘वेदिक पेंट’ या नावाने पर्यावरणपूर्वक रंगही बाजारात येत आहेत. गाईच्या शेणापासून बनविलेल्या रंगापासून घरे रंगणार आहेत. हेही नसे थोडके.

## वाडा व मंदिर बांधकामातील फरक.

आपल्या पूर्वजांनी घरे, वाडे, गढ्या हे कमीतकमी शंभर वर्षे टिकतील अशा पद्धतीचे डिझाईन आणि मटेरीयल वापरून बांधलेली आहेत. दगड विटांच्या खालोखाल लाकूडच बांधकामास उपयुक्त साहित्य ठरले आहे. लाकडाच्या वजनातील हलकेपणा, उत्तम ताकद, टिकाऊपणा, आणि कारागिरास बांधकामात लागणारी उत्तम कार्यसुलभता या गोष्टीमुळे लाकडांचा घरे, वाडे, गढ्या यासाठी खूप मोठ्या प्रमाणात उपयोग केलेला होता. ज्यावेळी परकीयांनी आक्रमणे केली त्यावेळी अशी घरे, वाडे, गढ्या जाळल्या गेल्या. त्या नेस्तनाबूत केल्या गेल्या. त्यातून ज्या वाचल्या त्याला नैसर्गिक कारणेही नष्ट होण्यास कारणीभूत आहेत. जसे उन, वारा, पाऊस यांचा परिणाम होऊन वाड्याची पडझड झाली. त्यांची डागडुजी केली नाही. त्या वाड्यातील लोक उदरनिर्वाहासाठी, नोकरीनिमित्त बाहेरगावी गेले. त्यानंतर त्याची डागडुजी झाली नसल्याने त्या नष्ट झाल्या.

**मंदिरे मात्र कमीतकमी एक हजार वर्षे टिकतील अशा पद्धतीचे डिझाईन आणि मटेरियल वापरून बांधलेली आहेत. मंदिराला फक्त आणि फक्त दगडच वापरला गेला असल्याने ती आजही कायम टिकून आहेत.** दगडावर दगड

ठेऊन किंवा दगडांना खाचा करून दगडाचा गुताव करत असत. मंदिराचे बांधकाम करताना लाकूड, माती चुना यांचा वापर कटाक्षाने टाळलेला दिसतो. त्यामुळेती परकीयांना जाळता आली नाहीत. त्याची त्यांनी तोडफोड केली परंतु त्यांना ती नष्ट करता आली नाहीत. पूर्वीच्या काळी कागद, पेन नव्हते, सुशिक्षित लोकांचे प्रमाण फार कमी होते. डॉक्युमेंटेशन, दस्तऐवजीकरण कसं करायचं हा त्याकाळी प्रश्न असायचा. सुशिक्षित लोकांचे प्रमाण कमी. अनपड लोकांचे प्रमाण जास्त होते. परंतु या अनपड लोकांमध्ये कला मात्र ठासून भरलेली होती. त्याच कलेच्या मार्फत आपल्या पूर्वजांनी रामायण, महाभारतातील प्रसंग ते पक्षी, प्राणी, वेली, देवदेवतांची युद्ध, शरभ, गंडभेरुड असे प्रसंग दगडामध्ये कोरलेले आढळतात.

कारण पुढच्या शेकडो पिढ्यांना हा इतिहास कळायला हवा यासाठीचा त्याकाळातील एकमेव मार्ग त्यांनी अवलंबलेला होता. ही आपल्या पूर्वजांची दुरदृष्टी. आजही शेकडो वर्षे झाले किल्यांवर, मंदिरावर अशी शिल्पकला आपल्याला बघायला मिळते.

पैसा, मनुष्यबळ, अधिकारीवर्ग, बांधकाम साहित्य, हत्यारे, लोकसहभाग अशा गोष्टीची जमवाजमव झाली की

वाड्याचे काम सुरु होत असे व काही वर्षात ती पूर्ण होऊन तिथे लोकांचा राबता वाढे. सुशोभित केलेल्या वाड्यात आले की एकदम प्रसन्न वाटे. वाड्यात प्रवेश करताना आपण प्रथम येतो ते अंगणात. ते अंगण कसे तयार करतात ते पाहू.

# अंगण

**वाडा म्हटलं की समोर येत ते अंगण. वाड्यासमोरील जी मोकळी जागा असते, त्याला अंगण असे म्हणतात.** हिऱ्याची नथ जशी एखाद्या स्त्रीच्या सौंदर्यात भर घालते. तसेच अंगणही वाड्याच्या सौंदर्यात भर घालत असते. खरं तर अंगण हे वाड्याचे आभूषणच असते. अंगणाचा उपयोग लहान मुलांना खेळण्यासाठी, रांगोळ्या काढायला, लग्नकार्याचा मांडव टाकण्यासाठी. निवांत क्षण घालविण्यासाठी घराचे अंगण म्हणजे हक्काची जागा असते. घराच अंगण घराची कळा दर्शवतं असं म्हणतात. वाड्याचे बांधकाम पूर्ण झाले की, राडारोडा बाहेर टाकल्यानंतर अंगण कसं बनवतं असतं ते पाहूया.

पूर्वी अंगण तयार करण्याची एक पद्धत होती. प्रथम जमीन खोदून माती बाजूला काढून साठवली जाई. त्यात निघालेली ढेकळे फोडली जायची. खाणीमधून चांगल्या प्रकारचा मुरूम आणून अंगणभर टाकायचा. मुरुमामुळे अंगणाला चांगला चोप बसतो. भुईला तडे जात नाहीत. मुरूम हा चिकट दगडाळ असतो. त्यामुळे जमिनीला बिलगून राहतो. योग्य लेव्हल पर्यंत मुरूम भरून झाला की त्यावर माती पसरवत.

माती सपाट एक लेव्हल करायची. मुरूम, मातीवर पाणी मारत. पाणी त्या मुरमात सोकले जाई. पाणी मारून ओल्या भागाचा भुरण्याने चोप काढला जाई. विशिष्ट कोनात, विशेष शैलीत, योग्य ताकदीने भुरणे भुईवर आपटले जाई. माती-मुरूम एकजीव होऊन अंगण चोपले जाई. आत्ताच्या सारख्या रोलिंग मशीन त्याकाळी नव्हत्या.

गोठ्यातील गाईचे शेण टोपलीत भरून ठेवले जाई. त्या शेणात पाणी टाकून शेणसडा तयार करीत. अलीकडे लादी, फरशी प्लास्टरच्या युगात शेणसडा, अंगण सारवणे म्हणजे काय हे देखील खूप जणांना माहित नसावे. शेणामध्ये थोडे पाणी घालून दहीकाला प्रमाणे कालवले जाते. यातील थोडेथोडे मिश्रण घेऊन हातानेच जमिनीवर फिरवले जाते. एका कोपऱ्यापासून दुसऱ्या कोपऱ्यापर्यंत शेणाच्या मिश्रणाने सारवत असत.

शेणसडा टाकलेल्या संपूर्ण अंगणाला पुन्हा भुरण्याने चोपून काढतं. रस्त्यातून जाणारा शेजारी तयार केलेले अंगण पाही. विचारता विचारता तोही भुरणा हातात घेई, आणि सारे अंगण चोपून काढी. याला एकमेकाला मदत करणे असे म्हणतं. अंगण ओले असतानाच योग्य रितीने चोपले तर गुळगुळीत बनते. असे तीन-चार दिवस शेणसडा दे-चोप काढ. शेणसडा दे-चोप काढ. असा कार्यक्रम चाले.

हळूहळू अंगण सुकत जाई. अंगण एकदा चांगले सुकले की गाईच्या शेणाने अंगण व्यवस्थित सारवून घेतल्यानंतर अंगण देखणे होई. मुलांना खेळायला, रांगोळी काढायला अंगण सज्ज होई. अशा तयार झालेल्या अंगणात असंख्य बिनपैशाचे खेळ खेळले जायचे. विशेषतः सायंकाळच्या वेळी या अंगणाचं रूप लुभावणारं ठरतं. लहान मुलांसाठी अंगण हे खेळण्या-बागडण्यासाठीही उपयुक्त ठरतं.

अंगणात रांगोळी काढल्याने आणि संध्याकाळी तुळशीसमोर दिवा लावल्यावर अंगण अगदी उजळून निघे. घरासमोर अंगणाची मोकळी जागा, तुळशीवृंदावन त्यात तुळस आणि त्याच्या बाजूला प्राजक्त किंवा सुवासिक फुलांची झाडं असतील तर अंगणात पडणारे फुलांचे सडे हे अंगणाच्या सौंदर्यात भरच घालणारे ठरतात. घरासमोर अंगण असेल तर विसावा मिळतो. फुलझाडंमुळे परिसर सुगंधित होतो. दर आठ दिवसांनी गाईच्या शेणाने अंगण सारवले जाई. शेणामातीच्या दरवळामुळे घरांमध्ये सदैव सुगंध दरवळत असायचा. एक विशिष्ट प्रकारची प्रसन्नता पसरत असे. सारवलेल्या घरांमध्ये चालतानाही तळपायांना जाणवणारा तो अलगद स्पर्श शरीरात ऊर्जा भरायचा.

अंगणामध्ये हळदी- कुंकू समारंभ, साखरपुडा, विवाह देखील पार पाडले जात असतं. यापूर्वी गावामध्ये बहुतेक विवाह हे घरासमोरील अंगणामध्येचं मांडव घालून पार पाडले जायचे. त्यामुळे पूर्वी अंगणाचं महत्वं अशा मोठ्या समारंभामुळे द्विगुणीत होत असे. मंगलकार्यालयामुळे अंगणातील मांडवामध्ये विवाह पार पाडण्याची संस्कृती बहुंताशी मागे पडली आहे. पूर्वी सण- समारंभाला देखील अंगणाच वैशिट्य जपलं जातं असे. उन्हाळयात अंगणात रात्रीच्या वेळी पडणारं चांदणं, या चांदण्यात रंगणाऱ्या गाण्याच्या भेंड्या, आणि मजा-मस्तीही चालत असे.

आपल्या पूर्वजांनी उगाच गाईला गोमाता म्हटलेलं नाही. गाईपासून दुध मिळते तसेच तिच्या शेणापासून गोवऱ्या मिळतात, घराच्या दारात सडा सारवण केले तर घरांमध्ये विविध जीवाणूपासुनही रक्षण मिळते. आता गाईच्या शेणापासून ‘वेदिक पेंट’ या नावाने पर्यावरणपूर्वक रंगही बाजारात येत आहेत. गाईच्या शेणापासून बनविलेल्या रंगापासून घरे रंगणार आहेत. हेही नसे थोडके.

# तुळशी वृंदावन व तुळस

तुळस डोलते अंगणी! तेविती दिवा वृंदावनी! आनंद, आरोग्य फुलविते! नमोस्तुते नारायणी! नवीन वास्तू उभी राहिली, की प्रथम प्राधान्य दिले जाते ते तुळशीवृंदावनाला. हिंदू धर्मातील अतिशय महत्वाचे म्हणजे तुळशीवृंदावन. सर्वांच्या घरांना एक अप्रतिम सौंदर्य प्राप्त करून देणारी विविध तुळशीवृंदावने प्रत्येकाच्या घरासमोर अंगणात आपल्याला पहायला मिळतात. कलीयुगातही वरदान ठरलेल्या तुळशीचे महत्व पाहुयात. तुळशीला साक्षात ईश्वराचा दर्जा देण्यात आलेला आहे. कौलारू घर. घराभोवती अंगण. अंगणात तुळस हा भारतातील अनेक जुन्या घरांच्या वास्तुरचनांचा प्रकार आहे. आता कौलारू घरांची जागा इमारतीने घेतली आहे. त्यामुळे अंगणातून तुळस गेली. तुळशीला जसे धार्मिक महत्व आहे तसेच तुळशीमध्ये आरोग्यदायी गुणधर्म ही आहेत.

घर बांधताना स्त्रिया तुळशीवृंदावन आपल्या मनाप्रमाणे बांधून घेत असत. भारतीय स्त्रिया दररोज सकाळी अंघोळ झाल्यावर तुळशीची पूजा करून प्रदक्षिणा घालतात. त्यामुळे त्यांना ऑक्सिजन चांगला मिळतो. विविध रोगाच्या आजारावर

तुळशीची पाने, बिया, मुळे गुणकारी असतात. शास्त्रीयदृष्ट्या तुळस वनस्पती हवा, पाणी माती यांना शुद्ध ठेवण्याचे कार्य करते. तुळस ही वनस्पती मानवास आरोग्यदायक असल्यामुळे घराच्या अंगणात, कुंडीत किंवा वाफ्यात तुळस लावली जाते. दारात तुळस असेल तर डास, मच्छर, होत नाहीत. तुळस ऑक्सीजनचा पुरवठा करते. तुळशीमध्ये अॅन्टी बायोटीक गुणधर्म असतात. सर्दी, ताप, खोकला या रोगाला दुर ठेवण्याचे काम तुळस करते म्हणून आपल्या पूर्वजांनी तुळस सहज उपलब्ध होईल, तिला पाणी रोज घातले जाईल अशा ठिकाणी लावलेली आहे.

अन्नावर तुळशीचे पान ठेवण्याने त्या ठिकाणी वाईट शक्तीचे तरंग येत नाहीत. म्हणून प्रसादावर तुळशीचे पान ठेवले जाते. दान देताना वर तुळशीचे पान ठेवले जाते. असे या तुळशीला महत्व आहे.

# रांगोळी

चौदा विद्या आणि चौंसष्ट कला असे आपण नेहमी वाचतो. त्या चौंसष्ट कलांपैकी एक कला म्हणजे 'हस्तलाघव' कला यात हाताने विणणे, भरतकाम, फुलांच्या माळा गुंफणे, भिंत रंगवणे, मेंहंदी, रांगोळी काढणे अशा गोष्टी येतात. आपल्या पूर्वजांनी काही प्रथा निर्माण केल्या त्याला काहीतरी हेतू होता. 'अतिथी देवो भव' ही आपली संस्कृती दारावरची रांगोळी पाहुण्यांचे स्वागत करते त्याच बरोबर ती रांगोळी न विस्कटता अदबीने आतमध्ये यायला शिकवते. मनातील कटुता दुर सारून घराची वाड्याची, मंदिराची, वास्तूची आब राखून या, असेच ती सुचवत असते. अंगणातील रांगोळी अशुभ शक्ती घरात येऊ देत नाहीत व शुभ शक्तींना घराबाहेर पडण्यास अडथळा आणते. **नैसर्गिकरित्या मानसिक अस्वस्थता दुर करणे तेही नियमित रांगोळी पाहून हा आपल्याला माहित नसलेला पूर्वजांनी दिलेला गुण.**

रांगोळीचे आयुष्य अगदी थोडे असले तरी ती काढणारा कलाकार आणि पाहणारा रसिक दोघांच्या मनाचे समाधान मात्र नक्की ठरलेले. अंगणामध्ये रांगोळी रोज काढली जाते. जेवणाच्या ताटा भोवतीही रांगोळी काढली जाते. सणांच्या वेळी रांगोळी काढली जाते. रांगोळीच्या डिझाईन त्याच्यातील कला, आणि परंपरा दोन्ही

जिवंत ठेऊन एका पिढीकडून दुसऱ्या पिढीपर्यंत पाठवल्या जातात. रांगोळी डिझाईनमध्ये साधे भूमितीय आकार, देवतांचे प्रभाव. फुलांचे-पाकळ्यांचे आकार असतात. रांगोळीचा उल्लेख रामायण, महाभारत, तसेच वेदांसोबत अनेक ग्रंथामध्ये आढळतो. रांगोळीमध्ये एक प्रकारची सांकेतिक भाषाच असते असे मानले जाते. रांगोळीतील प्रतीके एक प्रकारची आध्यात्मिक अनुभूती देतात. म्हणून दारात रांगोळी काढतात. आज आपण रागोळी, मेहंदी काढण्यासाठी क्लास लावतो, पूर्वी अशा माध्यमातून कलेची निर्मिती आणि देवाणघेवाण होत गेलेली आहे.

पूर्वी रांगोळीसाठी रांगोळीच्या दगडाचे चूर्ण, कोरडे पीठ, रंगीत वाळू, साळीचे तणस, लाकडाचा भुसा, शेंदूर, गुलाल, हळद, कुंकू, लाल विटांची पावडर, संगमरवराची बुकटी, वेगवेगळ्या रंगाच्या फुलांचे चूर्ण, पंचरंगी चूर्ण, धान्य, फुले आणि नैसर्गिक रंग वापरून रांगोळी काढली जात असे.

सौंदर्याचा साक्षात्कार व मंगलाची सिद्धी हे रांगोळीचे उद्देश मानले जातात. भारतीय संस्कृतीमध्ये रांगोळीला खूप मोठे महत्वं आहे. सण, उस्तव, मंगलकार्य, पूजा, कुलाचार, कुलधर्म, संस्कारविधी, व्रतवैकल्ये, यांच्याशी ही कला निगडीत आहे. तसेच देवघर, अंगण, उंबरठा, तुळशीवृंदावना जवळ रांगोळी काढली जाते. ओवाळण्याच्या पाटाभोवती, व जेवणाच्या ताटाभोवतीही रांगोळी काढली जात असे.

# पुष्करणी

**पुष्करणी:-** वाड्याजवळ काही विशिष्ट बांधकामे आढळतात ती आपले लक्ष नेहमीच आकर्षित करत असतात. पुष्करणी वेगळाच इतिहास सांगू पहात आहेत का या दृष्टीने थोडी उत्सुकता चाळवली आणि त्या दिशेने अभ्यास सुरु केला. प्राचीन काळापासून पुष्करणी हा मंदिरांचा अविभाज्य घटक म्हणून निर्मिला गेला आहे. बाहेरील बाजूचा सर्वात महत्वाचा घटक म्हणजे पुष्करणी. वास्तूत प्रवेश करण्याआधी पवित्र होऊन म्हणजे सुचीर्भूत होऊन प्रवेश करण्यासाठी उपलब्ध करण्यात आलेली पाण्याची सुविधा. पाषाणावर कोरीव कलाकुसर असलेली पाण्याची टाकी म्हणजेच पुष्करणी होय. पाषाणाच्या कोरीव कलाकुसरीत दगडी भिंतीच्या आधाराने आणि दगडी पायऱ्यांच्या मदतीने पाण्यापर्यंत पोहोचता येते. जल संचयाच्या दृष्टीने पुष्करणी महत्वाच्या तर होत्याच. अशा पुष्करणीचे आकार चौकोनी, गोल, षटकोनी, अष्टकोनी, आयताकृती, वर्तुळाकार असतात. पाणी साठवण्याची मोठी क्षमता तयार केलेली असते.

आपल्याकडं आड, विहीर, तलाव, तळी, टाकी अशी पाण्याशी नातं सांगणाऱ्या अनेक वास्तू आहेत. या साऱ्यांतील

देखणी, कोरीव श्रीमंती लाभलेली म्हणजे पुष्करणी. देवांचा सहवास लाभलेली जलवास्तू. प्राचीन मंदिराच्या सभोवती व गावोगावी पारंपारिक जलव्यवस्थेसाठी बांधलेल्या पुष्करणी हमखास दिसणार. आता त्याची स्थिती फार दयनीय झालेली आहे. पुष्करणीची निर्मितीही सौंदर्य आणि पावित्र्य यांचा एकत्रित मिलाफ असलेला मंदिरानंतरचा दुसरा वास्तुप्रकार. काळ्या पाषाणात जमिनीलगत कोरीव, आखीव-रेखीव अशी तिची रचना. ही जलवास्तू जेवढी देखणी, तितक्याच नितळ पाण्याचीही तिला साथ मिळालेली. पुष्करणीला कारंजे असे सुद्धा म्हणतात.



नक्षीदार पुष्करणी





चौकोनी पुष्करणी

## विहीर/ आड/ बावडी

वाड्याची अजून एक खासियत म्हणजे वाड्यात किंवा वाड्याच्या मागील बाजूस असणारी विहीर. स्थापत्य कलेतील एक उत्तम नमुना असणारे वाड्याला पाणी पुरवठा करण्यासाठी विहीर किंवा आड असतं. असे आड वर्तुळाकार असून त्याचा घेरा पाचसात फुट असतो. जेमतेम दोन माणसांना आतमध्ये उतरून काम करता येईल एवढीचं जागा. असे आड आपणाला वरतून बघताना भिती वाटते तर त्यावेळी त्याचे खोदकाम कसे केले असेल. व आतील मटेरियल बाहेर कसे काढले असेल. आड खोदण्यासाठी त्यातील दगड माती बाहेर काढण्यासाठी किती लोक आत उतरून काम करत असतील. घेरा छोटा असल्याने हे काम हळूहळूच करावे लागत असणार. कुदळ, फावडे, पहार, टाकी, हातोडा, घन, घमेले अशी अवजारे प्रामुख्याने लागतात. पण कधीकधी जमिनीखाली एखादा मोठा दगड लागला आणि तो फोडायला अतिशय कठीण असला तर तो कसा फोडला जाई. फोडताना त्यावर चालणाऱ्या हत्यारांची धार वारंवार बोथट होत असणार अशा वेळी हत्यारांना घासून त्यांना वज्रासारखे काठिण्य आणण्यासाठी लागणारे रसायन पण त्याकाळी होते. असे रसायन

त्या दगडावर टाकून काही दिवसाने तो दगड फोडला की लगेच फुटत असे.

माझ्या निष्कर्षानुसार विहिरीचे खोदकाम करताना पंधरा वीस फुट घेरा पकडून खोदकाम करत असावेत. विहिरीची खोदाई पूर्ण झाल्यानंतर पाहिजे तेवढा घेरा ठेऊन दगडी बांधकाम करत असत. व बाहेरच्या बाजूने लगेच पुनर्भरणही करत असत. पुनर्भरण करत असताना त्यामध्ये प्रथम मोठे दगड नंतर छोटे दगड, मोठा मुरूम, बारीक मुरूम भरून घेत असत. त्यामुळे तेथे पडणारे पावसाचे पाणी जमिनीत मुरत असे. दगडी बांधकाम करताना एकावर एक दगड ठेऊन इंटरलॉकिंग पद्धतीने बांधकाम करत असल्यामुळे दगडाच्या फटीमधून फक्त स्वच्छ पाणी आत येत असे. ठराविक अंतरावर होल भोकं ही ठेवत असत. त्या होल मधूनही पाणी आत येत असे. त्या होलचा दुसरा उपयोग विहिरीत चढण्याउतरण्यासाठी ही होत असे. होलच्या पाठीमागेही पुनर्भरण व्यवस्थित करत असत. त्यातूनही फक्त पाणीच विहिरीत येत असे. गाळ, माती येत नसे.

विहिरीमध्ये आतल्या बाजूला एक कप्पा, कपार किंवा आतमध्ये खोदून केलेले छोटेशे विवर दिसते ते कशासाठी असा प्रश्न पडला आणि त्याचे उत्तर शोधू लागलो त्यावेळी असे लक्षात

आले की, विहीर खोदताना, आड खोदताना आतमध्ये असणारे कामगार त्यांना विश्रांती घ्यायची असेल तर तेथे घेता येते. मुरूम, माती, दगड बाहेर काढताना विहिरीतल्या माणसांना दगड पडून इजा होऊ नये. खोदकामासबंधी काही सामान ठेवायचे असेल तर ते ठेवण्यासाठी ती सुरक्षित जागा म्हणजे विवर.

तसेच पूर्वी दगड फोडण्यासाठी ब्लास्टिंग करत असत. सुतळी वाती हाताने पेटवून विहिरीच्या बाहेर यावे लागे. त्यावेळी विहिरीतून बाहेर यायला वेळ लागला ब्लास्टिंग उडून दगा होण्याची भिती असे. त्यामुळे कपार ही सुरक्षित जागा असे. त्या कपारात जावून बसायचे व समोर जाड लोखंडी पत्रा किंवा जाड लाकडाच्या फळया आडवे लावायचे त्यामुळे दगड उडून आत येणार नाही. व आतील माणसांना इजा होणार नाही.

विहीर खोदताना पाण्याचा झरा लागला तर त्या बाजूने खोदकाम करून पाण्यासाठी वाट करून दिली जात असे. त्यामुळेही ते कपार तयार होत असे.

**आपल्या पूर्वजांनी पुष्करणी बांधकामाच्या वेळी पुष्करणीत येणारे पाणी आणि त्यातुन होणारा विसर्ग याचे**

व्यवस्थित नियोजन केलेले दिसते. त्या शास्त्रशुद्ध पद्धतीने बांधलेल्या दिसतात. पुष्करणीच्या दगडी बांधकामासाठी दगडांना इंटरलॉकिंग सिस्टीम केलेली असते. ज्यामुळे हजारो वर्षांनीही आहे तशाच अवस्थेत पुष्करण्या आजही पहायला मिळतात.

वरील निष्कर्षावरून असे लक्षात येते की, आपल्या पूर्वजांनी बाष्पीभवन टाळण्यासाठी आडाची खोली जास्त व घेरा कमी ठेवलेला दिसतो. उघड्यावर असलेल्या टाक्यांतील पाणी मोठ्या प्रमाणात बाष्पीभवन होते. ते कमी करण्यासाठी वेगवेगळे उपाय केलेले पहायला मिळतात. वाड्यातील विहिरीच्या दगडात कांही भोके केलेली दिसतात. त्यांचा उपयोग बांबू रोवण्यासाठी केला जात असे. त्यावर कापड टाकून पाण्याचे केरकचरा आणि बाष्पीभवना पासून संरक्षण केलेले दिसते. पूर्वीपासून पाण्याची तुलना ही संपत्तीशी केली जाते. त्यामुळे बऱ्याच ठिकाणी टाक्यांच्या भिंतीवर कुबेराची प्रतिमा पहावयास मिळते.

वर्षानुवर्षाच्या निरीक्षणातून जमिनीखालील वाहत्या जलस्त्रोतांचा वेध घेऊन विहीर कशी खोदावी जमिनीत नेमके पाणी कुठे व किती अंतरावर असेल हे ओळखण्यासाठी

**नैसर्गिक साधने कोणती याची विस्मयकारक माहिती पुढे सविस्तर आहे. जलस्त्रोतांचे विहिरीमध्ये संचय करून जीवनोपयोगी पाणी वर्षभर कसे पुरवावे, हे त्याकाळच्या लोकांना माहित होते. बारमाही पाणी देईल अशी पुनर्भरणाची सोयही केलेली दिसते.**

**पुष्करणीच्या चहुबाजूंनी दगडी भिंतीत छोटे छोटे गवाक्ष कोरीव दगडात बनविलेले असतात ज्यामध्ये श्री गणेशासोबत इतर देवी देवतांच्या मुर्त्या विराजमान असतात. त्याचे कारण पाण्याचे पावित्र्य जतन करण्याच्या उद्देशाने, बारवेतील पाणी देवाचे आहे. यामध्ये पाय धुवू नये, ते दुषित करू नये, हा त्या पाठीमागचा भाव असावा. बारवांचे आकार पण वेगवेगळे, फुलाच्या आकाराच्या बारवाना पुष्करणी, मंदिराजवळ असलेल्या बरवाना कुंड, तीर्थ असे म्हटले जाते.**

एखाद्या मंदिरात, वाड्यात, गडकोटावर पाण्याची व्यवस्था केली की ते पाणी चार प्रकारच्या वेगवेगळ्या कुंडात/ विहिरीत साठवले जाई. **पहिल्या कुंडातील पाणी पिण्यासाठी व देवाचे कामासाठी वापरत. एका विशिष्ट लेवलच्या वर पाणी आले**

**की ते दुसऱ्या कुंडात जाई या कुंडातील पाणी अंघोळीसाठी वापरत. याही कुंडातील पाणी एका विशिष्ट लेवलच्या वर आले की ते तिसऱ्या कुंडात जाई ते पाणी कपडे धुण्यासाठी वापरत व त्यानंतर शिल्लक राहीलेलं पाणी एका नहर मधून पाटाने बागेसाठी किंवा शेतीसाठी वापरले जाई.** हे आपल्या आधीच्या पिढ्यांनी निर्माण केलेल संचित आहे. आणि ते त्यांना परंपरागत आलेल शहाणपण होतं.

आपणाला पूर्वी बांधलेल्या विहिरी, आड, तलाव, कुंड, बारव बघायला आवडतील का? अलीकडे बांधलेल्या पाण्याच्या टाक्या बघायला आवडतील. तर उत्तर असेल पूर्वी बांधलेल्या विहिरी, आड, तलाव, कुंड, बारव.

**वाड्यामध्ये विहीर, आड बांधण्याचे मूख्य कारण म्हणजे जर शत्रूचा वेढा पडला तर पाणी आतल्याआत मिळावं हा पण हेतू असू शकतो.**

आडातील पाणी काढण्यासाठी चरका (रहाट) किंवा पोहरा असे. विहीरीची खास बाब म्हणजे विहीरीला व्यासाकार रचनेत वरील बाजूस बसण्यासाठी दगडी चौथऱ्याची जमीन

केलेली असे. एका बाजूला त्यावर चढण्यासाठी व उतरण्यासाठी पायऱ्यांची सोय केलेली आसे.

वाड्याच्या अंगणात असणारा सुंदर बागबगीचा त्यातून येणारा फुलांचा सुगंध व थुईथुई उडणाऱ्या कारंज्याचा आवाज त्यामुळे तेथे सुखद अनुभव येतो. असा अनुभव घेऊन बघा. वाड्याच्या बाहेर विहीर असेल तर विहीरी भवतालची नारळी पोफळी, केळीची बाग कसलं भारी दृष्य असणार. विहीरीस पूर्वी बाव, आड असेही म्हणतं. अशाच विहिरीतून पाटाच्या माध्यमातून बागेस शेतीस पाणी फिरवल्याचे लक्षात येते.

## वाड्याचे जोते.

प्राचीन काळातील वास्तूचा पाया रुंद व दगड माती चुन्याने भरून भक्कम करत असत. अशा भक्कम पायावर वाड्याचे जोते जमिनीच्यावर चारी बाजूने कमरे इतके उंच असतात. त्यावर खण म्हणजे खोल्या असतात.

**जोते कमरेइतके उंच घेण्याचे कारण म्हणजे जोत्यावर चढून जाण्यासाठी सात पायऱ्या चढून जावे लागे. जे आपल्या धर्मशास्त्रात सांगितले प्रमाणे स्वर्गाच्या सात टप्प्याचे आणि आठवड्यातील सात वार दर्शवतात. म्हणून जोते सात पायरी उंच एवढे घेतात. त्याच बरोबर लाकडी स्तंभ, खांब उभारताना त्यांना पाणी लागू नये, पावसाळ्यात ओल लागू नये, तसेच वाळवी अथवा कुठल्याही प्रकारची किड लागू नये म्हणून वाड्याचे जोते उंच घेत असतं.**

जोत्याला काळ्या पाषाणाचे सुबक आयताकृती घडीव हात-हातभर रुंदीचे चिरे बांधकामासाठी वापरत असतं. वाड्याच्या दगडी बांधकामाचे जोड अत्यंत बारीक पेपरलेस ज्वाईट ठेवतात. वाड्याच्या बाहेरील भिंतीला दगड व आतील बाजूने गिलावा केलेला असायचा. बांधकामात दगडाचे, विटांचे जोड एकमेकांवर

येणार नाहीत अशा पद्धतीने त्याची रचना केली जात असे. अशा पद्धतीची बांधकामे ही चिखल, माती, चुना यामध्ये होत असतं. वाड्याचा पाया भक्कम करण्यासाठी त्यात दगड, माती व्यवस्थित भरले जात. भिंतीची रुंदी जास्त ठेवत त्यामुळे भिंतीला तडा जात नसे.

जोत्याला सौंदर्य देणारा किंवा शोभा आणणारा दगड म्हणजे प्लिंथ मोल्डिंग. हा बांधकामापेक्षा बाहेर आलेला दगडी भाग, त्यावर संपूर्ण भिंतीचा भार असतो. वाड्याच्या जोत्याला लोखंडी / पितळी गोल रिंगा लावलेल्या दिसतात. त्याचा उपयोग पूर्वीच्या काळी घोडे बांधण्यासाठी होत असे, असे म्हणतात.

**परंतु त्याचे खरे कारण छोट्यामोठ्या कार्यक्रमासाठी मांडव टाकायचा असेल तर अशा रिंगामधून बांबू अथवा वासा अडकवून उभा करत. गोल रिंगामधून दोरी ओवून कापडी मांडव बांधला जात असे. त्यामुळे भिंतीच्या कडेने खड्डे करण्याची गरज नसे. असे खड्डे पडले तर पावसाचे पाणी बांधकामाच्या पायात मुरून बांधकामाला धोका निर्माण होई. म्हणून पूर्वी लोखंडी/ पितळी रिंगाचा आधार घेत असत. हे त्यावेळी वापरलेले तंत्र आहे.**





सात पायरी उंच वाडे



सात पायरी उंच वाडे




सात पायरी उंच वाडे




सात पायरी उंच वाडे




सात पायरी उंच वाडे



जोत्याला लावलेली गोल कडी

# दरवाज्याचे तोरण

तोरण दारावर लावल्याने घराची, वाड्याची शोभा वाढते. वाड्याच्या सजावटीला मुख्य प्रवेशव्दारापासुनच सुरुवात होत असते. कारण वाड्याच्या मूख्य प्रवेशव्दारापासुनच आपण पाहुण्यांचे स्वागत करत असतो. वाड्याची शोभा खरतर प्रथम दर्शनी दिसणाऱ्या तोरणानेच होत असते. तोरण हे शुभसूचक आणि मंगलसूचक असल्याने ते घराची, वाड्याची शोभा वाढवते, ‘अतिथी देवो भव’ या आपल्या भारतीय संस्कृतीच्या शिकवणीनुसार शुभ कार्याच्या वेळी वाड्याच्या प्रवेशव्दारावर झेंडूची फुले व आंब्याच्या पानांपासून बनवलेले तोरण बांधण्याची प्रथा आहे.

**एखाद्या घराच्या दारावर तोरण दिसले की तिथे शुभकार्य असणार असे आपोआपच सर्वांना कळून येत असे. व लोक आपणहून स्वतः त्या कार्यक्रमात भाग घेऊन लागेल ती मदत करत असत.** त्याकाळी निमंत्रण पत्रिका, फेसबुक, हॉटसअप, ट्विटर अशी माध्यमं नव्हती. शुभकार्याच्या वेळी घरात देवतांच्या सात्विक लहरी येत असतात असे म्हटले जाते. या लहरी सूक्ष्म असल्याने या लहरींना आकर्षून घेण्याची क्षमता झेंडूच्या

फुलांमधून व आंब्याच्या पानांमधून येत असते. त्यामुळे घराच्या किंवा वाड्याच्या सजावटीला प्रवेशव्दाराच्यावर झेंडूची, आंब्याच्या पानांपासून बनवलेल्या तोरणांनी करतो. तोरणाचे वेगवेगळे प्रकार आहेत. फुलांचे तोरण, मोत्याचे तोरण, कलाकुसरीचे तोरण, गजरा तोरण, हस्तकला तोरण, मखमली तोरण, लोकरीच तोरण, लाकडी तोरण असे विविध प्रकार आहेत.

**सूर-असुरांमधील युद्धापासून ते राजे महाराजे यांच्या युद्धापर्यंत, विजयी होऊन आलेले सैन्य यांचे स्वागत दारात रांगोळी काढून व दारावर आंब्याची पानं आणि झेंडूच्या फुलांची तोरणं बांधली जात असत. विजयोत्सव आणि आनंदोसत्व अशा प्रकारे साजरा केला जात असे.**

## मुख्य प्रवेशव्दार

घोडेस्वार घोड्यावर बसून सहजपणे आत येईल किंवा अंबारीसह हत्ती आत जाईल एवढे मोठे प्रवेशव्दार घेतात. वाड्याच्या दर्शनी भागावरील दगडी चौकट आकर्षक बनवण्यासाठी त्यावर नक्षीकाम करण्यात येत असे. त्यामध्ये प्रामुख्याने गणपती, रिद्धीसिद्धी बाजूने वेलपत्री, तळाच्या बाजूला भालदार-चोपदार/ जय-विजय/ द्वारपाल असे कोरलेले आढळतात.

वाड्यांना आगमन निर्गमनासाठी एकच भला मोठा लाकडी दरवाजा असायचा. तो जाडच्या जाड लाकडाचा व दोन झडपांचा असायचा. मोठा दरवाजा बंद असताना स्वतंत्रपणे उघडता येईल असा आणखी एक छोटा दरवाजा असतो त्याला दिंडी दरवाजा म्हणतात. दिंडी दरवाज्यातून एका वेळी एकाच माणसाला जाता किंवा येता येत असे. त्यामुळे वाड्याची सुरक्षाही सांभाळली जायची.

मोठ्या दरवाजाची उंची पंधरा फुट किंवा त्यापेक्षा जास्त आणि रुंदी दहा फुट किंवा त्यापेक्षा जास्त असते. दरवाजा अशा वैशिट्यपूर्ण पद्धतीने बनवलेला असतो की, परकीय आक्रमण

झाल्यास दरवाजा हत्तीच्या धडकेने तोडला जावू नये म्हणून उभे लाकूड व त्यावर लोखंडी आडव्या पट्या व त्या पट्ट्यावर लोखंडी टोकदार खिळे बसविलेले असतात. लाकडी बिन्न्या असतात. काहीजण त्या बिन्न्यावर पितळी वाट्या, फुले लावतात. खालच्या बाजूला दगडी किंवा लाकडी उंबरा असतो. वरच्या बाजूला दगडामध्ये उलट-सुलट कमळ पुष्पाची नक्षी असतात. दरवाज्याच्या भव्यतेवरून आतल्या वाड्याचा पसारा किती असेल याचा अंदाज येतो.

*** दरवाजावर सुर्यचंद्र असतात, त्याचा अर्थ जोपर्यंत सूर्यचंद्र आहे तोपर्यंत अशा वास्तूचे बांधकाम करून त्या टिकवावयाच्या आहेत.** हा संदेश जे काम करणारे कारागीर, स्थपती, वास्तुविशारद, मटेरियल पुरवणारे आहेत त्यांनी त्या दृष्टीने विचार करून मटेरियलची निवड करून बांधकाम करावयाचे आहे. आत्ताच्या काळात आपण मटेरियलची वॉरंटी विचारत असतो. पूर्वी असे नव्हते. सूर्यचंद्र.

*** सुर्यचंद्र लावण्याचा दुसरा उपयोग म्हणजे, सूर्य उगवला की दरवाजा उघडायचा आणि चंद्र मावळला की दरवाजा बंद करायचा. हा नियम गडकोटावरील दरवाजे यासाठी असे.**

*** सुर्यचंद्र लावण्याचा तिसरा उपयोग म्हणजे, सूर्यचंद्र आहे तो पर्यंत ही वास्तू टिकणार आहे. हा संदेश मिळत असे.**

*** सुर्यचंद्र लावण्याचा चौथा उपयोग म्हणजे, सुर्यचंद्र जसे सर्वांना उजेड समान देतात तसेच या वास्तूत वाड्यात आलात तर सर्वांना समान न्याय मिळेल. हा संदेश मिळत असे.**

दरवाजाला समोर दोन गोल रिंगा असतात. त्याचा उपयोग दरवाजा ओढून घेण्यासाठी हॅन्डेल म्हणून करतात. दुसरा उपयोग डोअर बेल म्हणून कडी वाजवली की आत असणारे पहारेकरी यांना कुणीतरी आले आहे हे कळे. आतूनच त्यांची चौकशी करून, कोण आहे हे बघून, परवानगी घेऊनच दरवाजा उघडत असत.

दरवाज्यातून आत आल्यावर दरवाज्याच्या पाठीमागे दरवाजा बंद करण्यासाठी अडसर / आगळ असतात. अडसर

म्हणजे साधारणतः नऊ इंच बाय नऊ इंच एवढा लाकडाचा अखंड ठोकळा. दरवाजा उघडताना भिंतीच्या खोबनिमध्ये अडसर सरकवला जातो. त्याला ओढण्यासाठी पुढील बाजूस गोल रिंग असते. अशा दरवाज्याला उखळासारख्या खाचा असल्यामुळे तो सहज एका माणसास उघडता येतो व बंदही करता येतो. दरवाजा पुढे जाऊ नये म्हणून (स्टॉपर) लोखंडी साखळी खालच्या बाजूला लावलेली असते. इथे इंजिनीअरिंगचे सूत्र लक्षात घ्यायला हवे. उभे लाकूड त्यावर आडव्या लोखंडी पट्ट्या ताण आणि दाब त्यावेळी वापरलेल तंत्र.

दरवाज्यावरील द्वारपाल तत्कालीन वास्तुशास्त्रज्ञांच्या अंगभूत कलेचा अलंकृत अविष्कार आहेत. या द्वारपालाचे विविध आकार, पट्टी नाही, मोजमाप नाही, स्केच नाही, पण दोन्हीकडील जयविजय अगदी मिरर इमेज असायचे. त्यांच्या मुद्रावरील भाव, त्यांची आयुधे यांच्यातील बारकावे, प्रमाणबद्धता मनास आल्हाद देणारे असतात. अशी शिल्पे सहज म्हणून कोरलेली नसतात. त्यांची एक परिभाषा असते. ते शिल्प तेथेच का कोरले याचे एक विशिष्ट कारण असते.

वास्तूशिल्पशास्त्राप्रमाणे पूर्वेकडील दरवाज्यावरील द्वारपाल मूर्तींना जय-विजय, पश्चिम द्वारपालांना नंद-सुनंद, दक्षिण द्वारपालांना बल- प्रबल व उत्तर द्वारपालांना कुमुद-कुमुदाक्ष अशी नामाभिमाने आहेत.

दारातून आत येतांना मंगलसूचक गणेशपट्टीच्या मध्ये गणपती, कुंभ, कलश, लक्ष्मी, कमल आदी प्रतिमा आढळून येतात. गणपतीचे दर्शन व्हावे अथवा गणपतीने अरिष्टांपासून रक्षण करावे ही त्या मागची भावना. कांही दरवाज्यावर गणेशपट्टीच्या एवजी कोनाडा ठेवलेला दिसतो, बाजूने पाने, फुले, फळे, गरुड, हत्ती, मोर अशी निरनिराळी नक्षीही कोर्ट असत.

दरवाज्याच्या चौकटीवर अतिशय कलात्मक नक्षीकाम असते, त्याला द्वारशाखा म्हणतात. नक्षीच्या घडाईसाठी मऊ दगड वापरतात. प्रवेशव्दाराला दगडी चौकट कमानदार व त्यावर बाजरी घडाई किंवा माटीव घडाई असते. दगडी चौकटीच्या बाजूने भक्कम दगडी चिऱ्याचे बांधकाम असते. या बांधकामासाठी काळा पाषाणाचा दगड वापरतात. माटीव घडाईचे दगडातील कोनाडे असतात. अशा कोनाड्यात रात्रीच्या वेळी उजेडासाठी दिवे ठेवले जातात.



दगडी कमानीत
लाकडी प्रवेशद्वार.
लाकडी बिन्नीचा
दरवाजा






साखळी,
स्टॉपर
अडसर



अडसर कडी
कोयंडा व पितळी
फुले







दरवाज्यावरील गणेशपट्टी



# उंबरठा

**उंबरठा म्हणजे मर्यादा. अनोळखी व्यक्ती साठी उंबरठा ही लक्ष्मण रेषा असते.** घर असावे घरासारखे, नकोत नुसत्या भिंती. हे शब्द वर्णन आपल्याला घराचं महत्वं व त्यातील गोडवा पटवून देतात. वास्तू म्हणते असावा घराला उंबरठा समोर रांगोळी वर हळदी कुंकू टाका. नुसती मोठमोठाली रंगीबेरंगी घरे बांधून त्यात गोडवा माणुसकी आणता येत नाही. त्यासाठी घरातल्या माणसांच्या मनात भाव असावा लागतो. पूर्वीच्या वाड्यात दिवस रात्र किलबिलाट असायचा. अनेकांचा राबता असायचा.

दरवाज्याच्या पायाशी बसवलेला चपटा, सपाट आकाराचा, थोडासा ओबडधोबड लाकडी ओंडका म्हणजे उंबरठा. उंबरठा हा चौकटीचा भाग नसून उंबराच्या झाडाची उंच जाड फळी आडवी लावलेली असते. उंबराचे लाकूड मजबूत व लवकर कुजत नाही. पूर्वी घराच्या दारात आवर्जून उंबराच्या लाकडाची फळी ठोकली जात असे म्हणून त्याला उंबरठा म्हणत असत. पूर्वीच्या घरांना परंपरा, संस्कृती, दबदबा, मानमर्यादा, आदर असायचा, काही उंबरठ्यावर जुनी नाणी, घोड्याची नाल ठोकलेली असायची. घरावर वक्रदृष्टी पडू नये, भूतपिशाच्च घरात

येऊ नये. यासाठी नाल ठोकण्याचा त्या काळी समज होता. लग्न, किंवा कुठलाही सण असो. आधी उंबरठाच पुजला जायचा. त्यानंतर चूल पुजली जायची. ज्यामुळे आधीचा हळदी-कुंकवाचा रंग पुसला जात नाही तोच पुन्हां कुठल्यातरी निमित्ताने हा उंबरठा उजळला जायचा.

घरातील कोणीही महत्वाच्या कामासाठी बाहेर पडताना उंबरठ्यावर नतमस्तक व्हायचा. उंबरठ्याच्या शिरांमध्ये साचलेली माती मस्तकी लाऊन मोठमोठी संकटे अंगावर झेलण्याची ताकद त्याला मिळत असे. नववधू घरात पाहिलं पाऊलही उंबरठ्याच्या साक्षीनं धान्याच्या माप ओलांडून प्रवेश करायची. एकदा धान्यांन भरलेल माप ओलांडून नववधूने घरात पाहिलं पाउल टाकल की, घरातील कर्त्या माणसाच्या परवानगी शिवाय उंबरठा ओलांडणे शक्य नसायचे.

इतका त्या उंबरठ्याला मान असायचा. लहानपणी उंबरठ्यावर बसून अनेक खेळ खेळलेले असायचे. जर घराचा उंबरठा ओलांडला तर याद राख. याच शब्दात वडील धाऱ्यांनी दरडावले की, घर सोडून जाणारा आपोआप गर्भगळीत व्हायचा. लहान मुले धावताना उंबरठ्याला ठोकर लागून नाकातोंडातून रक्त आल्यावर त्यांना या उंबरठ्याचा रागही यायचा. मग मोठी माणसंही बळेबळेच याने पाडले का तुला, थांब आपण याला मारू, अस

म्हणत उंबरठ्यावर खोटा राग काढायचे. त्यांनी उंबरठ्यावर जोराचा पाय आपटला, की कडेवरच्या मुलाच्या डोळयातून अश्रू आणि हसू फुलायचं. असा हा उंबरठा. एवढा मान उंबरठ्याला होता. आताच्या फ्लॅट सिस्टीममध्ये उंबराच गायब केला आहे.

## नगारखाना

नगारखाण्याचे स्थान हे किल्यांच्या, देवळाच्या किंवा वाड्याच्या प्रवेशव्दारापाशी किंवा दिंडी दरवाजाजवळ असते. राज्यांचा प्रमुख येत आहे हे समजण्यासाठी बांधकामात नगारखान्याची रचना असे. प्रमुख येताच नगारे वाजवले जात. त्यामुळे तेथील वातावरण एकदम शांत होई. लोकांना समजे राजा किंवा प्रमुख येत आहे. पूर्वी दिवसाच्या ठराविक वेळेस काल दर्शवण्यासाठी, सूचनेच्या प्रसंगी सूचना देणेसाठी, इशाऱ्याच्या वेळी नगारा, शिंग, तुतारी व इतर वाद्य वाजवण्याची सर्वोच्च जागा.

तसेच राज्याचा प्रमुख आल्यानंतर फुले हारतुरे उधळण्यासाठीची मोक्याची जागा. तसेच गडाची दारे उघडताना आणि बंद करताना तसेच महत्वाच्या प्रसंगी नगारे वाजवले जात असत. धार्मिक कार्यामध्ये नगारे वाजवण्यासाठी किंवा नगारे ठेवण्यासाठी जागा असावी म्हणून नगारखाना उदयास आला. जर यजमानांना नौबतीचा मन असेल तर वरच्या मजल्यावर नौबतखाना म्हणजे नगारखाना असे. नगारखान्याला तसं विशेष महत्व म्हणजे वाचनासाठी. मैफलींसाठी अशा अनेक कारणांसाठी नगारखाण्याचा उपयोग होत असे. नगारखान्यातील नगारा वाजायला सुरवात झाली की गावातील, शेजारचे लोकं वाड्यात जमा व्हायचे. अंगण भरून जायचे. असा हा नगारखाना.


# देवडी

देवडी म्हणजे जुन्या वाड्यात आत शिरलं की, बसण्यासाठी मुख्य दरवाज्याच्या बाजूला असलेली, दरवाज्यावर तैनात असलेल्या सैनिकांना, पहारेकऱ्यांना बसण्याची, विश्रांतीची, पहारा देण्याची जागा किंवा चौकी. तसेच रात्रीच्या विश्रांतीची केलेली सोय म्हणजे देवडी होय.

# खुंटी

पूर्वीच्या काळी कोणत्याही घरात, वाड्यात गेल्यावर प्रथम दर्शन होते ते भिंतीवरच्या लाकडी खुंटीचे. टिकाऊ लाकडापासून बनवलेली साध्या प्रकारची खुंटी घराच्या प्रत्येक भागात असायचीच. तरून पिढीला खुंटी म्हणजे काय हे माहितही नसेल. पूर्वीच्या काळी खुंटी विना घर नसायचे. त्याकाळी खुंटीची उपयुक्तता बहुउपयोगी असायची. सुतारकाम करणारे लोक सुबक आकाराच्या खुंट्या बनवू लागले. त्यामुळे भिंतीलाही शोभा यायची. खुंट्याचा अनेक कामासाठी उपयोग होत असे. जसे शाळेचे दप्तर, शर्ट, टोपी, धोतर, पागोटे, कापडी पिशव्या, छत्री, सूप, केरसुणी, विहिरीतून पाणी काढायच्या दोऱ्या, फुलांच्या माळा, दोरखंड, नऊवारी पातळ, साडी, लुगडे, अंथरून पांघरून, शेतातील अवजारे, दोरखंड ठेवण्यासाठी. टाळ, मृदंग, ढोलकी अडकवून ठेवण्यासाठी तसेच रात्रीच्या वेळी उजेडासाठी कंदील, बत्ती अडकविण्यासाठी सुरक्षीत जागा म्हणून खुंटीचीच जागा निवडली जात असे. मुले उंची वाढवण्यासाठी खुंटीला धरून लोंबकळायचे.

अशा विविध कामांसाठी खुंटीचा उपयोग होत असे. लाकडी खुंट्या थेट भिंतीत असल्याने वजनाने भारी असलेल्या वस्तुही सहज पेलत असत. यासाठी लाकूड वेगळे घ्यायची गरज नसायची. लाकूड काम करत असताना त्यातून जे वेस्टेज शिल्लक राहिलेलं लाकूड असायचे त्याचा वापर खुंटी बनवण्यासाठी करायचे. लाकडाचे काम करताना भिंतीवरची खुंटी जमिनीत ठोकली तर त्याची मेख व्हायची. असा मल्टीपर्पज उपयोग आपल्या पूर्वजांनी या खुंटीच्या बाबतीत केलेला दिसत आहे.







खुंटी व देवळी

## कोनाडा/ देवळी

एकाच दगडात कोरलेली अथवा भिंतीच्या रचनेतील दोन तिन दगडांच्या काटछाटी मुळे दिवा, पणती ठेवायला तयार करवून घेतलेली जागा. पूर्वीच्या काळी प्रत्येक खोलीला कपाट करण्याची पद्धत नव्हती. खोलीच्या सर्व कोपऱ्यात उजेडासाठी पणती, दिवा, किंवा फुटकळ वस्तू ठेवण्यास करण्यात आलेली भिंतीतील खाच म्हणजे कोनाडे किंवा देवळी. कोनाडा साधरणतः एक फुट बाय अर्धा फुट उंचीचा भिंतीतील कप्पा. हा दिसायला जरी छोटा असला तरी यात ज्या वस्तू ठेवल्या जायच्या त्या मात्र नक्कीच महत्वाच्या आणि पटकन सापडाव्यात अशाच ठेवलेल्या असायच्या. प्रत्येक कोनाड्याची जागा ठरलेली असायची. अंधारातही सहज सापडाव्यात अशा अनेक गोष्टी वर्षानुवर्ष तिथेचं ठेवलेल्या असायच्या.

**कुठं कुठं होते कोनाडे:-** घरात, वाड्यात, महालात, किल्ल्यात, समाधीवर, तुळशी वृंदावनात, ओसरीत, पडवीत, माजघरात, अडगळीच्या खोलीत, मशिदीत, विहिरीत, नदीच्या घाटाला, बारवेच्या आतल्या पोटाला, दीपमाळेत, कुस्तीच्या तालमीत अशा विविध ठिकाणी कोनाडा असणार म्हणजे असणारचं. ग्रामीण भागातील देवळी किंवा कोनाडा यांचे वेगवेगळे प्रकार पहायचे म्हटलं, त्याचे जर कलेक्शन केले तर देवळी किंवा

कोनाड्याच्या प्रदर्शनाची थीम होऊ शकते. एवढे कोनाड्याचे प्रकार आहेत.

**देवळी किंवा कोनाड्यात काय काय ठेवता यायचं:-** कोनाड्यांचा उपयोग मुलांची पुस्तकं ठेवायला, कंदील, घरातल्या बाईच्या वेणी-फणी-कुंकवाचे साहित्य, चुलीजवळ चिमणी, विळा, दिवा, औषधांचा डबा देखील अशाच कोनाड्यात ठेवलेला असायचा. काही कोनाडे मोठे, काही छोटे, त्याच्या वरखाली शुभ-लाभ रंगवलेले असे नाना उपयोग असत. या देवळींची/देवडींची रचना ही पाऊस-वाऱ्यापासून दिवा विझू नये अशी साधारण असते. काही वाड्यांमधे देवळांमधील देवड्या अथवा देवळी या सुंदर अशा महिरपी आकाराच्या कोरलेल्याही अढळतात.

मंदिरांसमोर असलेल्या दिपमाळा पावसामुळे किवां वाऱ्यामुळे दिपमाळेवरील दिवे विझू नये म्हणून दिपमाळेच्या मनोऱ्यात अनेक देवळी कोरल्यासारखी रचना अढळून येते. पुढे मंदिर आणि घरांमधे विजेवर चालणारे दिवे आल्यानंतर या देवळीचा उपयोग लहान-सहान वस्तू ठेवण्यासाठी होऊ लागला. आजही अनेक खेडेगावांमधे विशिष्ट सणवारांना या देवळींमधे पणती ठेवली जाते तेव्हा त्या वास्तूच्या रचनेत त्या मंद तेवणाऱ्या दिव्यामुळे सुंदरतेत भरचं पडते.









कोनाड्याचे विविध प्रकार







कपाट म्हणून भिंतीतील
कोनाड्याचा उपयोग

# मेघडंबरी

वास्तू वैशिट्य दाखवणारी क्वचित वाड्यांना दिसणारी मेघडंबरी हा एक वास्तूप्रकार आहे. वाड्याच्या दुसऱ्या मजल्यावरून बाहेरील दृश्य पाहण्यासाठी मेघडंबरीची खास योजना केलेली असावी. मुख्य दिवाणखान्यातून तेथे जाण्यासाठी महिरपदार कमानी व काळया कातीव लाकडी सुरूच्या खांबावरच सुशोभित अर्धघुमटाकार छत्र्या योजून मेघडंबरीची खास योजना केलेली दिसते.

हत्तीच्या पाठीवर असते तशा अंबारीप्रमाणे मुख्य प्रवेशव्दाराच्या वर मेघडंबरीची रचना केलेली असते. त्याला आधारासाठी भार तोलण्यासाठी लाकडी चार सहा तीर बसविलेले असतात. या तीराची रचना मगरमुखी, मासामुखी, वाघमुखी, सिंहमुखी, मोरमुखी, गरुडमुखी, मकरमुखी यांची प्रतिकृती असून अतिशय बारीक कोरीव काम त्यावर केलेले असते. असे प्राणी, पक्षी बलाचे प्रतिक असून त्यांच्या शक्तीचा उपयोग वाड्याचा किंवा त्या इमारतीचा भार तोलून धरण्यासाठी केलेला आहे असे आपणास वाटते. तीराच्या खाली आधारासाठी भिंत असते. तीराचा संपूर्ण भाग हा नक्षीकाम केलेला असतो.

मेघडंबरीला लाकडी तळखडे, तळखड्यावर सुरूदार लाकडी खांब, खांबावर मेघडंबरी उभारलेली असते. खांबावर वेगवेगळ्या प्रकारचे नक्षीकाम केलेले असते. खांबाच्या खालच्या भागावर नक्षी, मध्यभागी व त्याच्यावर त्याहून भिन्न स्वरुपाची नक्षी कोरलेल्या असतात. प्रत्येक खांब एकमेकांना महिरपी कमानींनी जोडलेला असतो. तो दोन भागात वेगळा करून दाखवत असतं. कमानीच्या वर लाकडी पट्ट्या बसविलेल्या. प्रत्येक पट्टीवरील नक्षीकाम वेगवेगळे दिसते.

नागफणीचे डिझाईन, पान, मण्याची माळ, फुलं, वेली भौमितिक आकृत्या, निसर्गातील अनेक गोष्टी त्यावर कोरून कोपऱ्यावर पावसाचे पाणी वाहून बाजूला पडावे म्हणून शिंगाच्या आकाराची छान नक्षी केलेली असते. मेघडंबरीचे आतले छत कडीपाटचे अथवा शंकरपाळ्याच्या नक्षीचे असते.

# ध्वज

ध्वज किवां झेंडा हे मानाचे, यशाचे, आदर्शाचे चिन्ह. त्याचप्रमाणे संदेशवाहक म्हणुन ध्वजाचा उपयोग प्राचीन काळापासून आढळतो. प्राचीन काळी काठीला एखादी विशिष्ट प्रतिमा बांधून खुणेचे निशान तयार करीत. प्राचीन मानव समूहांनी आपापल्या गटाची चिन्हे म्हणून पशु, पक्षी, तसेच दैवी वस्तू वा देवता यांच्या चित्रांचा उपयोग केलेला आढळतो. लढायांत निरनिराळी पथके, तुकड्या, पक्ष इत्यादी दाखवण्यासाठी निशानांची नितांत गरज असायची. शत्रू किंवा मित्र ओळखायला त्यापेक्षा चांगले साधन त्यावेळी दुसरे नव्हते. कापड निर्मितीचे तंत्र व रंगारीकाम या गोष्टी अवगत झाल्यावर पताका आणि ध्वज निरनिराळ्या चमकदार व सुंदर रंगांनी आणि चित्रांनी रंगवले जाऊ लागली. कापडाला सोनकावेत बुडवून भगवा रंग तयार करत असत. त्यांनंतर पुढील काळात हवेत फडफडणारे रंगबेरंगी ध्वज उत्तेजक व प्रेरक ठरले. ध्वजाला झेंडा, दिंडी, ध्वज पताका असे मराठीत शब्द आहेत.

शास्त्रावर्गाचा उदय झाल्यापासून प्रत्येक योद्धा आपापला वेगळा ध्वज वापरू लागला. **भगवा रंग सूर्योदयापूर्वी दिसणाऱ्या लालसर कावेसारखा आहे. त्याच प्रमाणे 'भग'**

**म्हणजे सूर्य असाही संबंध लावता येतो.** जरीपटका हा मराठी सेनेचा ध्वजही भगवा आहे. ध्वज हे प्राण असल्यामुळे त्यांचे निष्ठेने रक्षण करण्यात येई. ध्वजपताकांवर मारा करून त्यांना खाली पाडणे, तोडणे म्हणजे पराभव झाला असे समजतं. युद्धात ध्वजाखाली सैनिक लढत. मराठा सेनेचा राष्ट्रध्वज भगवा व जरीपटका हा तिकोनी असून त्यावर जरतारीकाम केलेले असे.



# चौक

वाड्याचा महत्वाचा भाग म्हणजे चौक. चौक कामरेइतका खोल असतो. चौकाच्या माध्यमातून हवा व उजेड मुबलक प्रमाणात आत येत असे. चहुबाजूने बांधकाम करून चौक तयार होत असे. चौकाची लांबी वाड्याच्या आकारावरून ठरवत असे. आतील खोल्यात उजेड, प्रकाश, हवा खेळती राहण्यासाठी चौक आकाशात खुले असत. एक चौकापासून ते सात चौकापर्यंत वाडे असतात. चौकाच्या वापराचा अर्थ प्रत्येक कुटुंब प्रमुख आणि त्यांचे कुटुंबीय वेगवेगळ्या प्रकारे लावू शकत होते.

घरातील कर्ती माणसं चौकाचा उपयोग सार्वजनिक आणि कचेरीच्या कामांसाठी करत तर मधले चौक हे स्त्रिया त्यांचे सण समारंभ साजरे करण्यासाठी करत असत. आणि आतले चौक घरगुती कामांसाठी वापरत असत. चौकाचे अनेक घटक होते. ओटा, सोपा व्हरांडा, त्यावरची गच्ची, जिना, पुष्करणी, कारंजे, हौद, विहीर, आड, तुळशीवृंदावन असे कितीतरी घटक या चौकाशी निगडीत असत. हे सर्व घटक सर्वच चौकात नसत.उदाहरणार्थ पुष्करणी किंवा कारंजे हे फक्त बाहेरच्या म्हणजे प्रवेशव्दाराजवळच्या चौकातच असत. हौद हे मागच्या चौकात असत. जेणेकरून स्वयंपाकघर व स्वच्छतागृहासाठी पाण्याचा

वापर कारणे सहज शक्य होईल. तसेच पाटीमागील चौकाचा उपयोग स्त्रियांना त्यांची कामे करण्यासाठी होत असे.

पाण्यासाठी आड / छोटी विहीर असते. त्याचा व्यास सहा ते दहा फुटापर्यंत असतो. यातील पाणी काढण्यासाठी पोहरा असतो. बऱ्याच ठिकाणी रहाट देखील असतात. **चौकातील जमीन ही सपाट दगडाने बांधून काढीत. त्याचा मुख्य उद्देश विहिरीपाशी पाण्याचा व्यवहार होत असल्याने ते पाणी जमिनीत मुरून इमारतीच्या पायाला धोका निर्माण व्हायला नको. चौकात पडणारे पावसाचे पाणी दगडी पन्हाळीने जमिनीखालून परसात नेऊन शोषखड्डयात सोडलेले बघायला मिळते. “पाणी आडवा पाणी जिरवा” ही सरकारी घोषणा त्या पिढ्यांनी मात्र मनस्वी स्वीकारली होती हे कळते.**

चौकाच्या चोहोबाजूने बांधकाम करून दरवाजे, खिडक्या,भित्तीचित्रे, कमानी, महिरपी, तोरण, तुळशी वृंदावन. दगडी घडाईची किंवा शेणाने सारवलेली जमीन.जोत्याला लोखंडी रिंगा लावलेल्या. या रिंगाचा उपयोग मांडव टाकावयाचा असेल तर त्याला दोऱ्या बांधता येतात.

चौकामध्ये रांगोळी, फुलांची आरास, कारंजे, कावेच्या-चुन्याच्या रंगात कमानी/ महिरपी असतात. कावेच्या रंगावर भित्तीचित्रे, गुलदस्ते असतात. इतर ठिकाणी चुन्याचा रंग दिलेला असतो. गिलाव्यामध्ये कमळफुलांची उलटसुलट नक्षी असते. चौकात किंवा सज्ज्याच्या कोपऱ्यावर जेथे पाणपट्ट्या काटकोन करतात तेथे मोठे लाकडी लोलक लावतात. याचा साधारण आकार उलट्या टांगलेल्या कळीसारखा किंवा केळ फुलासारखा असतो. आणि ते जोडकाम करून बसविलेले असते.

नक्षीदार खिडक्या, चौकात थुईथुई उडणारे कारंजे बाजूने लावलेली फुलझाडे त्यातून येणारा सुगंध व कारंज्याचा आवाज त्यामुळे तेथे सुखद अनुभव येतो. यामुळे चौक उठून तर दिसतोच. चौक शांत असला तरी चौकात एकटं कधीही वाटत नाही. पाण्यामध्ये वेगवेगळया रंगाचे दिवे लावले की रात्रीच्या वेळी ही कारंजी छान दिसतात. अशा विविध गोष्टींनी चौकाला सुशोभित केलेले असते. मोठे सण, उस्तव, लग्नासारखे समारंभ चौकात केले जायचे. स्त्रियांचे सण जसे हळदी कुंकू, मंगळागौर असेही सण साजरे केले जायचे.



चौकातील पाणी वाहून जाण्याची दगडी जाळी






**चौकातील पाणी वाहून जाण्याची दगडी जाळी**



# सोपा

सोपा म्हणजे चौकाच्या बाजूला जोतं असलेली जागा. सोपा हा देखील वाड्याचा महत्वाचा भाग. सोपा हा पूर्णपणे खुला असतो. त्याला दरवाजे वगैरे अशी संकल्पना असत नाही. सोपा हा समोरील बाजूने लाकडी खांबावर तरलेला तर मागील बाजूने भिंतीवर. त्याची जमीन दगडी किंवा शेणाने सारवलेली असते. जोत्यावर ओळीने असलेल्या लाकडी किंवा दगडी खांबावर आधारित समोरच्या बाजूला सज्जे अशी या सोप्यांची रचना असते. अर्धाच्छादित असल्यामुळे उनाची तीव्रता कमी होत असते. त्यामुळे तेथे गारवा जाणवत असतो. छताला कडीपाटाची रचना अथवा डिझाईनमध्ये रचना असे. छताला हंड्या झुंबर लटकवलेली, भिंतीतही मशाली लटकवलेल्या असत.

सोपे देखील विविध कामांसाठी वापरले जात. बाहेरच्या सोप्यांमध्ये पाहुण्यांच्या बसण्याची व्यवस्था, कारकुनांचे फड, मालकांची गादी असायची. वाड्यात आलेल्या प्रत्येक व्यक्तीची मायेने प्रेमाने विचारपूस करून आदरतिथ्य या सोप्यावरचं करत असत. ज्या आसनावर बसून न्याय निवाडे केले जायचे ते आसन देखील पूजनीय असायचे. पुरुषांच्या कामाच्या चर्चा, भेटीगाठी, गप्पा सोप्यावरचं होत असतं.

आतल्या सोप्यांमध्ये महिलांचे घरगुती कामकाज चाले. मुलेही अशा सोप्यांच्या सावलीत खेळत. या सोप्यांमध्ये लाकडी पाटाचा झोपाळा लटकवलेला असे. याचा वापर लहान मुलांपासून पुरुषांपर्यंत सर्वजण करत. कारंजे विहिरीवरचा रहाट, झोपाळा हे उपयुक्त आणि दृश्य परिणाम साधणारे घटक नव्हते तर त्याचा एक श्राव्य परिणाम देखील साधला जात असे. त्यामुळे वाडा हा केवळ चौक, खोल्या आणि सोपा या घटकांनी बनलेलं घर न राहता माणसांच्या व्यक्तीमत्वाचा अविभाज्य भाग होता.

## कारकुनाचे हिशोब लिहण्याचे टेबल व बसण्याची गादी




# तळखडे

वाडे बांधताना प्रामुख्याने दगड, लाकूड, विटा यांचा वापर केला जात असे. वाड्याच्या दगडी चौथऱ्यावर उभे लाकडी खांब व त्यावर इतर बांधकामे केली जात असत. वाडा बांधताना विशिष्ट आकाराच्या कोरलेल्या नक्षीदार दगडावर किंवा लाकडावर वाड्याचे लाकडी खांब उभे केले जात असत. यामुळे लाकडी खांबाना एक प्रकारे ओल, किड इत्यादी गोष्टीपासून संरक्षण मिळे.

तळखडे बनवण्याच्या पद्धती दोन प्रकारच्या आहेत. लाकडी आणि दगडी शैलीतील स्तंभाचे तळखडे हे वेगवेगळ्या नक्षीचे दिसून येतात. सर्वसाधारणपणे लाकडी तळखडे आतील बाजूने लावत असत. त्यामुळे उन, वारा, पाऊस यांचा त्यावर परिणाम होत नसे. अशाच प्रकारचे दगडी घडीव तळखडे वाड्यातील सर्व स्तंभाच्या खाली असतात.



तळखडे



## खांब (स्तंभ)

वाड्यात प्रवेश केल्यानंतर दोन्ही बाजूला ढाळज व पुढे चौक असतात. ढाळजेमध्ये मजबूत खांबाच्या योजना केलेल्या असतात. खांब दोन प्रकारचे असतात. चौकोनी व गोलाकार आकाराचे असतात.

**चौकोनी खांब**:- चौकोनी खांब खालून मध्यापर्यंत जवळपास साधाच असतो. व त्यावरील भाग अनेक पानाफुलांच्या कोरीव कामाने सजविलेले असतात. वर चढत जाणारी वेल व त्याचा शेवट हा मोराच्या रचनेने केलेला असतो. खांब जात्यात खुंटा बसवावा त्या पद्धतीने चौकोनी अथवा गोल तासलेल्या दगडी तळखड्यात बसवीत असत. वर टाकलेल्या दोन तुळयामध्ये जोडणाऱ्या कड्या साधारणपणे ५ ते ९ से.मी. रुंद असत.



चौकोनी खांब

**गोलाकार खांब:-**

गोलाकार खांब खालून फुगीर व वरती थोडे कमी फुगीर निमुळते होत गेलेले असतात. **जोत्याच्या ७ पायऱ्या चढून वर आलो की गोलाकार बाराकोनी लाकडी खांब असतात. जे बारा कोन आजच्या दिनदर्शिकेचे बारा महिन्यांचे निदर्शक आहेत. १२ x ७ = ८४ म्हणजेच ८४ लाख योंनीमधून प्रवास करत फिरत आहोत असे वाटते.** अशा खांबावर अनेक टोकदार झाडांच्या पानाची रचना असते. खांबाच्या खालच्या बाजूस एखाद्या कुंडीची रचना कोरलेली असते. वरील बारीक होत जाणारा खांब शक्यतो साधा ठेवला जातो. हे खांब प्रामुख्याने दगडी नक्षीदार तळखड्यावर बसविलेले असतात. अशा तळखड्यावर वेलपत्ती, कमळपुष्प कोरलेले असतात. खांबावर, छतावर बारीक सुंदर नक्षीकाम केलेले असते. लाकडी महिरपीतून साकारलेले सुंदर कोरीव खांब, छतावर नक्षीदार आकृत्या कोरलेल्या दिसतात.




**कपाट म्हणून भिंतीतील कोनाड्याचा उपयोग**




लाकडी स्तंभ अर्ध्या
खांबाचे सहा कोन





**अर्ध्या खांबाचे सहा कोन**




**अर्ध्या खांबाचे सहा कोन**

## स्तंभशीर्ष

क्षेत्रफळ वाढविण्यासाठी स्तंभशीर्ष आणि हस्त यांचा वापर करतात. स्तंभशीर्षचा आकार कमळासारख्या फुलांवर आधारलेला असतो. स्तंभ व हस्त यांना जोडणारा भाग म्हणजे स्तंभशीर्ष होय. अशा स्तंभशीर्षवर कलात्मक मण्यांची माळ, कमळांची फुले, पाने, वेलबुट्टी, सुंदर मोर किंवा भौमितिक आकृत्या फारच कौशल्याने सुबकपणे कोरलेल्या असतात. त्यामुळे स्तंभाचा, छताचा भाग आकर्षक दिसतो. या स्तंभावरूनही त्याची सौंदर्यदृष्टी वा वास्तूंची शैली प्रकार ठरविण्यास मदत होते.



## हस्त

साध्या खांबासोबत येणारे हस्तही साधेच चौकोनी ठोकळे असतात. तर दुसरे हस्त तरंगाचे असून त्यामध्ये उलटसुलट कमळ पुष्पे, पशुपक्षी, वेल, पाने व इतर शृंखला कोरलेली असते. हा हस्ताचा सर्वसामान्य प्रकार आहे. झुंबर, हंड्या अडकवण्यासाठी गोल लोखंडी कड्याही काही ठिकाणी असतात.



# सर

सर हे भार सहन करणारे मुख्य घटक आहेत. म्हणून त्यांच्यावर कोरीव काम केले जात नाही. जर केले तर ते खूप कमी प्रमाणात केले जाते. सर्वसाधारणपणे जी काही सजावट केली जाते ती लांबट पद्धतीमध्ये पानाफुलांच्या वेलबुट्टीसहित केली जाते.



# छत

छत हे अतिरिक्त फळीचा भाग असून फार मोठा भाग छताने व्यापलेला असतो. छताचा भार सरावर असतो. सराच्या वर कडे असतात. त्या दोन कड्या सरावर टेकलेल्या असतात. त्या कड्यावर छतावरील मातीचा भार सहन करण्यासाठी फळ्याचे छोटेछोटे तुकडे करून टाकले जातात. यालाच लोखंडाच्या हलकडया लावल्या जातात. त्यानंतर त्यावर पांढऱ्या मातीचा थर व त्यावर विटांचा थर टाकला जातो यालाच माळवद असे म्हणतात. पांढरी माती उन्हाळयात उष्णता रोधकाचे काम करते. त्यामुळे माळवद उन्हाळयात थंड राहते.

छताच्या विस्तृत सपाट भागावर शोभन करावयाचे असेल तर भूमितीच्या चौकटीत बसवून बाजूने वेलबुट्टी कोरतात. पाणीपट्टीवर ही अशीच सजावट कोरतात. छताच्या बारीक कोरीव कामास फार महत्त्व होते. काही ठिकाणी छत झाकेल असा मखमली पडदा लावला जाई व त्यास काळयानिळया चांदण्या लटकविल्या जात. त्यामुळे आपण मोकळया आकाशात चांदण्यांच्या प्रकाशात बसलोय असे वाटे. छताच्या पुढे आलेल्या सज्ज्याच्या लाकडी भागाला पाणीपट्टी असते त्यावरही नक्षी कोरलेली असते. छताला खालच्या बाजूने वेगवेगळया पद्धतीने नक्षी कोरलेले असतात. छताचे तिन चार प्रकार असत.

**साधे छत:** यामध्ये छताला प्लेन फळ्या दिसतात व त्यावर रंगरंगोटी केलेली असते. हंड्या अडकवण्यासाठी हुक असतात.

**कडीपाटाचे छत:** दोन तुळयाच्यामध्ये प्लेन फळ्या व त्यावर आडवे तिनचार इंचाचे लाकडी चौकोनी वासे लावले जात.

**डिझाईनचे छत:** दोन तुळयाच्या मध्ये छतावर प्लेन फळ्या व त्यावर पानाफुलांचे सुंदर पर्नाकृती नक्षीकाम असते. वरवर पाहता ते वेलपत्तीसारखे वाटते. पण ते भूमितीच्या चौकटीमध्ये बसविलेली असते.

नक्षीचे सुटे भाग करून ते छतावर बारीक खिळ्याच्या सहाय्याने ठोकून बसविलेले असते. नक्षीचे छत तयार करताना मध्यभागातून सुरु करतात व शेवटाला वेलबुट्टीचे नक्षीने संपवतात. मध्येमध्ये झुंबर, हंड्या या अडकवण्यासाठी हुक लावलेले असते.



कडीपाटाचे छत

डिझाईनचे छत






साधे छत

डिझाईनचे छत





नक्षीदार छताचे प्रकार



## पाणीपट्टी

वाड्याच्या आतील चौकात वा सज्ज्याच्या कोपऱ्यांवर जेथे पाणपट्ट्या काटकोन करतात, तेथे मोठे लाकडी लोलक लावतात. यांचा साधारण आकार उलट्या टांगलेल्या कळीसारखा किंवा केळफुलासारखा असतो. यावर वेलबुट्टी, मोर किंवा पोपट अशी प्रतीके जोडून बसविण्यात येतात.

**चौकातील पाणीपट्टी व ग्लोब**





चौकातील पाणीपट्टी व ग्लोब

लाकडी ग्लोब



## भित्तिशिल्प

भित्तीचित्रे काढण्यासाठी पूर्वीच्या काळी भिंतीचा गिलावा देखील वेगळ्या पद्धतीने करत असत. म्हणून पूर्वी काढलेली भित्तीचित्रे आजही शाबूत आहेत. चुनां, गुळ, काकवी, शेण, तांदळाचा कोंडा, वाळलेले गवत, नारळाचे केसर, डिंक, साळीचे तणस आणि ओली माती यांचा मुलामा विट बांधकामाच्या पृष्ठभागावर देऊन तो नीट चिकटल्यावर चुन्याचा हलका हात देत त्यावर देत असत. उत्कृष्ट प्रकारची सफेती तयार करावयाची असल्यास चुन्यांत नारळाचें दूध देखील घालतात. अशा पद्धतीने पूर्वी भिंतीला गिलावा केला जाई व त्यावर भित्तीचित्रे काढली जात.

घरे, राजप्रासाद, वाडे इत्यादींच्या भिंती विविध प्रकारे सुशोभित करण्याची कला जगभर आढळते. भित्तिशोभन हे गृहशोभनाचे एक अंग आहे. गृहशोभन सौंदर्यवर्धना बरोबरच वास्तुरचनेतील उणिवा किंवा इतर दोष दूर करून वास्तूचा अंतर्भाग आकर्षक, वेधक करणे हे भित्तिशोभनाचे सर्वसामान्य उद्दिष्ट म्हणता येईल. अनेक प्रकारच्या साधनसामग्रीने भित्तिशोभन करण्यात येते. लाकडी चौकटी किंवा फळ्या, मखमली प्रकारचे कापड, धातूंचे

पत्रे, छायाचित्रे, आरसे, रंगीतकाचा, दुधी अथवा साध्या काचा इत्यादी माध्यमांचा उपयोग करून भिंती सजविण्यात येतात. भिंतीत बसविलेल्या रंगीबेरंगी काचा, कलात्मक कोनाडे हे कायम स्वरूपाचे असतात. आरसे, छायाचित्रे, निसर्गचित्रे, पडदे, भिंतीवर टांगण्यासाठी केलेल्या कलात्मक वस्तू, काचेची कपाटे, लाकडी कपाटे इत्यादी साधनांनी भिंतीची सजावटीत पाहिजे तेव्हां बदलही करता येतो.

वाड्यात प्रवेश केला की, भिंतीवर गणपती व रिद्धीसिद्धी अशा देवतांची चित्र दिसतात. अंबारीसहित झुल घातलेले हत्ती, त्यावर नगारा, माहूत, भगवा ध्वज, मावळे अशा भित्तिशिल्पांना सुरूवात होते. गणपती, रिद्धीसिद्धी अशी भित्तीचित्रे रंगीत असतात बाकीचे गुलदस्ते, मासा, वेलबुट्टी, शरभ, गंडभेरुड, अत्तरदाणी, गुलाबदाणी, पानदान, अत्तरकुपी, लामनदिवे, शिवपंचायतन, समुद्र मंथन, रामायण, महाभारत, विविध पौराणिक कथांवर अशी चित्रे गेरूच्या रंगावर पांढऱ्या रंगात रेखाटलेली आढळतात. वरून येणाऱ्या सूर्य प्रकाशामुळे गुलदस्त्यावर प्रकाश-सावलीचा खेळ रंगतो. तेच भित्तिशिल्प तास दोन तासाने पाहिले की प्रकाशाची दिशा बदलल्याने वेगळीचं दिसतात. अशी भित्तिशिल्प कितीही वेळा बघा, दरवेळी वेगळीच वाटतातं ते यामुळेच! हे सारे नक्षीकाम

किती अत्त्युच्च दर्जाचे होते हे शब्दात वर्णन करणे निव्वळ अशक्य आहे. छोटे-छोटे तपशील इतके बारकाईने कोरलेत यावर विश्वास बसत नाही. अक्षरशः मेणावर कोरल्यासारखे वाटते.

रिद्धीसिद्धीच्या दागिन्यांमधला मणी न मणी वेगवेगळा, बाजुबंद, बांगड्या, केशभूषा, पैंजण वेगवेगळे असतात. एकसारखी दुसरी नाही. देवांच्या मुकुटांमधील नक्षीकाम, जरतारी कपडे, हत्तीची झुल त्यावरील नक्षीकाम, सैनिक त्यांचे पोशाख, नगारे अक्षरशः इतक्या बारकाईने त्यात काम केलेले असते. भित्तीचित्रामुळे दोन गोष्टी होतात एक तर वास्तुरचनेतील उणीवा किंवा दोष दुर करून आकर्षक करता येतात आणि दुसरी गोष्ट म्हणजे भिंतीचे उन वारा पाऊस यापासून संरक्षण ही होते. भिंतीच्या रंगात काही काळानंतर बदलही करता येतो.





पांढऱ्या रंगातील भित्तीचित्र



**विविध रंग छटा असलेली भित्तीचित्रे**



# खिडकी

आठशे खिडक्या नऊशे दार म्हणीप्रमाणे वाड्याला खिडक्या, दरवाजे असतात. खिडकीला झरोके असेही म्हणतात. आज बघतो तशा खिडक्या पूर्वी वाड्याला नव्हत्या. दरवाज्याएवढी एकएक खिडकी असायची. खिडकीची रुंदी कमी आणि उंची जास्त असायची. खिडक्या दोन झडपाच्या असत, ते उघड बंद करता येत असे. त्यामधून बाहेरील दृश्य पाहता येते, बाहेरील व्यक्तीस आतले दृश्य दिसणार नाही, परंतु आतल्या माणसास मात्र बाहेरील दृश्य स्पष्ट दिसते हेत्याचे वैशिट्य.

वरच्या बाजूला सुर्यप्रकाशासाठी साधारणता एक फुट बाय एक फुटाची रंगीबेरंगी काचा लावलेल्या असत. त्यातून उजेड आत येतो. अशा काचांना टोमॅटो काचा म्हणतात. त्यामध्ये बाजरी नक्षीचे डिझाईन असते. खिडक्याच्या दोन्ही बाजूने वेलबुट्टीचे आकर्षक नक्षीकाम केलेले असते. दोन खिडक्या दरम्यान उभे व आडवे लाकडी स्तंभ व त्यावर नक्षीकाम ते स्तंभशीर्ष ही सुंदर बनविले जातात. अशा खिडक्यांना कलेचा आधार देऊन त्यांना वैशिष्ट्यपूर्ण बनवत. त्यामुळे इमारतीचा भाग लक्ष वेधून घेतो.

खिडकीच्या खालच्या बाजूला सुरक्षेसाठी कठडा आणि वरच्या बाजूला महिरप/कमानी असतात. कमानीच्या खालच्या बाजूला द्राक्षाचा घड अथवा केळ फुलाचे सुंदर नक्षी असते. पोपट द्राक्षाच्या घडावर बसून द्राक्ष खात आहे. द्राक्ष व पोपट हे सुबत्तेचे प्रतीक आहेत. अशा खिडक्यांच्या झडपा बसवण्यासाठी हिंजेसचा वापर केलेला असतो. तसेच खिडकी बंद करण्यासाठी कडी कोयंडे असतात. कडीवर नागफनीची नक्षी असते. त्यामुळे कडी काढणे सोपे होते. खिडकीला चिकाचे पडदे लावतात. त्यामुळे डायरेक्ट सूर्यप्रकाश, हवा आत येत नाही.

आठशे खिडक्या नऊशे दारं म्हणीप्रमाणे चुकून एखादी खिडकी अथवा दरवाजा बंद करायचे राहून गेले तर ती खिडकी किंवा दरवाजा सहजासहजी उघडत नाही.


**असे दरवाजे, खिडक्यांचे वैशिठ्य म्हणजे दोन्ही दारे बंद करताच त्याच्या खाचा एकमेकात चपखल बसतात आणि किती जोर लावून दरवाजा उघडण्याचा प्रयत्न केला तर त्या उघडत नाहीत. उलट दरवाजा घट्टच बसतो. अशी दारे उघडायची झाल्यास एक पुढे व दुसरे मागे उघडावे लागते. मगच ते उघडली जातात.**



लाकडी खिडकी व त्याचे (वायूवीजन)



लाकडी खिडकी व
त्याचे (वायूवीजन)



# प्रकाश आणि हवा खेळती राहण्यासाठीची काचेची व दगडी खिडकी (वायूवीजन)



# दिवा

दिव्यांना भारतीय संस्कृतीत खूप महत्वं असल्यामुळे अनेक मंगल कार्याच्या वेळी त्यांची पूजाही केली जाते. घराचा प्रत्येक कोपरा प्रकाशमान होऊन दारीद्ररूपी, अज्ञानरूपी अंधार दूर होऊन घरात सुखसमृद्धी नांदावी अशी या पाठीमागे भावना असते. दगडाच्या खोलगट केलेल्या भागात प्राण्यांची चरबी, वनस्पती, किंवा बियांपासून तेल मिळवून त्यापासून दिवा पेटवण्याची कला अवगत केली होती. दगडाबरोबरच चांदी, पितळ, तांबे, कासे या धातूंचे दिवे असायचे. पणती या नावाने आजही घराघरात तुळशी वृंदावनासमोर दिवा लावला जातो. नंतर मात्र तूप, तेल, गॅस, वायू, इंधन यांचा शोध लागला.

**दिव्याचे काही प्रकार :-** निरंजन, समई, ओवाळण्याचा दिवा, पंचारती, लामन दिव्याचही महत्व होत. लामन दिवा समई सारखाच पण काहीसा बसका असतो. टांगण्यासाठी त्याला साखळी असते. देवांच्या मूर्तीसमोर लामन दिवा टांगलेला असायचा. पूर्वीच्या काळी नंदादिपाचा वापर देवळामध्ये मोठ्या प्रमाणावर होत असे.

**अखंड तेवत राहतो त्याला नंदादीप अस म्हटलं जातं**.

प्राचीन काळी दगड कोरून दिवा तयार केला जायचा त्यानंतर काही भागात मातीपासून तयार केलेले दिवे वापरले जावू लागले. गणेशदीप, दीपवृक्ष, अर्चनादीप, कुबेरदीप, कामाक्षीदीप, दीपलक्ष्मी,दिपवृक्ष असे कितीतरी दिव्यांचे प्रकार होते. लामनदिव्यातही वैष्णवदीप, मायुरदीप, शंखदीप, हस्तीदीप, कमानदीप, असे विविध कलात्मक प्रकार आढळतात.










# कमानी

एखाद्या वाड्यात, गढीत, किल्यात, मंदिरात प्रवेश केला की आपणास कमानीच कमानी दिसतात. मग त्यामध्ये लाकडी कमानी, गिलाव्यामधील कमानी, ओबडधोबड आकाराच्या दगडी कमानी, घडीव दगडातील कमानी, विट बांधकामातील कमानी, नदीवरील, प्रवेशव्दारावरील, रेल्वे मार्गावरील, खिडक्यावरील कमानी, अशा विविध कमानी आपणास पहावयास मिळतात. त्याच्या आकारमानानुसार नक्षीकाम लहान-मोठे केले जात असे. त्याचे प्रकारही बरेच आहेत.

रामायण महाभारतापासून आपल्याकडे मंदिरे, किल्ले, गढ्या, वाडे, इंद्रप्रस्थ, द्वारका या नगरीला तर चारही बाजूने तटबंदी होती. दगड व त्यावरील कलाकुसर ह्यांचा वापर तेवढाच जुना आहे. दगडी बांधकामे करताना त्याच गुरुत्वमध्य राखणे हे त्या हजारो वर्षांच्या शिल्पशास्त्रातील विकासाचा गाभा आहे. कळीचा दगड हा सर्वात महत्वाचा दगड आहे. कळीच्या दगडामुळे कमान स्थिर राहते.

**दगडी कमानीच्या वरच्या बाजूला मध्यभागी निमुळता पाचर घालून घट्ट बसवलेला दगडाचा तुकडा**

कळीचा दगड



म्हणजे की स्टोन, कळीचा दगड बसवलेला असतो. तो अशा पद्धतीने बसवलेला असतो की कमानीच्या वरील बांधकामाचा संपूर्ण भार त्यावर असतो. कळीचा दगड निघाला की आजूबाजूचे बाकी दगड गळून पडतील व वरचे पूर्ण बांधकाम खाली येते. त्या कळीच्या दगडावरती ती कमान अवलंबून असते. तासलेले दगड विशिष्ठ रित्या गुंफून एकातएक अडकवले जातात. त्या सर्वांची मदार ही कळीच्या दगडावर असते. अशा कमानीसाठी वापरलेले दगड हे कुठल्याही सिमेंटकाँक्रीट किंवा रसायनाच्या सहाय्याने एकमेकावर बसवलेले नसून सर्व दगड फक्त इंटरलॉकिंग पद्धतीने एकमेकात गुंफून पेपरलेस ज्वाइंट केलेले असतात. अशा पद्धतीच्या कमानी वादळवारे, धरणीकंप, पूर, नैसर्गिक झीज हया सगळ्याला तोंड देत भक्कमपणे आजही उभ्या आहेत.




दगडी कमानी



**लाकडी कमानी** हया दगडी तळखड्यावर किंवा लाकडी तळखड्यावर उभ्या असून तळखड्यला पानंफुलांची सुंदर नक्षी असते. सुरुदार लाकडी खांबावर वेगवेगळया नक्षी, महिरपीवर केळफुलांचे सुंदर नक्षी कोरलेल्या असतात, द्राक्षाच्या घडावर पोपट बसून द्राक्ष खात आहे. द्राक्ष व पोपट हे सुबत्तेचे प्रतिक आहेत. कमानीवर देखील सुंदर वेलबुट्टीचे नक्षी असतात. अशा कमानी आपल्या हिंदू धर्मामध्ये जसे आपण देवापुढे हात जोडतो त्या जोडलेल्या हाताच्या आकाराचे होते तशा या कमानी असतात. कोरीव कामामध्ये कुठेही जोड (ज्वाइंट) देण्यासाठी खिळा किंवा तत्सम वस्तू देखील वापरलेली नाही. हे या लाकडी कोरीव कामाचे विशीष्ट म्हणता येईल. वाड्याच्या आतील भिंतीवरील कमानी या भारवाही नसून तुळईच्या खाली दोन खांबामध्ये सुशोभिकरणासाठी वापरल्या जात असत.



लाकडी कमान


लाकडातील खाचा
(जॉइंट)


लाकडावरील कलाकुसर

# पुलावरील कमानी


देशात पन्नास वर्षाच्या आत बांधलेले अनेक पुल पडल्याच्या बातम्या आपण वाचतो. मात्र जावळीच्या खोऱ्यात एक पूल स्थापत्य कलेतील जाण आणि अफलातून तंत्रज्ञान याची साक्ष देत गेल्या चारशे वर्षापेक्षा अधिकच्या इतिहासाची साक्ष देत भूकंप, ऊन, वारा, पाऊस झेलतोच आहे. अफाट वेगाने येणाऱ्या कोयनेचं पाणी अगदी सहजपणे पास करत आजही रोज शेकडो गाड्या पेलतो आहे. हे बांधकाम म्हणजे नव्या युगातील इंजिनीअर्सनाही बोध देणारं आहे.

भारतात सर्वाधिक पाऊस पडणाऱ्या भागापैकी एक असलेलं जावळीचं खोरं. याच पर्वतरागांमध्ये मुसळधार पावसामुळे कोयनेच्या उगमस्थानाच्या नदीला कायम महापूर येतो. त्यामुळे पावसाळ्यात प्रतापगडाच्या पायथ्याला येताना कोयना नदी ओसंडून वाहत असायची. या भागातून प्रवास करणं जिकीरीचं असल्यामुळे पार या गावाजवळ पूल उभारला. बावन मीटर लांब, पंधरा मीटर उंच आणि आठ मीटर रुंदीचा हा पूल अवघ्या काही महिन्यांत उभारला.

ज्यांनीज्यांनी सिंधुदुर्ग किल्याच्या बांधकामातील बारकावे पाहिले-अभ्यासले आहेत. त्यात समुद्राच्या पाण्याच्या प्रपाताचा परिणाम होऊ नये म्हणून मुख्य द्वाराची रचना जशी केली त्याचा

छोटा प्रयोग म्हणजे हा पुल आहे. या पुलाला पाच दगडी खांब आणि चार कमानी आहेत. या पुलाचा प्रत्येक दगड काटकोनात घडवलेला आहे, प्रत्येक दगड सारख्या मापात आहेत. ज्या बाजूने पाणी या पुलाखाली जाते, त्या प्रत्येक खांबाला धारदार कुऱ्हाडीसारख्या दगडी भिंती. माझ्या पाहण्यात आज पर्यंत असा पुल मिळाला नाही. या पुला खालून प्रचंड पुराचं पाणी आलं आणि वरच्या जंगलातली झाडं यात वाहून आली तर त्याचं लाकुड या पुलावर आदळलं तरी त्याचे दोन भाग व्हावेत अशी ही पुलाच्या मागची एक कल्पना आहे आणि दुसरं पाण्याचा कोणताच दबाव त्रिकोणी असल्यामुळे या पुलावर पडत नाही.

पाणी जाण्यासाठी बनवलेली कमानही मंदिराच्या गाभाऱ्यासारखी आहे. कोरीव काम केलेल्या या पुलाला चारशे वर्षापेक्षाही अधिक काळ झाला आहे. चारशे वर्षापेक्षाही बांधलेल्या पुलाचा अभ्यास व्हायला हवा. हा पुल मात्र मागच्या चाळीस पन्नास वर्षात बांधलेला आहे कि काय असे वाटते.



## खण

दोन खांबांमधील अंतर म्हणजे खण. खणाची संख्या कायम विषम असते. उदाहरणार्थ पाच खणी, सात खणी. जेथे खणाची रचना चौकोनी असते त्यास चाफेखण म्हणतात. मध्यभागी असलेल्या खणातून जाण्यायेण्याचा मार्ग असतो. दगड, विटा, चुना माती, लाकूड ही वाड्याच्या बांधकामात वापरली जाणारी मुख्य सामग्री, वाड्याच्या बाहेरील भिंती जाड असत, त्यामुळे वाडा आतून गार राहत असे. लाकडी खांब आणि तुळया वाड्याचा भार पेलत असत. भिंतीमध्ये जागोजागी कोनाडे, फडताळे, खुंट्या असायच्या. मुदपाक खाण्यातून धूर बाहेर जाण्यासाठी विशेष प्रायोजन केलेले असायचे. वाड्याच्या आतील भिंतीना चुनाचा गिलावा केलेला असायचा. अनेक वेळा त्यात रंग घालून त्याला सुशोभित केले जायचे. खांब आणि तुला वजन पेलत असले तरी जाड भिंती त्यांना भक्कम आधार देण्याच काम करत असत.

# माळवद

माळवद या शब्दाचा अर्थ घराचे छप्पर. घरातील वातावरण नियंत्रीत ठेवण्याची पारंपरिक पद्धत म्हणजे माळवद. पूर्वीच्या काळी घराच्या छतासाठी मोठमोठे लाकडी ओंडके टाकले जात असत. लाकडाचे ओंडके म्हणजे तुळया. त्यावर लाकडाच्या पट्ट्या लावल्या जात. त्या पट्यावर पळसाची पाने टाकून त्यावर पांढरी माती टाकून, पाणी मारून चोप दिला जाई. माळवद तयार करण्यामागे घरातील वातावरण नियंत्रीत राहावे हा उद्देश असे. माती आणि लाकूड दोन्ही घटक उष्णता रोधक असल्याकारणाने उष्णतेस अटकाव होई आणि माळवद असलेल्या घरातील वातावरण नियंत्रीत राही. त्यामुळे माळवदाखालील घरामध्ये वातावरण उन्हाळ्यात थंडगार तर हिवाळ्यात उबदार राहत असे.

पांढरी माती पाणी धरून ठेवत नसल्यामुळे पावसाळ्यात माळवदातून पाणी खाली झिरपत नसे. माळवदावर साठलेले पाणी निघून जाण्याकरता पन्हाळी लावलेली असे. त्यास पाणीपट्टी म्हणतं असत. वरचा पृष्ठभाग गुळगुळीत करण्यासाठी व पाणी मध्ये सोकले जाऊ नये लिकेज होऊ नये म्हणून पांढऱ्या मातीमध्ये वरच्या थरात गुळ, काकवी, चुना, डिंक, अशा मिश्रणाचा वापर

करून घोटाई करत असत. व त्या घोटाईवर जवसाचे पाणी मारले जाई. **सध्याच्या काळात थंडाव्यासाठी फ्रीज आणि उबदार वातावरणासाठी हिटरचा वापर केला जातो. मात्र आपल्या पूर्वजांनी पारंपरिक ज्ञानातून विकसित केलेली माळवदासारखी उपयुक्त पद्धत बदलत्या जीवनशैलीच्या प्रवाहात लुप्त होण्याच्या मार्गावर आहे.**

## दालन

दालन सुशोभित करण्यासाठी उत्कृष्ट लाकडाचे सुरुदार खांब व दोन खांबाच्या मध्ये लाकडी नक्षीदार कमानी. तक्त पोशिला नक्षीदार छत किंवा कडीपाटाचे छत व बाजूने वेलबुट्टी. लाकडामधील कोरीव काम असल्याने एक प्रकारची भव्यता वास्तूला प्राप्त होते. कारागिरीची सुबकता नजरेत भरते. कोरीव कामामध्ये कुठेही जोड (ज्वाइंट) देण्यासाठी खिळा किंवा तत्सम वस्तू देखील वापरलेली नाही. हे या लाकडी कोरिं कामाचे विशीष्ट म्हणता येईल. बेल तेल/ बिब्याचे तेल लावून हे लाकडी काम चकचकीत करण्यात येत असे. खिडक्याना रंगीत काचा, चिकाचे पडदे, भित्तीचित्रे, कलात्मक कोनाडे, हंड्या झुंबरे, लामणदिवे, जमिनीवर गालिचे, जाजम, मखमली कापड, आरसे, भारतीय बैठक व्यावस्थेसाठी चार ते पांच इंचाची गादी त्यावर पांढरेशुभ्र बेडशिट, सोन्याच्या जरीचे भरतकाम असलेल्या गर्द रंगाचे अभ्रे घातलेल्या उशा, लोड गादीवर ठेवलेल्या असत. पडदे, पेंटिंग्ज, पोस्टर्स, पशुपक्षांचे मुखवटे, वाघ/सिंहाची कातडी, जुनी मौलिक शस्त्रे, तैलचित्रे, पाहुण्यांनी दिलेल्या भेटवस्तू कलात्मक रीतीने मांडून ठेवलेल्या असत.

दर्शनीभागाच्या सुशोभनात उठावदार वेलबुट्या, प्लॅस्टर किंवा दगड यांवर कोरून त्यावर सोन्याच्या वर्खाचे काम केलेले असते. अशा दालनामध्ये साधारण पंचवीस लोकांपासून ते दोनशे लोकांना बसण्याची व्यावस्था असते. दालनामध्ये आवाज घुमू नये म्हणून कमानीला चिकाचे पडदे लावलेले असतात. दालनामधील सर्व दिवे लावले की रोषणाईने दालन उजळून निघते की बघणाऱ्यांच्या डोळ्यांचं अक्षरशः पारणं फिटते. वायू विजनासाठी खिडक्या असतात. दरवाज्यावरती गणेशपट्टी असते. सुशोभनासाठी सागवानी लाकडाच्या नक्षीदार कमानी असतात.



## पलंग

पलंगाचा उपयोग झोपण्यासाठी व विश्रांती घेण्यासाठी होतो. पाचीन काळापासून पलंगाचा वापर झोपण्याचे साधन म्हणून प्रतिष्ठीत वर्गातील लोकं करत असत. असे पलंग हलके व शोभिवंत असत. पलंगाला सुशोभित करण्यासाठी लाकडावर नक्षीकाम व खोदकाम करत असत. पक्षांची चित्रे किंवा इतर रंगाने सजविले जात असत. हस्तिदंताचा देखील वापर सुशोभित करण्यासाठी केला जात असे. पडदा किंवा मच्छरदाणी अडकविण्यासाठी त्यावर छत केलेले असे.

**पूर्वीच्या पलंगाला दोरी ओढल्यावर चालणारे पंख्याची सोय असे. असे राजे महाराजांचे पलंग होते. त्याच्या चारी पायाच्या खाली पसरट दगडाची उखळी करून त्यात पाणी भरून ठेवत असत त्यामुळे त्या पाण्यातून किडा, मुंगी, झुरळ, पाल बेडवर येत नसत. ही त्याकाळातील दुरदृष्टी होती.**

आधुनिक काळात पलंग तयार करण्यासाठी विविध सामग्री वापरतात यात प्रामुख्याने लाकूड, धातू, पक्षांची पिसे, कापूस, लोकर, सुती कापड, रबरी स्पंज, फोम रबर, इत्यादीचा वापर होऊ लागला.



पलंगाचे लाकडी कोरीवकाम

पलंगाच्या पाया खाली दगडी उखळ





# हंड्या व झुंबर

घरांच्या वा सभामंडपांच्या अंतर्गत सजावटीसाठी तसेच प्रकाशासाठी वापरण्यात येणारी अर्धगोल तळ आणि वरून उघडा भाग असलेल्या काचेच्या पात्राला हंडी असे म्हणतात. विशिष्ट व्यास असलेल्या काचेच्या भांड्यात पणती वा दिवा ठेवला की हंडी तयार होते. ही हंडी छताला टांगली जाते. राजेरजवाड्यांच्या मोठमोठ्या दिवाणखान्यांत अशा हंड्या रूढ होत्या. देवळांच्या सभामंडपांतही हंड्यांचा वापर करीत असत. घराच्या दिवाणखान्यात, सभामंडपात प्रकाशासाठी आणि त्या जागेला शोभा आणण्यासाठी झुंबराचा वापर करतात. हंड्यांमुळे दिव्यांचा वाऱ्यापासून बचाव होत असे.

***झुंबर*** हा गृहशोभनातील एक प्रकार. वैभवाचे श्रीमंतीचे व थाटामाटाचे प्रतीक आहे. पूर्वीच्या काळी झुंबर लाकडापासून बनवत असत. या झुंबराच्या हंड्यांमध्ये प्राण्यांच्या चरबीपासून बनविलेल्या तेलाचा प्रकाशासाठी वापर केला जात असे. छतावर मध्यभागी झुंबरे लावून शोभा वाढविण्याची पद्धत रूढ झाली. काचेत लीड ऑक्साइड मिसळले असता त्यापासून तयार होणारी काच प्रकाशाचे उच्च परावर्तन करते हे आढळले. तेव्हापासून झुंबरे

बनविण्यासाठी या काचेचा वापर होऊ लागला. पाने, फुले, फळे यांशिवाय निसर्गातील विविध प्रतिकृतींचा वापर झुंबरातील अंतर्गत भागांच्या निर्मितीत केला जातो.





लाकडी झुंबर

हंड्या



## दप्तरखाना (स्टोअर रूम)

दप्तरखाना म्हणजे दप्तरे ठेवण्याची जागा. हिशोबाच्या, कारभाराच्या वहया, कागदपत्रे ज्या ठिकाणी ठेवलेले असतात त्या ठिकाणास दप्तरखाना म्हणतात. पूर्वीच्या काळी जुनी पण उपयुक्त कागदपत्रे ठेवण्यासाठी सरकारी व खाजगी दप्तरखाणे होते. सर्व माहिती एकत्र मिळावी हा मुख्य हेतू त्या काळी होता. इतिहासाच्या आद्य तत्वांपैकी एक म्हणजे (No decument, no history) कागदपत्रे नाहीत म्हणजे इतिहासही नाही.

अगदी अव्वल दर्जाची कागदपत्रे म्हणजे त्या कारभारातील दैनंदिन तयार होणारी सामग्री. जुने कागद टिकावे म्हणून त्याची निगा राखावी लागते. कागदपत्राचे संरक्षण आणि दुरुस्ती. त्यासाठी लागणारी जागा ते हाताळायचे कसे याचे तंत्र जर माहीत नसेल तर अल्प काळात ते निरुपयोगी ठरेल. दप्तरे कपाटात कसे ठेवायचे. त्याचे रुमाल कसे ठेवायचे. धूळ, कीटक. उंदीर या पासून त्याचे संरक्षण कसे करायचे. निरनिराळया हवामानात त्याची निगा कशी राखावी. आगीपासून, पावसा पाण्यापासून त्यांचा बचाव कसा करावा. कागदपत्रे फाटली असता त्याची दुरुस्ती कशी करावी. आग लागली तर ती विझवण्यासाठी बांधलेल्या पाण्याच्या टाक्या सतत भरलेल्या राहतील याची काळजी घेत असत.

## विचारविनिमय कक्ष (खलबत खाना)

पूर्वीच्या काळी गुप्त वाटाघाटी चर्चा करण्याची संरक्षित जागा. महत्वाच्या मोहिमेचा, नियोजनाचा आढावा घेण्यासाठी असलेली जागा. खलबते करणे म्हणजे नुसत्या चर्चा करणे नव्हे. त्यासाठी समोरच्या व्यक्तीच्या चेहऱ्यावरील हावभाव, नजरेत भरणारे बदल, देहबोली याचेही निरीक्षण करणे गरजेचे असते. कधी मोठ्या आवाजात सूचना द्यायच्या, कधी रागाने बोलणार, तर कधी कौतुक करणार, या कामाचे काय झाले, ते काम का झाले नाही, लगेच संबंधिताला बोलावणे पाठवायचे.

सगळे निर्णय वाडयामधील विचारविनिमय कक्षामधून झालेले असतात. कामकाजा संदर्भात बैठका असतील तर त्यात कुठले विषय घ्यायचे, कशाला मंजुरी द्यायची, कशाला नाकारायची इतक्या बारीक सारीक गोष्टी अशा खलबत खाण्यातच ठरतात. आणि त्याची अंमलबजावणी ही अशा खलबत खाण्यातच होत असते.

## छताची कौलं

ज्या भागात पाऊस जास्त पडतो. अशा ठिकाणी उतरती कौले असलेले वाडे बघायला मिळतात. ज्या भागात पावसाचे प्रमाण कमी आहे त्या ठिकाणी सपाट छप्पर असलेले बघायला मिळते. कौलाचे दोन प्रकार आहेत. खापरेली कौलं किंवा नळयाची कौलं. त्याचा रंग ही गेरूच्या रंगासारखाच असतो.

जवळपासच्या भागात मुबलक प्रमाणात मिळणारी पिवळी माती कुटून, चाळून घेतात व त्यामध्ये काही प्रमाणात दुसऱ्या जातीची माती, लीद, राख व बारीक वाळू मिसळून मिश्रण तयार करतात. या मिश्रणात पाणी घालून त्याचा घट्ट चिखल करतात. व तो पायाने तुडवतात. चांगला एकजीव झाल्यावर नंतर काही दिवस मुरू देतात. मुरलेल्या व साधारण घट्ट झालेल्या ओलसर मातीचे लहान आकाराचे गोळे करतात. हे गोळे कुंभाराच्या फिरत्या चाकावर ओलसर मातीचा गोळा ठेऊन त्याला पाणी लावून दोन्ही हातांनी हळूहळू दाबत जाऊन त्यापासून निमुळत्या आकाराची उभट नळी तयार करतात. व त्याला काठ ही तयार करतात. ही नळी चाकावरून कापून बाहेर काढतात. अशी नळी उभी मधोमध चिरली म्हणजे तीपासून दोन कच्ची कौले मिळतात. ती सावलीत

वाळवतात. नंतर भट्टीमध्ये रचून भाजतात म्हणजे कौले कठीण होतात. व वेगवेगळ्या मातीमुळे त्यावर लालसर रंग चढतो. कौले एकसारखी होण्यासाठी लाकडी ढाचा बनवतात. त्यामुळे कौले एकसारखी व सफाईदार होतात.

नळयाच्या कौलाची लांबी साधारणतः बारा ते पंधरा इंच अर्धगोलाकार आणि निमुळती असतात. खालच्या बाजूला चारपाच इंच तर वरच्या बाजूला दोनतिन इंच रुंद असतात. अशी कौलं कुंभाराच्या भट्टीतून भाजली जातात. जिथे कौलं लावायची आहेत त्याठिकाणी आगोदर लाकडाच्या पट्याचे फ्रेमिंग करतात. त्याला कैची म्हणतात. कैचीसाठी लाकूड जाडजूड ताशीव वापरत असत. त्याला डांबर अथवा बिब्ब्याचे तेल पाजले जाई. नंतर त्यावर उलट सुलट कौलं अंथरली जातात. फार उतार असलेल्या छपरावरील कौले घसरू नयेत म्हणून आधारासाठी तांब्याचे अथवा लोखंडी खिळे छपराच्या खालील लाकडात ठोकीत असत.

जोरदार पडणाऱ्या पावसासाठी उताराचे कौलारू घर पाण्याचा पटकन निचरा करते. स्वयंपाक घरात जिथे उजेड हवा असतो तेथे एखादे काचेचे कौलं छताला लावले जाते. भर दुपारी काचेच्या कौलातून येणारा कवडसा व त्यात तरंगणारे धुलीकण

मनमोहक दिसतात. प्रत्येक वर्षी पावसाळ्या आगोदर फुटलेली कौलं बदलावी लागतात. तसेच वाड्याच्या दर्शनी बाजूला विटांच्या जाणीवपूर्वक केलेल्या रचनेतून साध्या भिंतींनाही सौंदर्य प्राप्त होत असे. पूर्वी खापरेली कौले का वापरत असत म्हणून माहिती गोळा करण्याचा प्रयत्न केला असता तो खालीलप्रमाणे.

कुठल्याही प्राचीन स्थळाच्या उत्खननात खापरी कौल विपुल प्रमाणात सापडतात. धातूचे अगर इतर प्रकारचे अवशेष गंजून जातात आणि नाशही पावतात आणि पुराव्याच्या दृष्टीने कुचकामी ठरतात. पण मातीची भाजून तयार केलेली खापरी कौलं मात्र हजारो वर्षे जशीच्या तशी राहतात. शिवाय त्यावरील नक्षीकाम किंवा रंगकामसुद्धा खराब न होता जसेच्या तसे राहते. यामुळे पुराव्याच्या दृष्टीने पुरातत्त्व विभागात खापरी कौलांच महत्वं लक्षात येते. खापरी कौलांच्या अभ्यासावरून अनेक गोष्टी समजून घेता येतात. तुकडा फोडून पाहिल्यास त्याच्या गाभ्यावरून खापराचे पोत समजतो. तसेच ते खापर ज्या प्रकारच्या मातीपासून तयार केले असेल ती माती कोणत्या प्रकारची होती हे समजून घेता येते.

खापरी कौल तयार करण्यासाठी योग्य ती माती त्या ठिकाणच्या परिसरात उपलब्ध नसेल तर ती कोठून आणली गेली हे आपल्यास भूगर्भ शास्त्रज्ञाच्या मदतीने जाणून घेता येते. माती जर चांगली चिकण असेल तर ती मेणासारखी मऊ आणि एकजीव होण्यासाठी त्यात शेण, राख, लीद, गवताच्या काड्या, धान्याचा भुस्सा मिसळणे भाग पडते. भुश्याच्या आणि धान्याच्या अवशेषावरून तत्कालीन शेतकरी कोणत्या पिकांची लागवड करीत होता याची कल्पना येते आणि त्यावरून तत्कालीन हवामानाचाही अंदाज बांधता येतो.

खापरांवर रंगीत किंवा कोरीव नक्षीकाम केलेले आढळते. त्यावरून तत्कालीन लोकांची कलाप्रियता दिसून येते. सर्वसाधारणपणे भांड्यांवर भूमितीजन्य नक्षी असते. त्याशिवाय प्राण्यांची चित्रेही काढलेली असतात. महाराष्ट्रातील ताम्रपाषाण युगीन खापरांवर हरिण, चित्ता, काळवीट, घोडा इत्यादी प्राण्यांची चित्रे आढळतात. एका खापरावर केळीच्या पानाचे चित्र रंगविलेले आहे. त्यावरून सिंधू संस्कृतीचे लोक केळयांची लागवड करीत होते यात शंका नाही. एक बैलगाडीचे चित्र कोरलेले होते. त्यावरून महाराष्ट्रातील ताम्रपाषाणयुगीन शेतकरी बैलगाडी वापरीत होते हे समजते. भौगोलिक परिस्थितीचा अंदाज बांधता आल्यावर

परिस्थितीनुसार मानवी संस्कृतीचा विकास कसा होता त्याचे प्रत्यंतर अवशेषांतून पाहावयास मिळते.



## कारागीरांविषयी

*जिंदगी जीना आसान नहीं होता I*

*बिना संघर्ष कोई महान नहीं होता I*

*जब तक ना पडे हथोडी की चोट I*

*तब तक पत्थर भी... **भगवान नही होता II***

दगड बांधकामा विषयी सांगावयाचे झाल्यास त्याची अत्यंत सोपी व्याख्या. बलदंड शत्रूचे आक्रमण रोखण्यासाठी उभारलेला अडथळा. शत्रूचा हल्ला परतवण्यासाठी संरक्षण व्यवस्था जिच्या सहाय्याने प्रति हल्लाही चढवता येतो. आपली कमीतकमी हानी टाळता येते. दगड बांधकामात बसवण्या अगोदर दगड घडवण्यासाठी वेगवेगळ्या हातोड्या व छन्या असतात. त्यामुळे दगडाला पाहिजे तसा आकार देता येतो. दगडाचे काम करत असताना दगडावर हत्याराने जोरात फटका मारण्याचा प्रयत्न केला तर दगडात सुक्ष्म चिरा जातात. आणि दगडाचं आयुष्य कमी होते. त्यामुळे कलाकुसरीची कामे हळुहळु करावी लागतात. कारागीर दगडात आकार निर्माण करत असतो. त्यामध्ये विषय, संवेदना, भाव, आणि कल्पना घटकही निर्माण करत असतो. छन्नी आणि हातोडा दगड घडवण्याची साधनं. छन्नी जोपर्यत दगडावर आपटत नाही, तोपर्यंत दगडात काहींच घडत नाही. कोरलेल्या

दगडाकडे बारकाईने पाहिल तर छन्नी दगडावर अशी आपटली यांच्या खुणा दिसतात.

जुन्या पिढीतील बांधकामे जर आपण बघत गेलो तर या बांधकामाची इतकी प्रमाणबद्दता कशी असेल म्हणून विचारात पडतो. अशी बांधकामे करताना त्या काळात नकाशे कसे बनवत असतील. बनवलेले नकाशे ते कारागिरांना कसे समजावून सांगत असतील. बांधकामासाठी उत्तमात उत्तम दगडाची निवड कशी करायचे. शिल्पकला कोरण्याची कला हे लोक कोठे शिकले असतील. पुढच्या पिढीला त्यांनी ही कला कशी शिकवली असेल.

बांधकाम करताना मोठमोठे दगड कसे फोडले असतील. दगड वाहून बांधकामाच्या ठिकाणी कसे आणत असतील. या काम करणाऱ्या लोकांची राहण्याची सोय, त्यांच्या खाण्यापिण्याची सोय, या लोकांना हत्यारे कोण पुरवत असेल. ती हत्यारे तयार कोण करत असेल, तयार झालेली हत्यारे कोठे मिळत असतील, तयार झालेल्या हत्यारांना धार लावण्याचे काम कोण करत असेल. कामगारांचा लहरीपणा कोण साभांळत असेल.

नेमून दिलेल्या पद्धतीमुळे कोणी कोणती कामे करायचे हेही निश्चित असणार. सर्व कारागीर कसबी व कल्पक असणार, काम पुर्ण झाल्यावर हजारो टनांचा वेस्टेज दगड राडारोडा कुठे नेऊन टाकला असेल. हे सगळे प्रश्न अनुत्तरीतच आहेत.

दगड वेगवेगळ्या कोनातून कापून, त्यांनाच खुंट्या आणि खाचा पाडून ते एकमेकांत घट्ट बसू शकतील अशी रचना करत असत. कोण होते हे कलाकार लोक. हे एवढे निष्णात बांधकामतज्ञ कसे बनले असतील. पारंपारिक पद्धतीने शेती करणारी अडाणी आणि भाला व तिरकामट्याशिवाय शस्त्र माहिती नसणारी प्रजा बांधकाम शास्त्रात एवढी प्रगत कशी होती. मग राहून राहून आपल्याला एकचं प्रश्न पडतो. हे सारे सुबक आणि अवाढव्य बांधकाम खरचं मानवाने केलेयं का.

नागरिक, कामगार, कारागीर, मूर्तीकार, निष्णात अभियंते, वास्तूरचनाकार, हत्ती, घोडे, बैल, बैलगाड्या या कामासाठी अविरतं झटतं असणार. बरं हा दगडही बांधकामच्या जवळपास ऊपलब्ध नसणार, तो आणावा लागणार दुर असलेला पर्वत फोडून. आताच्या सारखे रस्ता नसल्याने हे जड दगड वाहाणे अशक्य असणार. त्यांना जरूरीप्रमाणे कापले जायचे. एकमेकांवर घासून हे कठीण दगड सपाट केले जायचे आणि मग बांधकामात वापरले जायचे. दगडाचे असे किती तुकडे एकूण बांधकामासाठी लागले याची मोजदाद अशक्य.

अशा बांधकामासाठी ना सिमेंट, ना काँक्रीट ना लोखंड. सगळे बांधकाम दगडावर दगड रचून साकारायचे म्हणजे अतिशय

कठीण आणि जोखमीचे काम. वाड्याच्या छताला आधार द्यायला जे खांब आहेत, ते सगळे इतके काटेकोरपणे सरळ रांगेत की तसुभरही फरक नाही. एक मिलिमीटर सुद्धा मागे पुढे नाही. एकावर एक दगड चढवून भिंत बनवलेली. दोन दगडांमध्ये हवासुद्धा जाऊ नये इतके एकमेकांवर घासायचे, नंतर पुर्ण भिंत नाजूक छिन्नी-हातोड्याने एकसंध बनवायची.

नक्षीचे काम कोरताना एखाद्यावेळी हातोडा जोरात पडला, एखादी चुक झालीच तर संपूर्ण भिंतच परत रचायची. परतं सपाट करायची आणि परत पहिल्यापासून कोरायला सुरूवात करायची. असे अवाढव्य वाडा बांधायची कल्पना करणे, असंख्य अडचणींवर मात करून ती कल्पना प्रत्यक्षात आणणे हे सारेचं अफलातून असे म्हणता येईल. धन्य ती सारीचं मंडळी हे असले काही भव्यदिव्य पाहिले की हात आपोआप जोडले जातात. भारतीयांच्या तत्कालीन स्थापत्यज्ञानाचा, तंत्रज्ञानाचा अभिमान वाटतो आणि आपण किती महान संस्कृतीत जन्माला आलोयं याची जाणीव होते.

# कीर्तिमुख

**कीर्ती करूनी नाही मेले I उगाच आले आणि गेले I**

आपण अनेक ठिकाणी गड, किल्ले, गढ्या, वाडे, मंदिरे पहायला गेला असाल. तेथे असणाऱ्या प्रवेशद्वारावर राक्षस, सिंह, मेंढा यांची मुखे म्हणजेच कीर्तिमुखे पाहिली असतील. पण ती तिथे का असतात. त्यामागे कोणत्या धार्मिक कथा आहेत. यांचा आपण कधी शोध घेतला का. कीर्तिमुखाचे अवलोकन करून त्याचा यथाशक्ती अभ्यास करून भारतीय संस्कृतीला केंद्रबिंदू मानून आपल्या प्राचीन ऋषीमुनींनी, समाज धुरीणांनी विशिष्ट हेतूने गड, किल्ले, गढ्या, वाडे, मंदिरे उभारून संपूर्ण हिंदू समाजातील लोकांच्यात गेल्या हजारो वर्षांपासून सांस्कृतिक ऐक्य टिकविले आहे.

शंकराच्या वरदानाने मातलेला असुर राक्षस म्हणजे कीर्तिमुख. अनेक मंदिराच्या वाड्याच्या मुख्य दरवाजाच्या उंबरठ्यावर, किंवा वरच्या भागात, तसेच मूर्तीच्या प्रभावळीवर सिंहमुख कोरलेले दिसते. या सिंहमुखाला कीर्तिमुख म्हणतात. आक्राळ विक्राळ चेहरा. भल्या मोठ्या मिशा. तोंडातून बाहेर

डोकावणारे अणकुचीदार सुळे, असे त्यांचे स्वरूप. मुखाच्या स्वरुपात कीर्ति पावलेला म्हणजे कीर्तिमुख.

प्राचीन संस्कृतीत सिंह हे सामर्थ्याचे प्रतिक मानलेले आहे. त्यामुळे राजवाड्याच्या दारावर सिंहाच्या आकृत्या काढीत असत. तसेच सिंहासनाच्या दोन्ही बाजूला सिंहाच्या आकृत्या असत. सिंहाची आकृती असलेले कोणतेही भुवन सुरक्षित राहते अशी भावना पूर्वी प्रचलित होती. म्हणून अशा सिंहाच्या आकृतीचा किंवा सिंहमुखाच्या प्रतीकांचा वापर करीत.

कीर्तिमुखाची एक उपपत्ति सांगितली जाते. शिवाची पांच मुखे आहेत. ती पंचमहाभूतांची प्रतीके आहेत. सृष्टीच्या स्थितीरूप अवस्थेत त्यांचा समन्वय साधलेला असतो. पण कालांतराने अशी परिस्थिती येते की, त्यावेळी या पंचमहाभूतांच्या कार्यात मेळ रहात नाही. सगळीकडे अनावस्था माजते. त्यावेळी शिवाचे एक भयानक रूप प्रतीत होते. त्याच्या संबंधी दोन कथा प्रचलित आहेत.

एका कथेनुसार हा असुर म्हणजे जालंदर त्याला भस्म्या रोगाने पछाडलं होत. म्हणजे तो सारख खा-खा करीत असे. यामुळे इतर जण त्रस्त झाले होते. तसाच तो स्वताही त्रस्त होता. महादेव त्याला प्रसन्न झालेले. जालंदराणे आपली करूण कथा त्यांना

सांगितली. भगवान शंकरानी त्याला उपायही सांगितला. आजपासून देवालयाच्या प्रवेशद्वारावरच बसून रहा. लोकं आपले पाप देवाला सांगण्यासाठी येतात. ती सर्व पाप तू ग्रहण कर आणि पचव. लोकं पापकृत्य करण्याच थांबणार नाहीत. त्यामुळे तुला काही कमी पडणार नाही. म्हणून तो मंदिराच्या दरवाज्यावर दिसतो.

कीर्तिमुखासंबंधी दुसरी एक कथा सांगितली जाते. कीर्तिमुखाने अनेक वर्ष तपाचरण केले. भगवान शंकर त्याला पावले "तुझा वध कोणी करू शकणार नाही" असा वर त्यांनी कीर्तिमुखाला दिला. नेहमी प्रमाणे असुर मातला. त्यान सामान्य जणांना विनाकारण छळायला प्रारंभ केला. प्रजेने महादेवाला साकड घातलं. तेंव्हा महादेव स्वताच त्याला शासन करण्यास आले. ते आले तेंव्हा कीर्तिमुख शिवाचच ध्यान करत होता. ते बघून महादेव चकित तर झालेच. पण त्यांनी जालंदरला "काय हव ते माग" अस पुन्हा सांगितले. यावर जलदरानं शंकरांनाच प्रतिप्रश्न केला. माझ्या जवळ सर्व काही आहे. तू मला काय देणार ? तूच तुला काय हव आहे ते माग.

आता शंभू महादेव भानावर आले. त्यांना आठवल की ते जालंदरला शासन करण्यासाठी आले होते. शंकराने जालंदरला

सांगितले ‘तू स्वताला खाऊन टाक’ आज्ञा प्रमाण मानुन जालंदरान स्वताच शरीर खाऊन टाकल. उरला फक्त चेहरा, तो कसा खाणार ? यावर महादेव प्रसन्न झाले आणि जालंदराला देवालयाच्या द्वारावरच स्थान मिळाल. देवते आधी भक्ताला या चेहऱ्याच दर्शन होत. जालंदर मुखाच्या स्वरुपात आजरामर झाला. म्हणून वाड्याच्या किल्याच्या मंदिराच्या दरवाज्यावर आपणास हमखास कीर्तिमुख दिसते.



दगडी कीर्तिमुख



पितळी कीर्तिमुख

## पंगत (पाट मांडून जेवणाची पद्धत)

पूर्वी स्वयंपाक घराची पद्धत वेगळी होती. अन्नपूर्णेचा मिळालेला वरदहस्त आणि स्वयंपाक करणाऱ्यांचे ओतपोत भरलेले प्रेम. स्वयंपाकघराच्या भिंतीत कपाटे, ताकाचा खांब, चुलीजवळ खिडकी, घागरींचा कट्टा, गाडग्यांच्या उतरंडीचा कट्टा, पिंपाचा कट्टा, चुलीजवळ राख ठेवायला खड्डा, स्वयंपाक करताना चुलीतील गरम राख बाहेर काढत रहायचं अन त्या गरम राखेवर कायम दुध, भाजीचे पातेल ठेवायचे. **त्यामुळे कुठल्याही वेळेला गरमागरम स्वयंपाक मिळायचा.** चुळा भरायला पायावर पाणी घ्यायला कोपऱ्यात दगडी मोरी. स्वयंपाकघरातील ओला कचरा एका ठराविक ठिकाणी साठवला जाई. हया कचऱ्यावर केळी, अळू अशी पिके वाढवतात.

जेवणानंतर हात धुण्यासाठी हया जागेचा उपयोग करतात. आपोआपच केळी व अळूला पाणी मिळते. एका बाजूला न्हाणीघर. न्हाणीघर देखील घडीव दगडांचे. धूर कोंडू नये म्हणून छताला उजेड येण्यासाठी आणि चुलीचा धूर जाण्यासाठी **सानं** असतं. चुलीच्या जवळ बाजूलाच स्वयंपाकासाठी लागणारे लाकूडफाटयाचा ढीगही सदैव रचून ठेवलेला असे. पूर्वी मिक्सर

नसायचे तेव्हां पाटावरवंटा यांचेच राज्य स्वयंपाकघरात असायचे. पाट्यावरील रांधलेल्या जेवणास कशाचीही चव येणार नाही. लसून खोबऱ्याची चटणी, दाण्याचे कुट, शेंगदाण्याची चटणी, बनवण्यासाठी उखळ-मुसळ तसेच खलबत्ता वापरला जाई.

पूर्वीच्या वाड्यातील जेवणाच्या पंगतीत एक शान असायची. जेवतांना चित्तवृत्ती प्रफुल्लित असावी म्हणून बसायला लाकडी पाट, समोर चौरंग. चौरंगांवर तांब्यापितळेची ताटवाटी, पाटाभोवती रांगोळी, उदबत्त्यांचा घमघमाट. कोनाड्यात लावलेले दिवे, पितळी समईच्या मंदसा प्रकाशाने वातावरण उजळून टाकले जाई.

ताटात मीठ, लिंबू, दोनतिन प्रकारच्या चटण्या, लोणचं, डांगर, भरीत, वांग, पिठलं, कुरडईपापड, ज्वारीची-बाजरीची भाकरी, वरणभात, तूप, वेगवेगळया दोनतिन भाज्या, आमटी, ताक, दुध असा फक्कड बेत असे.

यजमानांनी ‘वदनी कवळ घेता ची सुरुवात केली आणि सर्व अतिथींनी त्या आवाजात आवाज मिळवला की जेवणाला सुरवात झाली हे स्वयंपाकघरात कळायचे. अशा या सगळ्या पंगती प्रपंचात एक जिव्हाळा होता. वाढणारा अन जेवणारा यांच्यात एक

संवाद असायचा. वाढणाऱ्याचे पंगतीवर लक्ष असायचे. जेवणाऱ्याला काही मागायची वेळ येत नसे. तृप्तीची ढेकर देत ‘अन्नदाता सुखी भव’ असे आशिर्वाद देत अतिथी उठत असत.

अलीकडे बुफ्फे पद्धत सुरु झाली आणि पंगतीची मजाच गेली. पूर्वी जेवणारे एका जागी बसायचे आणि वाढपी वाढत फिरायचे. आता उलट झाले आहे. वाढपी एका जागी उभे राहतात आणि खाणारी मंडळी हातात ताट सांभाळत फिरतात. जेवणाची जी मजा पाटावर मांडी घालून बसण्यात आहे ती बुफ्फेमध्ये उभे राहून जेवण्यात नक्कीच नाही एवढे मात्र खरे!

जेवण करून यजमान तक्क्यालोडांना टेकून मुखशुध्दीसाठी सजलेल्या पानदानातून अलगद सुपारी काढून अडकित्त्यात कातरून तोंडात टाकी. विडयाची पाने, चुना, कात, सुपारी, केशर, गुलकंद, लवंग, वेलदोडा, गुंजांची पाने, बडीशेप, इत्यादी पासून विडा बनवून खात असत.



पाट मांडून जेवणाची पंगत

# पाटा वरवंटा

पाटा वरवंटा जणू विठोबा रखुमाईची जोडी, काळा कुळकुळीत पाटा आणि गुळगुळीत वरवंटा. एकमेकांना पूरक. पाटा वरवंटा हे एक पूर्वीचे चटणी वाटायचे दगडी साधन होते. यात एक पंचकोनी व एक दंडगोलाकार आकाराचे दगडी भाग असत. त्यांच्या सहाय्याने चटणी वा तत्सम जेवणातील पदार्थ तयार केले जात असत.

आजही कित्येक खेडेगावांमध्ये पाटा वरवंटा वापरला जातो. छन्नी हातोड्याने दगड घडविणाऱ्या वडार समाजाचा पारंपरिक व्यवसाय. पूर्वी धान्य दळणे. मिरची मसाला कांढणे अशी सर्व कामे उखळ, पाटा, वरवंट्यावर केली जात होती. प्रत्येक घरात या वस्तू असायच्या. परंपरागत वडार समाज जंगलातून विशिष्ट दगड आणून त्यापासून जाते, वरंवटे, उखळ तयार करीत होते. छन्नी हातोड्याच्या साहाय्याने दगड घडवित होते. खलबत्ता, उखळ अशा वस्तू त्या बनवित. ही पाट्यावरवंट्याची जोडी नुसती अन्नपूर्णादेवीचीच मदत करत नसे तर घरात कोणाला दुखलंखुपलं की झाडपाल्याची औषधं ठेचून, रगडून प्रथमोपचाराचं कार्यही करत असे. वैद्यकीय दृष्टीनं म्हणालं तर घरातील बायकांना वेगळा

व्यायाम करण्याचीही गरज भासत नव्हती. त्यामुळे पंधरा मिनिटं पाटा-वरवंटा छान व्यायाम करवून घ्यायचा.

धार्मिक कार्यातही पाट्या वरवंट्याला घरच्या थोरामोठ्यांप्रमाणेच मानाचं स्थान असते. बारशाला बाळाला पाळण्यात घालण्यापूर्वी वरवंट्याला कापड गुंडाळून, चेन घालून बाळाप्रमाणं नटवूनथटवून त्याला पाळण्यात झोपवून त्याचे लाड केले जातात. कुणी गोविंद घ्या, कुणी माधव घ्या च्या पहिल्या राउंडला या वरवंट्याला बाळाप्रमाणे अलगद उचलून खालीवर करून नामकरणाच्या विधीतही समाविष्ट केलं जातं. अशी ही पाट्यावरवंट्याची जोडी.

स्वयंपाक घरात मिक्सर आल्यामुळे घरातील उखळ, पाटा-वरवंटा, खलबत्ता या वस्तूंचा वापर कमी झाला आणि हळू हळू या सर्व वस्तू अडगळीत गेल्या. शिवाय अनेक वर्ष टिकणाऱ्या असल्यामुळे एकदा विकत घेतल्या की फुटेपर्यंत पुन्हा नवीन घ्यायची गरजच पडत नाही. आजही अनेकांच्या घरातील जाते, उखळ, पाटा वरवंटा खलबत्ता हा ३० वर्ष किंवा अगदी त्या पूर्वीचा देखील असू शकेल. यामुळे अशा वस्तूंची मागणी कमी असते. पण दगडांपासून घडवलेल्या या वस्तूंनी भारतीयाची संस्कृती अनेक अर्थांनी घडवली आहे आणि संपन्नही केली आहे.









# दगडी जातं

चाकाचा शोध हा मानवाच्या पहिल्या प्रगतीचा टप्पा आहे. हल्लीचे जग हे प्रचंड वेगाने प्रगती करत आहे. ही प्रगती गेल्या काही दशकात तर इतक्या वेगाने झाली की अनेक पूर्वापार वापरण्यात आलेल्या वस्तू हा हा म्हणता नाहीशा व्हायला लागल्या. केवळ दोन पिढ्यांनी वापरलेल्या वस्तुमध्ये आता बराच फरक आहे.

धान्याच पीठ करण्यासाठी दगडी गोलाकार दोन तळ्या एकमेकांवर खुंटयाच्या सहाय्याने बसवतात, पूर्वीच्या काळी दळणासाठी घरोघरी आढळणाऱ्या दगडाच्या जात्याच्या चाकाचं आणि माणसाचं नातं हे फार पुरातन असून अतूट आहे. पिठाच्या गिरण्या सुरु होण्यापूर्वी आपल्या जीवनात जात्याला महत्वाचे स्थान होते. आजही खेड्यात पहाटेच्या प्रहरी जात्याची घरघर आवाज एकू येतो.

जात्याचा वापर जसा पीठ प्राप्त करून घेण्याकरिता झाला आहे तसेच ओवीज्ञान निर्माण करण्याकरीताही झाला आहे. या ओव्या सहजपणे रचलेल्या असतात. त्यांत अनेक भावभावनांचे

कल्लोळ व्यक्त झालेले दिसतात. एखादी जबाबदारी स्वीकारली की ती पार पाडण्यासाठी क्षमता आपोआप येते हे भाव व्यक्त करण्यासाठी जात्यावर बसल्यावर ओवी सुचते.



## ठेवणीतील ऐवज

पूर्वी स्वयंपाकघरात भिंतीलाच फळी ठोकलेली असायची त्या फळीवर तांब्या पितळेची भांडी हौशेने रचलेली असायची. तांब्या पितळेच्या भांड्यावरून घरच्या गरीबी वा श्रीमंतीचा दर्जा ठरला जायचा. आता काल बदलला असल्यामुळे तांब्या पितळेची भांडी घासणे हे वेळखाऊ काम असल्याने किचन मधून हद्दपार झालेली आहेत. घंगाळ भांडे हे तांबे किंवा पितळ या धातूचे असते. या भांड्याचा आकार खोलगट असून त्याला उचलण्यासाठी दोन बाजूला दोन कडी असतात. घंगाळाचा पूर्वीच्या काळी अंघोळीचे पाणी ठेवण्यासाठी केला जात असे. शहरी भागात शोभेची वास्तू म्हणून देखील याचा वापर केला जातो. घंगाळात पाणी भरून त्यात फुले टाकून तरंगणाऱ्या पणत्या रात्री लावत असत.

लग्न घटिकेसमयी आजही घंगाळ लागते. विवाह मुहूर्त जवळ येईपर्यंत वधूला त्या घंगाळासमोर बसून रहावे लागते. घंगाळात पाणी भरून त्यात फुले ठेऊन तरंगणाऱ्या पणत्या रात्री त्यात लावल्या जात असत. वाड्यातील चौकात आपणास पाण्याने भरून ठेवलेले घंगाळ दिसते.

# जुनी बांधकाम पद्धती वापरा, पर्यावरण वाचवा.

जे बालपण आपण उपभोगले ते आपल्या मुलांना उपभोगता येत नाही. म्हणजे आपण बोरचे, विहिरीचे पाणी पिऊ शकत नाहीत. त्याचं कारण आपण एवढे पाणी दुषित केले आहे की ते प्यायला नको वाटते. रस्त्यावर मुक्तपणे खेळ खेळू शकत नाही. घरात चिमण्या येत नाहीत.

**पूर्वीच्या बांधकाम पद्धतीमध्ये वेगवेगळ्या प्रदेशातील वेगवेगळी घरे होती. हिमालयातली घरे वेगळी होती, काश्मीरची घरे वेगळी, कोकण, विदर्भ, मराठवाडा, साउथकडील घरे वेगळी. हे सगळे बाजूला सारून आपण काँक्रीटची एकसारखी घरे बांधायला लागलो आहोत.**

पक्षी प्रत्येक वर्षी नवे घर बांधतो, आपण मात्र आपले आयुष्य खर्ची घालतो घर बांधण्यासाठी. आज सिमेंट काँक्रीटच्या बांधकामाला मागणी आहे म्हणून तशा पद्धतीची घरे बांधली जात आहेत. **शहरात सिमेंट काँक्रीटची घरे बांधणे आवश्यक आहे. पण खेड्यात का सिमेंट काँक्रीटची घरे बांधायची. सिमेंट काँक्रीट म्हणजेच भक्कम घर म्हणता येईल का.**

मग हजारो वर्षापूर्वी आपल्या पूर्वजांनी तर्कशुद्ध पद्धतीने बांधलेली घरे, वाडे, गढ्या आजही सुस्थितीत कशा आहेत त्याचे काय. म्हणून खेड्यात बनवायची घरे त्यासाठी लागणारे मटेरियलही तसेच बनविले गेले पाहिजे. आजही जुन्या पद्धतीचे घरे बांधता येतात. फक्त मुबलक प्रमाणात साहित्य पाहिजे निर्माण झाले पाहिजे. **मनुष्यबळ,**मजूर, कारागीर, **सुतार, लोहार, कुंभार, गवंडी, पाथरवट, बेलदार, रंगारी अशा कित्येकांना गावाकडेच रोजगार मिळेल.** मग अशी कामे आपोआप होतील **तसेच शहराकडे येणारे लोंढे ही कमी होतील यात तीळमात्रही शंका नाही.**

शहरातील बिल्डिंगसाठी AC, फॅन, कुलर, लिफ्ट, लाईट, फ्रीज, मेंटेनन्स असे दररोजचे खर्चही जास्त आहेत. एक उदाहरण सांगतो, शहरात आपण घराचा दरवाजा उघडला की पहिले लाईट व फॅन लावावा लागतो अन्यथा आतील काहीही दिसत नाही. त्यामानाने पूर्वी बांधलेले घरे, वाडे, गढ्या यांचे व्हेंटिलेशन कितीतरी पटीने चांगले आहे, दरवाजा उघडल्याबरोबर आत उजेड दिसतो याचे कारण त्याचे व्हेंटिलेशन चांगले असून यामध्ये आजही AC, फॅन, कुलरची आवश्यकता लागत नाही. आजही जुन्या घरात

आपण गेलो आणि दरवाजा उघडला तर व्हेंटिलेशन चांगले असल्यामुळे आत हवा व उजेड व्यवस्थित मिळतो.

प्रत्येकाला वाटतं आपलं स्वताचं घर असावं. तेही पक्क सिमेंट काँक्रीटमध्ये बांधलेलं, पण कोणीही असा विचार करत नाही की पुढे पाच पन्नास वर्षात आपल्या मुलाबाळांसाठी आपण काय वाढवून ठेवणार आहोत.

अलीकडील बांधकाम साहित्य निर्माण करण्यासाठीची ऊर्जा जास्त खर्च होते. म्हणजे कारखान्यात सिमेंट, लोखंड-सळया बनवणे, विटा बनवणे. लांबून खदानी मधून दगड आणून क्रशर मध्ये खडी, क्रशसँड बनवणे आणि जेवढ्या लांबून आपण हे मटेरियल आणू तेवढाच वाहतुकीचा खर्च जास्त आहे. त्याचं बरोबर उभे करण्याचा खर्चही जास्त आहे.

५०-६०वर्षानंतर अशा बांधकामाचा कालावधी संपल्यानंतर डीमॉलेशन ऊर्जा फार असणार आहे. हे डीमॉलेशन मटेरियल कुठे टाकायचं हाही प्रश्न असणार आहे. आत्ताच आपण जंगलापर्यंत अतिक्रमण केलेले आहे. त्यामुळे पुढील ५०-६०वर्षात जंगलही नसणार आहे. एकूणच आपण आपल्याचं अंताकडे चाललो

आहोत असे वाटते. हे सगळे आपण पैशाला अतोनात महत्वं दिल्यामुळे होत आहे. हे सगळे वाचवायचं असेल तर तरुण स्थपती, वास्तुविशारद, तरुणांनी, समाजाने ही तेवढाच पुढाकार घेऊन बांधकाम साहित्य गावातच कसे उपलब्ध होईल हे बघणे काळाची गरज आहे. अशा समाजसुधारकांनी पुढं येऊन जुन्या पद्धतीची बांधकामे करण्यासाठी प्रोस्ताहित करणे गरजेचे आहे.

जुनी बांधकामे पाहिली तर त्याला सगळीकडे कमानीच कमानी दिसतात. सिमेंट काँक्रीटच्या बांधकामात अशा कमानी गायबच केलेल्या आहेत. मुलांना लहान वयातच कौलारू घरे, उतरती छपरे, कमानी, आर्च, बनवणे असे विषय शाळेतच वर्कशॉप घेऊन शिकवले पाहिजेत. लहान वयात जे रुजेल तेच पुढे होईल. अशी मोठी चळवळ व्हायला पाहिजे.

आपण दगड फोडून काँक्रीट करतो, आणि त्याची स्ट्रेंथ कमी करतो, हे किती हास्यास्पद आहे हे लक्षात येईल.

## संदर्भ ग्रंथ


कृ.वि वझे  :- हिंदी शिल्पशास्त्र

वा.सी बेंद्रे  :- गड, कोट,दुर्ग आणि त्यांची वास्तू

डॉ.र.पु कुलकर्णी :- कौटिलीय अर्थशास्त्रातील शिल्पशास्त्र

महाराष्ट्र शासन :- प्रेक्षणीय स्थळे, मध्ययुगीन गढी, वाडे

म.श्री माटे  :- मराठा आर्किटेक्चर

ठोसर हरिहर :- प्राचीन मराठवाड्याचे व्यक्तिमत्व

डॉ.र.पु .कुलकर्णी :- शिल्प प्रकाश

त्रिंबक नारायण अत्रे :- गाव गाडा

दीपा जयंत मिरिंगकर :- रंगरेषा

बा.बा. करकरे :- स्थलनामकोश

राजरत्न प्रो.माणिकराव :- प्रतापगार शास्त्र

एस. जी. देगावकर :- महाराष्ट्रातील निवड जाती जमाती

पिंपळे सुधीर :- स्थापत्य वेद

**स्वतः केलेल्या सर्वेक्षणाच्या आधारे.**

श्री. विलास कोळी यांचे ई साहित्यवरील पहिले पुस्तक

क्लिक करा. उघडेल.



**ई साहित्य प्रतिष्ठानचं हे तेरावं वर्षं.**

**विलास कोळी यांचं ई साहित्यवरचं हे दुसरं पुस्तक.**

विलास कोळी एक अभ्यासू लेखक आहेत. अभ्यासाच्या जोडीला चिंतनशील वृत्ती आणि रंजक लेखनशैली आहे. त्यामुळे त्यांची पुस्तके माहितीपुर्ण, विचारपुर्ण आणि तरीही रंजक आणि वाचनीय असतात.

विलास कोळी यांच्यासारखे अनेक तरूण लेखक खूप छान लिहीत आहेत. मोठ्या लेखकांच्या तोडीस तोड आहेत. पण त्यांना योग्य असा प्लॅटफ़ॉर्म मिळत नाही. त्यांची पुस्तकं प्रकाशित करायला प्रकाशक धजावत नाहीत. कारण त्यांचे नाव प्रसिद्ध नसल्यामुळे त्यांच्या पुस्तकांची विक्री होईल की नाही याबद्दल प्रकाशक साशंक असतात. जर या लेखकांची पुस्तके वाचकांसमोर आलीच नाहीत तर त्यांचे नांव प्रसिद्ध होणार कसे? या दुष्टचक्रातन अनेक तरूण लेखकांच्या पिढ्या बरबाद झाल्या.

आता नेटवर नवलेखकांना वाचकांपर्यंत पोहोचवण्याचे काम अनेक संस्था करत आहेत. ई साहित्य प्रतिष्ठान त्यातील एक. ५ लाखांहून अधिक वाचकांपर्यंत या नवीन लेखकांना नेण्याचे काम ही संस्था करते. पूर्ण विनामूल्य. लेखकांनाही कोणताही खर्च नाही.

भविष्य काळात लेखकांना भरघोस मानधन देण्यासाठी ई साहित्यची इच्छा आहे. नवीन उत्कृष्ट लेखक ई साहित्याकडे वळत आहेत. त्यांना प्रतिसादही मिळतो. कुणाला भरघोस स्तुती तर काहींच्या वाट्याला टीकाही येते. या टीकेला positively घेऊन हे लेखक आपला कस वाढवत नेतात. सुरूची नाईक, प्रफ़ुल शेजव, भाग्यश्री पाटील, कोमल मानकर, सुरज गाताडे, अनूप साळगावकर, बाळासाहेब शिंपी, चंदन विचारे, सौरभ वागळे, यशराज पारखी, चंद्रशेखर सावंत, संयम बागायतकर, ओंकार झांजे, पंकज घारे, विनायक पोतदार, चंद्रकांत शिंदे, निरंजन कुलकर्णी, चारुलता विसपुते, कार्तिक हजारे, गणेश सानप, मनोज चापके, महेश जाधव, मनोज गिरसे, मृदुला पाटील, निलेश देसाई, सनहा पठाण, संजय बनसोडे, संजय येरणे, शंतनू पाठक, श्रेणिक सरडे, शुभम रोकडे, सुधाकर तळवडेकर, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा, विनिता देशपांडे, सौरभ कोरगांवकर, मिलिंद कुलकर्णी, शुभम पाटील, आशिष कर्ले, सुरेंद्र पाथरकर, प्रीती सावंत दळवी, निमिष सोनार, उमा कोल्हे, गणेश ढोले, सचिन तोडकर, महेश पाठाडे, अभिजीत पैठणपगारे, कार्तिक हजारे, किरण दशमुखे, जगदिश खांदेवाले, माधुरी नाईक, विशाल दळवी, गौरी कुलकर्णी, जितेश उबाळे, प्रितम साळुंखे, स्वीटी महाले, अंबरीश गुरव, अविनाश जामदार, गौरव नायगांवकर, प्रणिता ठाकूर, अनिल पिसे, अनामिका बोरकर, पवन सोनवणे,

राजेंद्र शेळके, पुर्वा राउत, धनंजय कलमष्टे, वैभव तांबटकर, मंजिरीसबनीस, सुजाता सिद्धा असे अनेक तरूण लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत.

मराठीत हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे, आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे तरूण लेखक येत आहेत. ही नवीन लेखकांची फ़ौज मराठी भाषेला नवीन प्रकाशमान जगात स्थान मिळवून देतील. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद.

या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

बस्स. अजून काय पाहिजे?

esahity@gmail.com

विलास भि. कोळी यांचा ‘वाडा कसा पहावा’ हे पुस्तकं काय सांगते.

* काय उद्देश असायचे वाडा बांधण्यामागे.

* कसे काढत असत पूर्वीचे लोक क्वांटीटी व इस्टीमेट.

* का जाणवतो वाड्यात शिरल्याबरोबर उन्हाळयात थंडावा आणि हिवाळयात उष्णता.

* कसे ओळखत पुल्लिंगी, स्त्रीलिंगी, नपुंसकलिंगी दगड. व कोणता दगड कोठे वापरत.

* का करत दगडी जमीन सर्वात शेवटी.

* का वापरले आपल्या पूर्वजांनी दगडासारखे चिरस्थायी माध्यमचं.

* कशी केली असतील पूर्वीची बांधकामे आत्ताच्या लेझर किरणांच्या तोडीसतोड.

* कसे टिकून आहे आजही वाड्याचे बांधकाम.

* काय संदेश द्यायचा असेल वाड्याच्या मालकाला.

* का व कशी करत होते भूपरीक्षा.

* का घेत होते वाड्याचे जोते कमरेइतके उंच.

* का सोडत होते वाड्यात मध्यभागी मोकळी जागा.

* का लावल्या जात जोत्याला गोल रिंगा.

* कशाचा उपयोग करत असत पूर्वी अॅड मिक्सचर म्हणून.

* कसं व्हायचं माळवदाचे बांधकाम

* कसे काढायचे झाडाचे वयोमान.
* का लागत नव्हती पूर्वी लाकडांना वाळवी.
* कसे टाळले जात होते पाण्याचे बाष्पीभवन.
* कसे राखले जायचे पाण्याचे पावित्र्य.
* कशी असायची कारागिरांची कल्पनाशक्ती आणि अचूक नियोजन.
* का पाजले जाई लाकूड कामाला बिब्ब्याचे, बेलाचे व जवसाचेच तेल.
* कसे होते वाड्याचे वैभव, यशस्वी व्यवस्थापन आणि कारभार.
* का आहेत मातीच्या भिंती, बुरुज, वाडे, गढ्या आजही सुस्थितीत.
* का नाही झाले सिमेंटलाही मागे टाकेल अशा पांढऱ्या मातीवर संशोधन.
* का ओळखली जातात वाड्याची बांधकामे मेन्टेंनन्स फ्री किंवा वन टाइम कन्स्ट्रक्शन म्हणून.
* कसे पेलले वास्तू निर्माण करण्याचे धनुष्य तत्कालीन अभियंत्यांनी.
* कसे सांगत आपल्या डोक्यातील वाड्याची कल्पना. फोटो, थ्री डी मोडेल, थ्री डी व्हू. तेव्हांच्या लोकांनी हे कसं केलं असेल.